## कर्मवीर भाऊराव पाटील जयंती सोहळा



डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १२८ व्या जयंतीनिमित्त प्रतिमेचे पूजन करताना सहसचिव मा.उत्तमराव आवारी व मान्यवर



दिपप्रज्ज्वलन करताना सहसचिव मा.उत्तमराव आवारी व मान्यवर



कर्मवीर जयंती समारंभात प्रास्ताविक व स्वागत करताना प्राचार्य डॉ.कैलास जगदाळे



कर्मवीर जयंती समारंभात पाहुण्यांची ओळख करून देताना मुख्याध्यापक मा.निकम सर



कर्मवीर जयंती समारंभात स्वागत गीत सादर करताना महात्मा गांधी विद्यालयाच्या विद्यार्थिनी



कर्मवीर जयंती सोहळ्यात प्रमुख पाहुण्यांचे स्वागत करताना प्राचार्य डॉ.कैलास जगदाळे



मा.उत्तमराव आवारी मार्गदर्शन करताना



महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी काढलेल्या रांगोळीचे निरीक्षण करताना मान्यवर



रयत शिक्षण संस्थेचे,

# सौ.मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय,उंब्रज

ता.कराड, जि.सातारा - ४१५ १०९



# त्रिवेणी

सन २०१५-२०१६



'त्रिवेणी' नियतकालिक । सन २०१४-२०१५


- **अध्यक्ष :**
  प्राचार्य डॉ.कैलास जगदाळे

- **प्रमुख संपादक :**
  प्रा.डॉ.तानाजी पाटील

- **विभागीय संपादक :**
  प्रा.डॉ.तानाजी पाटील (मराठी)
  प्रा.डॉ.वंदना मोहिते (हिंदी)
  प्रा.मनोहर माळगे (इंग्रजी)
  प्रा.लालासाहेब पवार (सामाजिक शास्त्रे)
  प्रा.भद्रिनाथ ढाकणे (अहवाल)

- **विशेष सहाय्य आणि सल्ला :**
  प्रा.रामचंद्र यादव (उपप्राचार्य)
  श्री.अशोक खराडे (मुख्यलिपिक)
  श्री.भरत पवार (वरिष्ठ लिपिक)

- **मुद्रक :**
  प्रिंट ओम ऑफसेट
  २६९ ब/२, दौलतनगर, सातारा.

- **अक्षर संधान :**
  टाईप इनोव्हेटर्स
  मोती चौक, सातारा.

- **मांडणी :**
  प्रा.डॉ.तानाजी पाटील
  सौ.मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय, उंब्रज.
  ता.कराड, जि.सातारा ४१५ १०९

- **मुखपृष्ठ :**
  प्राचार्य डॉ.कैलास जगदाळे
  उपप्राचार्य प्रा.रामचंद्र यादव




# प्रगतीच्या पाऊल खुणा

* विद्यापीठापेक्षा महाविद्यालयाचे निकाल अधिक
* विद्यार्थीनींच्या बौध्दिक व व्यक्तिमत्त्व विकासाचे अनेक उपक्रम
* मराठी, हिंदी, इंग्रजी, इतिहास व समाजशास्त्र इ.स्पेशल विषयांची सोय
* विविध शॉर्ट टर्म कोर्सेस
* अद्यावत संगणक प्रयोगशाळा
* कर्मवीर विद्याप्रबोधिनी
* स्पर्धा परीक्षा केंद्र
* इंग्लिश स्पिकींग कोर्स
* सुसज्ज महिला वसतिगृह
* ज्युडो, कराटे प्रशिक्षण
* ह्युमन राईटस् एज्युकेशन फाऊंडेशन कोर्स
* फॅशन डिझाईनिंग कोर्स
* ट्रॅव्हल्स् ॲण्ड टू रिझम कोर्स
* कलादालनाद्वारे मुलींच्या सुप्त गुणांना वाव
* क्रीडा विभागामार्फत अनेक खेळांचे प्रशिक्षण




**त्रिवेणी**

दि प्रेस ॲण्ड रजिस्ट्रेशन ऑफ बुक्स नियमन फॉर्म ४ प्रमाणे आवश्यक माहिती –

- **प्रकाशन स्थळ :** सौ.मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय, उंब्रज
- **प्रकाशन काळ :** वार्षिक
- **प्रकाशक :** प्राचार्य डॉ.कैलास जगदाळे
- **राष्ट्रीयत्व :** भारतीय
- **पत्ता :** सौ.मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय, उंब्रज ता.कराड, जि.सातारा ४१५ १०९
- **दूरध्वनी :** (०२१६४) २६४२३५
- **ई-मेल :** yssmmuks@yahoo.co.in
- **संपादक :** प्रा.डॉ.तानाजी पाटील
- **राष्ट्रीयत्व :** भारतीय
- **पत्ता :** सौ.मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय,उंब्रज ता.कराड, जि.सातारा ४१५ १०९
- **मुद्रक :** श्री.संदेश शहा
- **राष्ट्रीयत्व :** भारतीय
- **पत्ता :** २६९ ब/२, दौलतनगर करंजे, सातारा ४१५००२
- **फोन :** (०२१६४) २३४०४९
- **मालकी :** रयत शिक्षण संस्थेचे, सौ.मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय, उंब्रज. ता.कराड, जि.सातारा.
- **प्राचार्य : डॉ.कैलास जगदाळे**


या अंकातील साहित्यातून व्यक्त झालेली मते संबंधित लेखकांची आहेत. संपादक मंडळ त्या मताशी सहमत असेलच असे नाही.



जो वस्तीला आला... त्याला ताटातला घास दिला ...!



रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक

**पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील**

(२२ सप्टेंबर १८८७ – ९ मे १९५९)

पूर्ती आकांक्षा अन् आशा
गुणगुणती या दाही दिशा



रयत माऊली
सौ.लक्ष्मीबाई भाऊराव पाटील



रयत शिक्षण संस्थेचे पदाधिकारी

**॥ प्रेरक शक्ती ॥**

निश्चयाचा महामेरू ।
बहुत जनांचा आधारू ॥



मा.नामदार शरदचंद्रजी पवार
अध्यक्ष, रयत शिक्षण संस्था, सातारा



मा.डॉ.अनिल पाटील
चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा



मा.प्राचार्य डॉ.गणेश ठाकूर
सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा



मा.प्राचार्य डॉ.डी.डी.पाटील
सहसचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा



मा.प्राचार्य शहाजी डोंगरे
ऑडिटर, रयत शिक्षण संस्था, सातारा




महाविद्यालयाचे कार्यकुशल संचटक | **प्राचार्य, डॉ.कैलास जगदाळे,**

## स्थानिक व्यवस्थापन समिती सदस्य


मा.श्री.द.श्री.जाधव (आबा)


मा.श्री.सुधीर जाधव (भाऊ)


मा.श्री शिवाजीराव कुरकुटे (आप्पा)


प्रा.रामचंद्र यादव


प्रा.डॉ.तानाजी पाटील


प्रा.आशा मडावी


प्राचार्य डॉ.कैलास जगदाळे


श्री.अशोक खराडे





# अध्यक्षीय

''बालपण उतू गेले अन् तारुण्य नाचले, वार्धक्य साचले'' असं 'दयाघना' या गीतांमध्ये मानवी जीवनाच्या तीन टप्प्यांचे सार्थ वर्णन केलंय. मानवी जीवन हे त्यागमय, कष्टमय तर आहेच, पण त्यावरोबर सामाजिक नातं टिकवणारे तेच खरे जीवन आहे. हेच खरं तर महाविद्यालयाचं अंगीकृत प्रयोजन असलं पाहिजे. भावविश्व तर ताजं, रसरशीत, उत्कंठावर्धक, प्रसन्न, आनंदी असण्याचं ते वय...

'वय कोवळे उन्हाचे'

विद्यार्थिनींच्या नाविन्यतेचं, सर्जनशीलतेचं आणि संवेदनशीलतेचं धारदार वळण देणं हेच खरं तर महाविद्यालयाचे अंगीकृत प्रयोजन असलं पाहिजे. ही तरुणाई पूर्वग्रहरहित असल्याने ती मनाने प्रेमळ व नितळ असते. अशा अनघड तरुणाईला एक सुंदर घाट देण्याचा प्रयत्न आमचं महाविद्यालय सतत करीत असतं.

विद्यार्थिनींच्या व्यक्तिमत्वाचे विविधांगी पैलू प्रकट व्हावेत, याकरिता अनेक उपक्रम आम्ही राबवितो. विद्यापीठ अभ्यासक्रम, अध्यापन, महाविद्यालयीन अंतर्गत परीक्षा तसेच विद्यापीठ परीक्षा याच्या पलिकडे विद्यार्थीनींसाठी खूप काही करणं आवश्यक ठरतं. विद्यार्थिनींच्या व्यक्तिमत्त्वातील बलस्थाने ओळखून, कर्तव्यबुध्दी, राष्ट्रीयत्वाची भावना, विवेकवादी विचारांची रुजवण, समता, स्वातंत्र्य आणि बंधुभाव वृध्दी, सामाजिक, कौटुंबिक जाणीव, सलोखा, मानवतावादी दृष्टीकोन, पर्यावरण विषयक जाणीव, वैज्ञानिक दृष्टीकोन, स्त्री-पुरुष समानतेचा विचार आणि एकूणच करिअर संबंधी जागरूकता इत्यादीसाठी आम्ही जाणीवपूर्वक अभ्यास व अभ्यासेत्तर उपक्रम राबवितो. हे सर्व उपक्रम राबविताना विद्यार्थीनीमध्ये प्रत्यक्ष काही फरक पडतो का? याचं निरीक्षण करतो. तसेच 'योगासने', 'पत्रकारिता', 'ट्रॅव्हल टूरिझम' हे कोर्स जून २०१६ पासून चालू करणार आहोत.

'क्रीडा स्पर्धा, काव्यलेखन स्पर्धा, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, मेहंदी-रांगोळी स्पर्धा, काव्यवाचन स्पर्धा, मराठी स्वाक्षरी स्पर्धा, निबंधलेखन स्पर्धा आणि महाविद्यालयाअंतर्गत मान्यवरांची विविध व्याख्याने महाविद्यालयात वेळोवेळी होत असतात. त्यामुळे विद्यार्थिनींमध्ये मूल्यांचं संस्करण होण्यास मदत होते. स्पर्धा परीक्षा व करिअर मार्गदर्शन समितीच्यावतीने तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून प्रा.चंद्रकांत खंडागळे (सांगली), प्रा.डॉ.एस.आर.निकम (सातारा), प्रा.डॉ.एम.वी.भोसले (सातारा), प्रा.डॉ.एन.के.लोखंडे (सातारा), प्रा.डॉ.व्ही.एस.एलगार (सातारा), प्रा.अनिल कोकाटे (शिरवळ), प्रा.मिलिंद गायकवाड (उंब्रज), मा.अभिजीत निकम (तहसिलदार गुहागर), प्रा.प्रितम गिरी गोसावी (सातारा) आणि प्रा.व्ही.डी.पाटील (सातारा) इत्यादींची व्याख्याने विद्यार्थिनींना मार्गदर्शक ठरली.

मराठी विभागाच्यावतीने 'श्रावणसरी', 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' व 'मराठी राजभाषादिन' या विविध उपक्रमाच्या निमित्ताने प्रमुख पाहुणे म्हणून कवी राजा मंगसूळीकर (कराड), प्रा.अमोल चांदेकर (इस्लामपूर) आणि प्रा.सुहास निर्मळे यांची व्याख्याने झाली. तसेच 'अक्षरवन' वाङ्मयीन भित्तीपत्रकाद्वारे विद्यार्थिनींच्या लेखनास प्रोत्साहन दिले. काव्यनिर्मिती, काव्यवाचन, अभिनय संपादन प्रक्रिया' मराठी हस्ताक्षर स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा इत्यादी उपक्रम राबविले.

हिंदी विभाग दिवस समारंभ प्रसंगी प्रा.डॉ.सादिक तांबोळी (विटा) यांचे व्याख्यान मार्गदर्शक ठरले. तसेच 'ह्युमन राईटस्' या कार्यक्रमांतर्गत प्रा.अजित गाढवे (कराड), अग्रणी महाविद्यालय अंतर्गत प्रा.अजित गाईंगडे, प्रा.श्रीमती एस.एम.कुंभार आणि इंग्रजी विभागामार्फत 'Communication Skill' या विषयावर प्रा.श्रीमती जयश्री आफळे यांचे व्याख्यान झाले.

आमचा क्रीडा विभागही विद्यार्थिनींसाठी खास मार्गदर्शक ठरला. सातारा विभागीय व्हॉलीबॉल, कबड्डी, मैदानी क्रीडा स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग तसेच आंतरविभागीय बॉक्सिंग स्पर्धेत ७० ते ८० किलो वजन गटात कु.दिपाली मोहन घाडगे बी.ए.२ हिने तृतीय क्रमांक संपादन केला. ग्रंथालय विभागाच्या वतीने दि.१२/०८/२०१५ रोजी डॉ.एस.आर.रंगनाथन यांच्या जयंती निमित्ताने ग्रंथप्रदर्शन, डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनी 'वाचन प्रेरणा दिवस' म्हणून साजरा केला. विद्यार्थिनींमध्ये वाचन संस्कृती वाढावी म्हणून या विभागाकडून कु.ज्योती कदम (बी.ए. २) हिची उत्कृष्ट वाचक म्हणून निवड करण्यात आली.

महाविद्यालयाच्या प्रगतीचा व कल्पक उपक्रमांचा प्रभाव उंब्रज व उंब्रज परिसरात निश्चितच झालेला दिसून येतो. त्यामुळेच विद्यार्थिनींच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. महाविद्यालयातील अभ्यासू, उपक्रमशील, संशोधनमग्न प्राध्यापक वर्ग आमचे खरे प्रेरणास्थान आहे. आज ५ पीएच.डी., ५ एम.फिल., ५ सेट/नेट आणि २ प्राध्यापक पीएच.डी. करत आहेत. नॅशनल, इंटरनॅशनल चर्चासत्रामध्ये ७ प्राध्यापकांनी सहभाग दर्शविला आहे. नजीकच्या काळामध्ये वाणिज्य व विज्ञान शाखा सुरु करण्याचा महाविद्यालयाचा मानस आहे.

यु.जी.सी.कडून १२ व्या योजनेअंतर्गत महाविद्यालयास सन २०१५-२०१६ या वर्षात फॅशन डिझाईनिंग कोर्ससाठी रू.५,५१,०००/- इतके अनुदान प्राप्त झाले असून या वर्षापासून हा कोर्स सुरु करण्यात आला आहे. तसेच 'योगासने' पत्रकारिता, ट्रॅव्हल टुरिझम हे कोर्स जून २०१६ पासून सुरु करण्यात येणार आहेत.

आदर्श व सक्षम पिढी घडविण्यासाठी आमचे प्राध्यापक, प्राध्यापिका शॉर्ट टर्म कोर्स व ज्युडो कराटे बॉक्सिंगचे शिक्षक, शिक्षिका व प्रशासकीय सेवक वर्ग या सर्वांचे महाविद्यालयाच्या विकासासाठी खूप मोठे योगदान आहे. हा अंक म्हणजे महाविद्यालयाच्या आंतर्बाह्य स्वरूपाचे जणू प्रतिबिंबच !

महाविद्यालयाच्या प्रत्येक विकासकामात हाकेला प्रतिसाद देणाऱ्या मान्यवरांमध्ये स्थानिक व्यवस्थापन समितीचे सदस्य श्री.द.श्री.जाधव, श्री.शिवाजीराव कुरकुटे, श्री.सुधीर जाधव, श्री.सुरेशभाऊ साळुंखे तसेच उंब्रजचे सरपंच, उपसरपंच, पत्रकार हे सर्व मान्यवर सतत पाठीशी उभे राहिले. या असंख्य मान्यवरांना माझा कृतज्ञतापूर्वक नमस्कार !

**- प्राचार्य डॉ.कैलास जगदाळे**

# संपादकीय



प्रिय रसिक हो, नमस्कार

पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील व सौ.लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या पवित्र स्मृतीस मन:पूर्वक अभिवादन करून 'त्रिवेणी २०१५-१६' चा अंक आपल्या हाती देताना मला मनस्वी आनंद होत आहे.

पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या अथक प्रेरणेतून स्थापन झालेल्या रयत शिक्षण संस्थेचे सन १९६९ मध्ये उंब्रज. ता.कराड, जि.सातारा या ठिकाणी महिला महाविद्यालय सुरू केले. आज आमचे महाविद्यालय अनेक सुविधांनी परिपूर्ण आहे विद्यार्थिनींनी भविष्यकाळात स्वत:च्या पायावर उभे रहावे, यासाठी आमच्या महाविद्यालयाने अनेक शॉर्ट टर्म कोर्सेस चालू केले आहेत. यामध कॉम्प्युटर, स्पोकन इंग्लिश, स्पर्धा परीक्षा, ज्युडो कराटे, ब्युटी पार्लर, वालवाडी शिक्षक प्रशिक्षण कोर्स, शिलाई मशीन, कुकरी, रायफल ट्रेनिंग शारीरिक शिक्षण याद्वारे अनेक खेळांचे प्रशिक्षण असे अनेक कोर्सेस उपलब्ध करून विद्यार्थिनींच्या सर्वांगीण विकासासाठी कॉलेज सतत प्रयत्नशील असत आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.कैलास जगदाळे साहेब यांच्या दूरदृष्टीतून जून २०१६ पासून ग्रामीणपत्रकारिता व ट्रॅव्हल आणि टूरिझम असे नवी कोर्सेस सुरू करून महाविद्यालयाच्या प्रगतीमध्ये अधिकच भर पडणार आहे, तसेच मुलींचे होस्टेल पूर्ण झाले असून उद्घाटनच्या प्रतीक्षेत आहे. आ महाविद्यालयामध्ये एकूण ३०८ विद्यार्थिनी उच्च शिक्षण घेत आहेत.

'त्रिवेणीच्या' अंकामध्ये अनेक विषयावरील वैविध्यपूर्ण लेखांचा समावेश केला आहे. मराठी, हिंदी, इंग्रजी आणि सामाजिकशास्त्रे या भाषांमधी लिखाणातून एक वेगळा ठसा इथे उमटतो आहे. त्याचबरोबर सतत यशाची कमान ठेवणारे आमचे वार्षिक अहवाल म्हणजे एक यशोगाथाच होय. आमच सर्वच प्राध्यापकांचे योगदानही तितकेच महत्वाचे आहे. आज आमच्या महाविद्यालयात ५ डॉक्टरेट, ५ एम.फिल. आणि ५ सेट/नेट तसेच संशोधनपर मायन मेजर प्रोजेक्ट, नॅशनल-इंटरनॅशनल पेपर अशा विविध गुणांनी परिपूर्ण आमचे प्राध्यापक शिवाजी विद्यापीठाच्या विविध कमिट्यामधून काम करीत आहेत. सर्वांचा लाभ आमच्या विद्यार्थिनींना होत आहे.

'त्रिवेणी' नियतकालिकाचा दर्जा कसा असावा, यावावत मा.प्राचार्य डॉ.जगदाळेसाहेवांनी आम्हांस मार्गदर्शन केले आहे. तसेच विद्यार्थिनींच सर्वांगीण विकास हे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून शिक्षक, पालक व समाज या सर्व घटकामध्ये सुसंवाद साधला जावा यासाठी प्राचार्य डॉ.जगदाळे साहेब यांच प्रेरणेने व कुशल मार्गदर्शनाने महाविद्यालयामध्ये या वर्षी अनेक उपक्रम राबविण्यात आले. सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे विद्यार्थिनींच्या अंगी असणाऱ्या विवि कलागुणांना वाव देऊन उत्तम कलाकार निर्माण करण्याचे काम महाविद्यालय करीत आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून श्रमदान, ग्राम स्वच्छत वृक्षारोपण, रक्तदान शिवीर, एडस् जनजागृती, पशुचिकित्सा, गाव सर्वेक्षण अशा विविध उपक्रमात आमच्या विद्यार्थिनी सतत सहभागी असतात. याव दि.१७/१२/२०१५ ते २३/१२/२०१५ या कालावधीत मौजे भोसलेवाडी, ता.कराड, जि.सातारा येथे राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिवि आयोजित करण्यात आले. या शिवीरामध्ये ५० विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या.

२०१५-१६ या शैक्षणिक वर्षामध्ये देश, राज्य व विविध सामाजिक, राजकीय, कलावंत, साहित्यिक, प्राध्यापक, कर्मचारी तसेच देशाचे संरक्ष करताना धारातिर्थी पडलेले अनेक जवान या सर्वांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन व भावपूर्ण श्रध्दांजली !

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा तसेच मराठी भाषा प्रगतीपथावर जावी, यासाठी अनेक मान्यवर कवी, लेखक, समीक्षक इत्यादीं मोठे योगदान दिले आहे. यामध्ये वि.स.खांडेकर (ययाती), कुसुमाग्रज तथा वि.वा.शिरवाडकर (संपूर्ण साहित्य कृतीला) आणि भालचंद्र नेमाडे (हि कादंबरी) यांना ज्ञानपीठ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या मान्यवर लेखक/कवींनी मराठी भाषेला नवे वैभव मिळवून दिले. आज मराठी भाषा सर्व ठिकाणी संस्कारक्षम झालेली दिसून येते.

रसिक वाचक हो, या वर्षीचा 'त्रिवेणी २०१५-१६' हा अंक मुखपृष्ठापासून ते मलपृष्ठापर्यंत अवलोकनीय व वाचनीय झालेला आहे. अंकाची मांडण ही आकर्षक व सर्वांग परिपूर्ण झालेली आहे. विद्यार्थिनींनी परिश्रमपूर्वक साहित्य निर्मिती केली आहे. हा अंक आपल्या हाती देताना आम्हाला मनापासू आनंद होत आहे. हा अंक यशस्वी व परिपूर्ण व्हावा, यासाठी महाविद्यालयाचे आदरणीय प्राचार्य डॉ.कैलास जगदाळेसाहेव, सर्व सहसंपादक, प्राध्यापक व स्थानिक व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य, शिक्षकेत्तर सेवक वर्ग आणि सतत लेखन करणाऱ्या आमच्या महाविद्यालयाच्या गुणी विद्यार्थिनी तसेच प्रिंट ओ ऑफसेट, मा.संदेश शहा, मा.जतीन शहा, टाईप इनोव्हेटर्सचे मा.प्रशांत गुजर या सर्वांनी घेतलेल्या प्रामाणिक परिश्रमामुळेच हा अंक परिपूर्ण व वेळेवर प्रसि होत आहे. यावद्दल सर्वांचे मनापासून व कृतज्ञतापूर्वक आभार. महाविद्यालयाच्या उज्ज्वल भविष्याची आकांक्षा मनात बाळगून संपादकीय मनोगतास इथे अल्पविराम देतो, धन्यवाद !...

**प्रा.डॉ.तानाजी पाटील**
प्रमुख संपादक

# मराठी विभाग



मी ओवतो जीवाची अफलातून काहिली शब्दात
मी जळतो माझ्या डोळ्यांच्या पेटत्या चुलीमध्ये
माझे शब्द भिजून येतात माझ्या काळ्या ठिकूर रक्तात
जमत नाही मला शब्दांचे नक्षीकाम...

दु:ख रंगवून रंजक करणारे गुंजनवादी कूळ नाही माझे
ही वंचना उगवली नाही कधी मनाच्या क्षितिजातून
हाडांच्या हुड्यावर जळणारा बेचैन दिवा
माझ्या हिरमुसला रक्ताचा आहे...

– डॉ.यशवंत मनोहर

■ विभागीय संपादक:
**प्रा.डॉ.तानाजी पाटील**

# अनुक्रमणिका

## गद्य विभाग


| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील | ज्योती जगदाळे | बी.ए.भाग ३ | ..०१ |
| २. | रयत माऊली सौ.लक्ष्मीबाई भाऊराव पाटील | स्नेहल वायदंडे | बी.ए.भाग ३ | ..०४ |
| ३. | ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त : भालचंद्र नेमाडे | श्रध्दा पवार | बी.ए.भाग ३ | ..०६ |
| ४. | राष्ट्रीय सेवा योजना : एक मुक्त व्यासपीठ | ज्योती कदम | बी.ए.भाग २ | ..०८ |
| ५. | संवेदनशील कवी : मंगेश पाडगावकर | अपर्णा यादव | बी.ए.भाग ३ | ..११ |
| ६. | आतंकवाद : माणुसकीला काळीमा फासणारा | तेजश्री गोरे | बी.ए.भाग १ | ..१५ |
| ७. | माणुसकी म्हणजे नेमकं आहे तरी काय? | स्नेहा बाबर | बी.ए.भाग १ | ..१७ |
| ८. | माझ्या आठवणीतील गाव : भांबे | वनिता काटे | बी.ए.भाग ३ | ..१९ |
| ९. | आई | दीपाली घाडगे | बी.ए.भाग ३ | ..२२ |


## पद्य विभाग


| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | पुन्हा कधी ना | तेजस्विनी पाटील | बी.ए.भाग २ | ..१८ |
| २. | आई | अपर्णा पवार | बी.ए.भाग ३ | ..२१ |
| ३. | कोण पाहिजे | मनिषा काळे | बी.ए.भाग ३ | ..२४ |
| ४. | कर्मवीर भाऊराव पाटील | पूजा माने | बी.ए.भाग १ | ..२४ |
| ५. | शेतकरी | पूजा साबळे | बी.ए.भाग १ | ..२४ |
| ६. | साद आईची | अश्विनी निकम | बी.ए.भाग ३ | ..२५ |
| ७. | मैत्री | प्राजक्ता पोरे | बी.ए.भाग ३ | ..२५ |
| ८. | 'तो' आणि 'ती' | रोहिणी जाधव | बी.ए.भाग ३ | ..२५ |
| ९. | जिद्द | श्रध्दा पवार | बी.ए.भाग २ | ..२६ |
| १०. | कळत नाही | दामिनी गावडे | बी.ए.भाग १ | ..२६ |
| ११. | नवा शिवाजी | सुवर्णा कांबळे | बी.ए.भाग १ | ..२६ |
| १२. | प्रत्येक मुलगी सुंदर असते | अश्विनी वेल्हाळ | बी.ए.भाग १ | ..२७ |
| १३. | निरोप घेताना | अपर्णा यादव | बी.ए.भाग ३ | ..२७ |
| १४. | विसरायला हवे | रोहिणी जाधव | बी.ए.भाग ३ | ..२८ |




व्यक्तिचित्रण

## पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील

कु.ज्योती कांतिलाल जगदाळे, बी.ए.भाग-३

*कर्मवीरांनी फक्त विद्यार्थीच घडविले नाहीत; तर त्याबरोबर समाजाला एक आदर्श घालून दिला आहे. शिक्षण हे सर्वांना मिळावे, जात कोणतीही मानू नये. श्रमाची लाज बाळगू नये आणि आपण सर्व एकच आहोत हा आदर्श विचार त्यांनी समाजात रूजविला. आज रयत शिक्षण संस्थेत अठरा पगड जाती-धर्माचे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत तसेच सेवकही काम करीत आहेत.*

छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतिबा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, संत गाडगे महाराज, वि.रा.शिंदे आणि क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या आदर्श विचारांनी भारावलेले व्यक्तिमत्त्व; म्हणजे कर्मवीर भाऊराव पाटील होय. एका शेतकरी जैन कुटुंबात २२ सप्टेंबर १८८७ रोजी हातकणंगले तालुक्यातील कुंभोज जि.कोल्हापूर येथे त्यांचा जन्म झाला. भाऊरावांचे घराणे तसे मध्यमवर्गीय. पण सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक जाण असणारे होते. शैक्षणिक परंपरा त्यांच्या घरामध्ये नसली तरी थोर समाज सुधारकांचा विचार त्यांच्या एकूणच कुटुंबावर होता. सामान्य वर्गातील मुले-मुली शिकली पाहिजेत; ती स्वत:च्या पायावर उभी राहून आपले घर सांभाळले पाहिजे या आदर्श विचारांचे भाऊरावांचे घराणे होते. हेच गुण भाऊरावांच्या बालमनावर रूजले. त्यांचे वडील पायगोंडा पाटील हे रेव्हिन्यू खात्यामध्ये नोकरीला होते; त्यांनी भाऊरावांना कोल्हापूरात राजाराम हायस्कूलमध्ये शिकण्यास ठेवले होते. पण त्या वयातही समाजातील जातीयता भाऊरावांना अस्वस्थ करी. याच शाळेत भाऊरावांचे इंग्रजी सहाव्या इयत्तेपर्यंत शिक्षण झाले. भाऊराव हे विद्यार्थीदशेत जैन बोर्डिंगमध्ये रहात होते. भाऊरावांच्या जीवनात एक गोष्ट अशी घडली की; त्यामुळे त्यांना समाज कार्याची प्रेरणा मिळाली. एके दिवशी राजर्षी शाहू महाराजांना 'मिस क्लार्क' होस्टेलच्या अस्पृश्य विद्यार्थीनीसाठी काढलेल्या उद्घाटनासाठी बोलविले होते. त्यावेळी भाऊरावांनाही तेथे आमंत्रित केले. कार्यक्रम संपल्यानंतर भाऊरावांना अंघोळ करून येण्यास सांगितले. कारण त्यांनी अस्पृश्यांना स्पर्श केला म्हणून. पण भाऊरावांना हे काही पटले नाही. त्यांनी त्याच वेळी नकार दिला; म्हणून वसतिगृहातून त्यांना बाहेर काढले. त्यावेळी भाऊरावांचे स्नेही श्री.खानविलकर यांच्या आग्रहास्तव भाऊराव राजवाड्यावर राहण्यास गेले.



तेव्हा तेथे त्यांना राजर्षी शाहू महाराजांच्या सर्व कार्याची माहिती मिळाली. तेव्हापासून त्यांनी सामाजिक कार्याची प्रेरणा आत्मसात केली. सन १९५४ मध्ये याच राजाराम हायस्कूलच्या शताब्दी महोत्सवाला त्यावेळचे भारताचे उपराष्ट्रपती डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन उपस्थित होते. त्यांच्याशी भाऊरावांची ओळख करून दिल्यानंतर भाऊराव मिस्कीलपणे त्यांना म्हणाले, 'या शाळेच्या कुठल्याही वर्गात, कुठल्याही वर्षी, कुठल्याही विषयात पास झालो नाही असा मी विद्यार्थी आहे.'

भाऊरावांचे शिक्षण जरी कमी असले तरी; विचाराने ते महान होते. बहुजन वर्गातील मुले-मुली शिकावी याच उद्देशाने त्यांनी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यामध्ये ज्ञानाचा प्रसार केला. त्यासाठी त्यांनी उद्योग व्यवसायांच्या कडून धन मिळवण्याचा प्रयत्न केला; पण त्यांना अपयश आले. भाऊराव कोल्हापूरला शिक्षण घेत असतानाच ज्ञानदेव घोलप

(गांव सरूड ता. शाहुवाडी, जि.कोल्हापूर) या गरीब व अस्पृश्य मुलांस त्यांनी कोल्हापूर येथे शिक्षणाची संधी प्राप्त करून दिली. हाच भाऊरावांचा पहिला विद्यार्थी होय. भाऊराव पाटील यांचे अथक परिश्रम आणि असीम त्याग, अखंड समाजसेवा आणि शैक्षणिक क्षेत्रातील नेत्रदिपक कार्य या सर्वाबद्दल जनतेने त्यांना 'कर्मवीर' ही उपाधी देऊन गौरविले. भाऊरावांनी समाजाला स्वत:च्या अस्तित्वाची, हक्काची आणि कर्तव्याची जाणीव करून दिली. त्यांची अस्मिता जागृत केली. भाऊरावांनी तरूण वयामध्ये सत्यशोधक बनून जाती निर्मुलनाचे काम केले. जातीबंधने तोडून भाऊरावांनी मोठ्या प्रयत्नाने बहुजन समाजालाच नव्हे तर एकूणच समाजालाच शिक्षणाची जाणीव करून दिली. समाज, कुटुंब, धर्म, संस्कृती आणि देश हे घटक समजून घ्यावयाचे असतील तर 'शिक्षण' हे महत्वाचे आहे. हे त्यांनी समाजाला पटवून दिले आणि त्यादृष्टीने कर्मवीरांनी खेड्यांपासून ते शहरापर्यंत शैक्षणिक शाखा उभ्या केल्या.

सन १९९१ मध्ये कराड तालुक्यातील 'काले' या गावी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. त्यांच्या कार्यामागचे विचारसुत्र असे होते की, 'शाळा तेथे बोर्डिंग', 'बोर्डिंग तेथे विहीर', विहीर तेथे शेती, शेती तेथे कष्ट आणि कष्ट तेथे सुयश' असे सूत्र भाऊरावांनी आत्मसात केले. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात वसतिगृहे, प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा व महाविद्यालये आणि ट्रेनिंग कॉलेजेस असा हा रयत शिक्षण संस्थेचा वटवृक्ष संपूर्ण महाराष्ट्रात फोफावला आहे. त्यांच्या कार्याची पावती त्यांना मिळाली. महात्मा गांधीजींनी त्यांना गौरविले तर पुणे विद्यापीठाने त्यांना 'डी.लिट' ही सन्मान पदवी दिली. तर महाराष्ट्र शासनाने त्यांना 'पद्मभूषण' म्हणून गौरविले.

कर्मवीरांच्या शैक्षणिक कार्यामुळे महाराष्ट्राचा चेहरा-मोहरा बदलला. त्यामुळे आधुनिक महाराष्ट्राच्या शिल्पकारांमध्ये कर्मवीर भाऊराव पाटील यांना मानाचे स्थान आहे. जात-पात आणि धर्म याच्या पलिकडे जाऊन कर्मवीरांनी माणसातला माणूसपणा जागा केला. उच्च ध्येय, श्रमप्रतिष्ठा, सामाजिक जाणीव आणि मानवतावाद या आदर्श मूल्यांची विजे बहुजनांमध्ये रूजविली. म्हणूनच महाराष्ट्राच्याच नव्हे तर देशाच्या विकासामध्ये रयत शिक्षण संस्थेचे महत्वाचे स्थान आहे. रयत शिक्षण संस्थेच्या छोट्या रोपट्याचे रूपांतर आज एका मोठ्या वटवृक्षात झाले असून त्यास अनेक फांद्या फुटलेल्या आहेत. ''स्वावलंवी शिक्षण हेच आमचे ब्रीद'' या ब्रीद वाक्यातून कर्मवीरांचा शैक्षणिक दृष्टिकोन स्पष्ट होतो. कर्मवीरांनी घालून दिलेल्या नैतिक मुल्यांच्या संदर्भात केलेल्या कार्याचा उहापोह पुढीलप्रमाणे करता येईल.

**श्रमप्रतिष्ठा :-**

भाऊरावांनी 'श्रम' हे सर्वात श्रेष्ठ मानले. कोणत्याही समाजाची प्रगती व्हावयाची असेल तर श्रम महत्त्वाचे आहे. कोणतेही काम करताना लाज न बाळगता स्वत:ला झोकून देऊन कष्ट केले पाहिजे. हा आदर्श कर्मवीरांनी बहुजनांना दिला. 'केल्याने होत आहे रे, आधी केलेची पाहिजे' या म्हणीनुसार प्रथम आण्णांनी श्रम केले मग सांगितले. श्रमातून कामाचे महत्त्व कळते. श्रम माणसाला प्रतिष्ठा मिळवून देते, श्रमाबद्दलचे संस्कार, आदरयुक्त भावना हा गुण विद्यार्थी जीवनामध्ये आला पाहिजे, असे त्यांचे मत होते. 'कमवा व शिका', 'स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद' ही तत्त्वप्रणाली रयत शिक्षण संस्थेत प्रत्यक्षात अमलात आणली. आज अनेक विद्यापीठात व महाविद्यालयात ही आदर्श योजना राबविली आहे.

**राष्ट्रप्रेम :-**

राष्ट्रप्रेम प्रत्येक व्यक्तीच्या रक्ता-रक्तात हवे. स्वातंत्र्यवीर सावरकर, महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, छत्रपती शाहू महाराज, महात्मा फुले आणि कर्मवीर भाऊराव पाटील हे महापुरूष राष्ट्रप्रेमाने भारावलेले होते. त्यांच्या नसानसात राष्ट्रभक्ती भिनली होती. त्यांनी तळागाळातील लोकांना पुढे आणले. दलित व पददलितांच्या सर्वांगीण विकासासाठी अहोरात्र प्रयत्न केले. कर्मवीरांनी बहुजन विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच राष्ट्रप्रेमाचे धडे गिरवायला लावले. थोडक्यात कर्मवीर हे सर्वसामान्यांना 'शैक्षणिक दृष्टी' देणारे क्रांतीवीर होते.

**स्त्री-पुरूष समानता :-**

कर्मवीर भाऊराव पाटील व लक्ष्मीबाई पाटील या उभयतांनी स्त्री-पुरूषांसाठी चळवळ उभी केली. समाजातील प्रत्येक कुटुंबातील स्त्री शिकली पाहिजे तरच ते कुटुंब सुखी व संपन्न होईल असा विश्वास या उभयतांना होता. यादृष्टीने त्यांनी प्रयत्न केले. १९४२ मध्ये रयत शिक्षण संस्थेमध्ये जिजामाता अध्यापिका विद्यालय स्थापन केले. तसेच भिमाबाई आंबेडकर यांच्या स्मरणार्थ एक माध्यमिक विद्यालय सुरू केले. सावित्रीबाई फुले, रमाबाई रानडे या स्त्रियांच्या प्रमाणेच लक्ष्मीबाई पाटील यांनी सर्व जाती-धर्म विसरून सर्व स्त्रियांना एकत्र केले व ज्ञानदानाचे काम केले. कर्मवीरांनी आपल्या अनेक शाळांना, बोर्डिंगना महापुरूषांची नावे दिली. स्त्री-पुरूष समानतेबद्दल नवविचारांचे बीजारोपन प्रत्यक्ष केले. कर्मवीर हेच महाराष्ट्राचे खरे शिल्पकार आहेत.

**बहुजनांच्याबद्दल कळवळा :-**

कर्मवीरांना लहानपणापासूनच अस्पृश्य समाज, बहुजन समाज यांच्याबद्दल अतिव कळवळा होता. बहुजनांची मुले शिकली पाहिजेत आणि स्वत:चे कुटुंब उत्तम सांभाळले पाहिजे, हे त्यांनी स्वप्न प्रत्यक्षात पूर्ण केले. आज रयत शिक्षण संस्थेत अनेक जाती-धर्माचे लोक गुण्यागोविंदाने काम करताना दिसतात. तसेच अठरा पगड जाती-धर्माचे विद्यार्थी शिकत असलेले दिसतात. शिक्षणाची गंगा आण्णांनी खेड्यापाड्यापासून ते शहरापर्यंत पोहोचवली. यातूनच कर्मवीरांचा बहुजनांबद्दलचा कळवळा व्यक्त होतो.

**वक्तशीरपणा :-**

कर्मवीर भाऊराव पाटील यांचा प्रत्येक क्षेत्रात वक्तशीरपणा होता. ते स्वत: हाती घेतलेले कोणतेही काम वेळेतच पूर्ण करीत असत. आजचे काम आजच करीत असत. तसे विद्यार्थ्यांनाही सांगत असे. कर्मवीरांनी शिक्षणाचे कार्य बोर्डिंगमधील विद्यार्थ्यांपासूनच सुरू केले. 'वेळ' ही कोणासाठी थांबत नाही हे विद्यार्थ्यांना पटवून सांगत असत. मोठी ध्येये मनात बाळगावी आणि त्यादृष्टीने आपले प्रयत्न चालू ठेवले पाहिजेत. त्यासाठी प्रथम वेळेचे नियोजन करता आले पाहिजे.

**वैज्ञानिक दृष्टिकोन :-**

आज सर्वच विज्ञानाच्या क्षेत्रात प्रगती झालेली दिसते. पण अजूनही समाजात अज्ञान, अंधश्रद्धा, रूढी-परंपरा दिसून येतात. माणसाला माणूस न म्हणणारी काही बंधने ह्या देशातील कर्मठ समाजकंटकांनी निर्माण केली. त्याला मूठमाती देण्याचे कार्य कर्मवीरांनी केले. शिक्षणाच्या माध्यमातून कृतीने करून दाखविले. 'ज्ञान' हा माणसाचा तिसरा डोळा आहे, हे कर्मवीरांनी विद्यार्थ्यांना पटवून दिले.

**सर्वधर्म सहिष्णूता :-**

'माणूस' ही एकच जात आणि 'मानवता हाच धर्म' ही आदर्श विचार ज्योत कर्मवीरांच्या जीवन दृष्टीत रूजली होती. कर्मठ लोकांच्या विरोधाला न जुमानता वसतिगृहे, शाळा, महाविद्यालये सुरू केली. कर्मवीरांच्या व्यक्तिमत्त्वाला धर्मातील एकात्मता, स्वातंत्र्य आणि समता इत्यादी मुल्यांचे हुबेहुब दर्शन होते. महात्मा गांधी, छत्रपती शाहू महाराज यांच्या विचाराने भारावलेले व्यक्तिमत्त्व म्हणजे कर्मवीर आण्णा होय. कर्मवीरांनी समता, स्वातंत्र्य आणि बंधुभाव या आदर्श मूल्यांची जाणीव करून दिली. देव दगड धोंड्यात नाही, तर तो माणसाच्या हृदयात आहे हे आण्णांनी पटवून दिले.

अशा रितीने कर्मवीरांनी फक्त विद्यार्थीच घडविले नाहीत; तर त्याबरोबर समाजाला एक आदर्श घालून दिला आहे. शिक्षण हे सर्वांना मिळावे, जात कोणतीही मानू नये. श्रमाची लाज बाळगू नये आणि आपण सर्व एकच आहोत हा आदर्श विचार त्यांनी समाजात रूजविला. आज रयत शिक्षण संस्थेत अठरा पगड जाती-धर्माचे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत तसेच सेवकही काम करीत आहेत. या सर्वांचे श्रेय कर्मवीर आण्णांना द्यावे लागेल. आयुष्यभर जनसामान्यांमध्ये शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी झटलेला या कर्मवीरांच्या जीवनाची अखेर १९५९ मध्ये झाली. कर्मवीरांच्या या आदर्श विचारांचा ठसा मानव पृथ्वीतलावर आहे; तोपर्यंत राहिल असा विश्वास मला वाटतो.

❖ ❖ ❖ ❖

आयुष्य म्हणजे पत्त्यांचा खेळ
चांगली पानं मिळणं.
आपल्या हातात नसतं
पण मिळालेल्या पानांवर
चांगला डाव खेळणं.
यावर आपलं यश
अवलंबून असतं.....

आयुष्य पण...
एक रांगोळीच आहे.
ती किती ठिपक्यांनी काढायची
हे नियतीच्या हातात असले तरी
तिच्यात कोणते व कसे
रंग भरायचे
हे आपल्या हातात असते.

तांदळातील आणि आयुष्यातील
खडे बाजूला करताना
किती कमी होतात त्याचा विचार करू नका....
जे शिल्लक राहतात त्यांना सांभाळा.

**कु.पूनम सूर्यवंशी**
बी.ए.भाग-१

व्यक्तिचित्रण

# रयतमाऊली सौ.लक्ष्मीबाई भाऊराव पाटील

**कु.स्नेहल संजय वायदंडे,** वी.ए.भाग-३

''थोरांची आठवण ही त्यांची कधीही न संपणारी पूजा असते'' असे थॉमस कार्लाईल यांनी म्हटले आहे. सौ.लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांची पूजा म्हणजे शालीनता, सोशिकता, चारित्र्य, प्रेम आणि त्यागाची पूजा आहे. लक्ष्मीबाई पाटील या कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पत्नी. एक आदर्श पत्नी, आदर्श सून, आदर्श वहिनी, आदर्श नणंद आणि आदर्श माता या सर्व भूमिका एकाच वेळी जगणारी स्त्री म्हणजे लक्ष्मीबाई पाटील.

टाकून अवघा तोल तुझ्यावर
ढगाढगातून चालायचे.
कुंपण तारांवरून विजेच्या
खुशाल पाऊल टाकायाचे
तूच लाविली ओढ अशी ही
धूळ निघाली उंच उंच वर
गळले पायांमधले घुंगरू
सुटले जमिनीपासून पाऊल.

यावरून लक्ष्मीबाई किती उंचीवर पोहचल्या होत्या हे लक्षात येते.

सौ.लक्ष्मीबाई पाटील यांचा जन्म ७-६-१८९४ रोजी कुंभोज या गावी झाला. या गावी कुंभेश्वर महादेवाचे मंदिर असून त्याच्यावरूनच कुंभोज हे गावाचे नाव पडले. कुंभोज गाव हे वारणा नदीच्या काठी बाहुबलीच्या डोंगराच्या पायथ्याशी वसलेले आहे. लक्ष्मीबाई या बाहुबलीच्या परम उपासक होत्या. लक्ष्मीबाई या जैन समाजातल्या होत्या. त्यांचे वडील आण्णाप्पा पाटील आसतकरी शेतकरी होते. योगायोगाने भाऊराव पाटील यांचे आजोळ हे कुंभोज होते. गंगामातेने एका सुपुत्राला जन्म दिला होता. २२ सप्टेंबर १८८७ म्हणजेच अश्विन शु.५ - ललिता पंचमी या शुभदिनी रयतेच्या सुपुत्राचा जन्म झाला.



> *प्रत्येक यशस्वी पुरुषामागे एका स्त्रीचा हात असतो. त्याप्रमाणेच भाऊरावांच्या या यशामागेही लक्ष्मीबाईचा मोठा हात किंवा वाटा होता. कर्मवीर भाऊराव पाटील यांची महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्रातील उंची सह्याद्री एवढी उंच आहे. या सह्याद्रीच्या सावलीमध्येच त्या दडून गेल्या.*

लक्ष्मीबाई या आई-वडिलांच्या अतिशय लाडक्या होत्या. त्या काळी लहान वयातच विवाह होत असत. लक्ष्मीबाई व भाऊराव पाटील यांचा विवाह समारंभ १९१२ साली धुमधडाक्यात साजरा केला. भाऊराव पाटील यांनी 'श्री शाहू छत्रपती बोर्डिंग हाऊस' नावाचे वसतिगृह सुरू करून शैक्षणिक कार्याला सुरूवात केली. लक्ष्मीबाई पाटील वसतिगृहात रहात होत्या. त्यांना सारेजण 'वहिनी' म्हणत असत. भाऊराव पाटील यांचे बंधुही वसतिगृहात रहात होते. ते लक्ष्मीबाईना 'वहिनी' म्हणत. त्यांची मुलेही त्यांना 'वहिनी' म्हणूनच संबोधू लागले. अखेरपर्यंत त्या सर्वांच्या 'वहिनी' राहिल्या. 'रयतेच्या' वहिनी झाल्या.

भाऊरावांच्या आयुष्याला कलाटणी देणारी एक घटना घडली. पाटलांच्या घरी पाहुणे मंडळी आलेली होती. तेव्हा पाहुण्यांनी पायगोंडा पाटलांना विचारले की, चिरंजीव काय काम करतात. त्यावर वडील म्हणाले की, काही काम करीत नाही. फक्त दोन वेळचे जेवण करतो आणि गावभर फिरतो. बायकोच्या देखत म्हणजे लक्ष्मीबाईच्या देखत झालेला अपमान भाऊरावांच्या जिव्हारी लागला. लक्ष्मीबाईच्या डोळ्यात पाणी आले. लक्ष्मीबाईचे अश्रु भाऊरावांच्या ताटात पडले. भाऊराव तडक ताटावरून उठले आणि निश्चय केला 'काहीतरी करून दाखवलेच पाहिजे आणि ते घराबाहेर पडले.' स्त्री साध्वीचे अश्रू हे अतिशक्तिशाली असतात असे म्हटले जाते. पतिनिष्ठ सीतेच्या अश्रूंनी 'रामायण' घडविले व साध्वी द्रौपदीच्या अश्रूंनी 'महाभारत' घडविले. असा इतिहास आहे आणि लक्ष्मीबाईच्या अश्रूंनी भारत देशात नामवंत रयत शिक्षण संस्था स्थापन झाली. त्यांच्या अश्रूंनी जणू 'रयतेचेच रामायण' लिहिले.

बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी भाऊराव अनवाणी हिंडत असत. ते सर्व जातिधर्माच्या मुलांना शिक्षणाकरिता सातान्यात आणीत असत. भाऊरावांच्या अनुपस्थितीत संस्थेचा, वसतीगृहाचा रामरगाडा त्यांच्या धर्मपत्नी लक्ष्मीबाई सांभाळीत असत. बाहेरची कामे भाऊराव पाहत असत आणि अवघड जबाबदारीची कामे लक्ष्मीबाई सांभाळीत असत. लक्ष्मीबाई अत्यंत त्यागी वृत्तीच्या होत्या. सोशिक वृत्तीच्या होत्या. वसतीगृहातील मुलांची काळजी त्या स्वत: पोटच्या मुलांसारखी घेत असत. तो काळ सनातनी स्पृश्यास्पृश्यतेच्या पराकोटीचा काळ होता. त्यामुळे जनता त्यांच्याकडे तुच्छतादर्शक नजरेने पाहत. ऐहिक सुखाचा विचार न करता पतिकार्याच्या मागे त्या सावलीप्रमाणे उभ्या राहिल्या. उभ्या आयुष्यात भाऊरावांनी संपत्तीचा मोह कधीच धरला नाही. धर्मपत्नीचे नाव 'लक्ष्मी' एवढेच पण नाव सार्थ करणारी लाख मोलाची 'लक्ष्मी' होती.

वसतीगृहातील मुले निरनिराळ्या गावांतील होती. आपले गाव, आईवडिल सोडून शिक्षणासाठी आलेल्या मुलांना घरचे प्रेम देणे हे लक्ष्मीबाईचे मुख्य काम. ज्या लक्ष्मीबाई सुरवातीच्या काळात 'शिवू नका' असे म्हणत. त्याच लक्ष्मीबाईमध्ये शिवाशिवीचा विचार नाहीसा झाला. मुलांचे जेवण झाल्याशिवाय स्वत:चे जेवण घेत नसत. आण्णांच्या सर्वधर्म समभाव, गरीब-श्रीमंत भेद नष्ट करणे या विचारांचा पगडा त्यांच्यावर पडला होता. एकदा तर वसतिगृहातील एका विद्यार्थ्याने आत्महत्येचा प्रयत्न केला. त्याला वाचविण्यासाठी लक्ष्मीबाई तहानभूक विसरून दिवसरात्र त्याच्याजवळ राहिल्या.

वसतिगृहासाठी व त्यातील विद्यार्थ्यासाठी त्या अहोरात्र झटत असत. कोणी विचारले की, तुम्हाला मुले किती तर त्या अभिमानाने सांगत की, वसतिगृहातील मुले सर्व माझीच आहेत.

वसतीगृहाच्या खर्चाची मोठीच ओढाताण असे. वसतीगृह चालवण्यासाठी सतत पैसे लागत. लक्ष्मीबाईनी माहेरहून आणलेले सर्व दागिने भाऊरावांनी विकले होते. एकदा एक करूणाजनक प्रसंग घडला. भाऊराव परगावी गेले होते. वसतीगृहातील धान्य संपलेले. मागील थकबाकी असल्यामुळे उधार देण्यास कोणी तयार नव्हते. वसतीगृहाचा एक विद्यार्थी आप्पालाल शेख लक्ष्मीबाईकडे गेला व त्याने सर्व अडचण सांगितली. लक्ष्मीबाई संचित झाल्या. त्यांच्या मनाची ओढाताण झाली. त्या घरात गेल्या आणि त्यांचा शेवटचा दागिना मंगळसूत्र काढून त्याची पुडी बांधली व ती त्या विद्यार्थ्याजवळ देऊन त्या म्हणाल्या, वाळ हे मोड आणि त्याचे धान्य आण आणि स्वयंपाक करून सर्वजण जेवून घ्या. वसतीगृहातील मुलांचे डोळे भरून आले. तेव्हा त्या म्हणाल्या कि, 'भाऊराव हेच माझे खरे मंगळसूत्र आहेत.' भाऊराव आल्यानंतर त्यांना हा सर्व प्रकार समजला त्यांना गहिवरून आले. भाऊराव लक्ष्मीबाईच्या आठवणीत सांगतात की, माझी पत्नी लक्ष्मी ही एक समर्पित जीवन जगली. मी समाजाचे ऋण फेडत आलो पण मी माझ्या पत्नीचे ऋण फेडू शकलो नाही.

लक्ष्मीबाई पाटील या कर्मवीर भाऊराव पाटील या महामानवाच्या पत्नी म्हणून जगल्या. असं म्हंटल जात की, प्रत्येक यशस्वी पुरुषामागे एका स्त्रीचा हात असतो. त्याप्रमाणेच भाऊरावांच्या या सर्व यशामागेही लक्ष्मीबाईचा मोठा हात किंवा वाटा होता. कर्मवीर भाऊराव पाटील यांची महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्रातील उंची सह्याद्री एवढी उंच आहे. या सह्याद्रीच्या सावलीमध्येच त्या दडून गेल्या. ३० मार्च १९३० रोजी गुढीपाडव्याच्या आदल्या दिवशी लक्ष्मीबाई अनंतात विलीन झाल्या. ज्याच्यावर मायेची सावली धरली, त्या माऊलीची सर्व लेकरे शोकाकुल झाली. अशा या माऊलीसाठी फक्त म्हणावे वाटते,

प्रेम अर्पावे सर्वांना, माय फक्त हेच जाणे,
दिन अनाथ लेकरा भरविले घास तिने.
भुकेजल्या पोरांसाठी विकी सारे सोने-नाणे
सौभाग्याचा अलंकार तोही टाकिला विकून,
अरे ! आभाळाएवढे हिला कुणी दिले मन.
अशा या माऊलीला माझा कोटी-कोटी प्रणाम !

❖ ❖ ❖

व्यक्तिचित्रण

# 'ज्ञानपीठ' पुरस्कारप्राप्त-भालचंद्र नेमाडे

कु.श्रद्धा पवार, बी.ए.भाग-२

*भालचंद्र नेमाडे यांना ह.ना.आपटे पुरस्कार, यशवंतराव चव्हाण पुरस्कार, साहित्य अकादमी पुरस्कार, जनस्थान पुरस्कार, भारत सरकारचा 'पद्मश्री' हा किताब आणि आता भारत देशातील साहित्य क्षेत्रातील सर्वोच्च असा 'ज्ञानपीठ' पुरस्कार मिळाला. मराठी साहित्यातील वि.स.खांडेकर, वि.वा.शिरवाडकर (कुसुमाग्रज), विंदा करंदीकर यानंतर 'ज्ञानपीठ' मिळवणारे भालचंद्र नेमाडे हे चौथे मराठी साहित्यिक.*

खानदेशातील 'डोंगर सांगवी' या खेडेगावात एका सामान्य बहुजन कुटुंबात जन्मलेल्या भालचंद्र नेमाडे यांना, त्यांच्या साहित्यिक योगदानाबद्दल भारत देशातील साहित्य क्षेत्रातील सर्वोच्च असा 'ज्ञानपीठ' पुरस्कार मिळाला. ही घटना मराठी साहित्यातील नवलेखकांना व एकूणच मराठी भाषिकांना नवे बळ आणि प्रेरणा देणारी आहे.

मराठी साहित्याचा सातशे-साडेसातशे वर्षांचा इतिहास पहिला तर संत, पंत, तंत साहित्याने सुरवातीचा काळ भारावून गेलेला दिसतो. याच साहित्याच्या पाऊलखुणांचा मागोवा घेत पुढे काही वर्षे हे साहित्य विकसित होत राहिले. इंग्रजी साहित्याच्या स्पर्शाने नवी आव्हाने, नवी क्षितिजे हस्तगत करण्याचे बळ मराठी साहित्यात जाणवू लागले. अभिजनाच्या पाऊलखुणा जपत तर कधी सौंदर्याचा साज लेवून वास्तवाचा परीघ स्वीकारत माय मराठी नव्या आविष्कारासह आत्मभान जागलेल्या नव्या हातांच्या लेखणीने समृद्ध होत नव्या वाटा उजाळू लागली.

इ.स.१९६० हे वर्षे मराठी साहित्याला अभूतपूर्व असे वळण देणारे ठरले. अनेक समृद्ध वाङ्मयीन प्रवाह मराठी साहित्यात निर्माण झाले. वास्तववाद, देशीवाद, अस्तित्त्ववाद अशा वैशिष्ट्यपूर्ण विचारधारेतून मराठी साहित्य प्रगल्भ झाले. याच काळातील साहित्याला कलाटणी देणारी घटना म्हणजे इ.स.१९६० मध्ये प्रकाशित झालेली भालचंद्र नेमाडे यांची 'कोसला' ही कादंबरी होय.

'कोसला' या कादंबरीने मराठी साहित्याला वेगळी दिशा देऊन, जीवनाकडे बघण्याची नवी दृष्टी वाचकांना, अभ्यासकांना, समीक्षकांना दिली. देशीवादाच्या पायावर वास्तव जीवनाचा मागोवा घेत मन, बुद्धी, भावना यांना आव्हान करून प्रस्थापित साहित्य व्यवस्थेला हादरे देण्याचे काम या कादंबरीने केले.



भालचंद्र नेमाडे यांनी 'कोसला' कादंबरीतील पांडुरंग सांगवीकर या नायकाद्वारे समाज जीवनातील ढोंगी, बेगडी प्रवृत्तीवर हल्ला करत नैतिकतेचा नवा अध्याय प्रथमच साहित्यात अंतर्भूत केला. वयाच्या केवळ पंचविसाव्या वर्षी भालचंद्र नेमाडेंनी ही आगळी-वेगळी कादंबरी लिहिली.

कोणाचीही तमा न बाळगता बंडखोर वृत्तीने त्यांनी पुढे 'बिढार', 'जरीला', 'झूल' अशा एकापेक्षा एक सरस कादंबऱ्या लिहिल्या. नेमाडे यांच्या कादंबऱ्यातील पांडुरंग सांगवीकर, चांगदेव पाटील, खंडेराव हे सगळे नायक उदात्त जीवनाच्या पताका खांद्यावर घेऊन निघालेले माणसाच्याच जगातले पण वेगळ्या वाटेने निघालेले 'युगयात्री' वाटतात. सुप्रसिद्ध समीक्षक गो.म.कुलकर्णी म्हणतात, 'नेमाडेंच्या कादंबरीतून होणारे समाजदर्शन हे एक समाजचिंतन आणि संस्कृतीदर्शन आहे.' हे त्यांच्या सर्व कादंबऱ्या वाचल्यावर लक्षात येते.





कवितेच्या प्रांतात त्यांचे लेखन कमी असले तरी 'देखणी' या काव्यसंग्रहाचे वाङ्मयीन मूल्य उल्लेखनीय असेच आहे. इंग्रजी साहित्याचा त्यांच्यावरील प्रभाव त्यांच्या कादंबऱ्यातून जसा झिरपताना दिसतो. तसाच कवितेतसुद्धा जाणवतो. आशय, विषय वेगळ्या शैलीतून मांडून कवितेच्या प्रांतावरही नेमाडे यांनी आपला वेगळा ठसा उमटविला आहे.

तीस वर्षांच्या दिर्घ परिश्रमातून साकार झालेली आणि प्रकाशनाच्या आधीच चर्चेचा विषय ठरलेली 'हिंदू' ही कादंबरी मराठी भाषेला नवा सन्मान देऊन गेली. खांडेराव या पात्राच्या सहाय्याने पुरातत्वाच्या आधारे संस्कृतीतून नव्या जीवनाचे नवे शिल्प नेमाडेंनी कोरले आहे. निवेदन शैलीचा उपयोग करत संवाद साधत नव्या आशय, विषयाचे भाषेचे 'देशीकार लेणे' मराठी साहित्याला त्यांनी बहाल केले आहे.

साहित्यातील नवे शोधच नव्या जीवनाचे वेध घेत असतात. कोणतीही विचारधारा साहित्यात व्यक्त होताना तिचे साधर्म्य नव्या आव्हानांना, नवी परिमाणे वहाल करीत असतात. याच संदर्भात 'हेगेल' हा तत्वज्ञ म्हणतो 'तत्वज्ञान आणि इतिहास' यांचे अद्वैत असते. समाजाच्या अस्तित्त्व रूपासाठी 'एक तत्वज्ञान; एक विचार' अपरिहार्य असतो. तो इतिहासाच्या नसेमधून वाहत असतो. इतिहास नाकारण्याची क्रिया जशी घडते तशी नवा इतिहास घडविण्याची क्रियाही घडते.' म्हणूनच भालचंद्र नेमाडे साहित्याला सामाजिक दस्तऐवज मानतात. संस्कृती, समाज आणि मानवी जीवन याकडे ते एका सम्यक दृष्टीने पाहतात. साहित्याचा नवा इतिहास ते भूतकाळातल्या देशीवादाच्या उदात्त वैश्विक मूल्यावर मांडतात.

समीक्षा व संशोधन क्षेत्रात त्यांनी 'टिका स्वयंवर', 'साहित्याची भाषा', 'तुकाराम', 'दि इन्फ्लुअन्स ऑफ इंग्लिश ऑन मराठी : ए सोशिओलिंग्विस्टिक अॅन्ड स्टायलिस्टिक स्टडी', 'इंडो अॅंग्लीयन रायटिंग्ज : टू लेक्चर्स', 'मराठी फॉर बिगिनर्स' असे साहित्याला नवी दिशा देणारे लेखन केले.

रोप ज्या मातीत रूजते त्याच मातीचे गुणधर्म घेऊन त्याचे वृक्षात रूपांतर होते आणि तोच वृक्ष त्या मातीला घट्ट ठेवून तिचे संरक्षण करतो, असा साधा देशीवाद त्यांच्या साहित्यातून अविष्कृत होतो. पुरोगामी विचारांची मशाल घेऊन बहुजनवादी संकल्पनेतून प्रस्थापित साहित्यिकांना रोखठोक उत्तरे देत नेमाडेंनी नव्या आविष्कार शैलीने मराठी साहित्याला नवे आयाम प्रधान केले.

खडतर वाटेवरून चालताना सामाजिक द्रोहाला तोंड लागते; कारण सत्याच्या वाटा ह्या रूळलेल्या नसतात. सुरूवातीला नकार दृष्टीने त्याकडे पाहणारा समाज एक दिवस नकळत त्याच वाटेकडे पावले वळवत मार्गस्थ होतो.

नेमाडेंच्या वैविध्यपूर्ण आणि नव्याने आकाराला आलेल्या साहित्य प्रांतात देशीवादाचा नवा सांप्रदाय तयार व्हावा हेच त्यांच्या साहित्य सर्जनाचे सामर्थ्य म्हणता येईल. मान सन्मानापासून दूर असणाऱ्या भालचंद्र नेमाडे यांना ह.ना.आपटे पुरस्कार, यशवंतराव चव्हाण पुरस्कार, साहित्य अकादमी पुरस्कार, जनस्थान पुरस्कार, भारत सरकारचा 'पद्मश्री' हा किताब आणि आता भारत देशातील साहित्य क्षेत्रातील सर्वोच्च असा 'ज्ञानपीठ' पुरस्कार मिळाला. मराठी साहित्यातील वि.स.खांडेकर, वि.वा.शिरवाडकर (कुसुमाग्रज), विंदा करंदीकर यानंतर 'ज्ञानपीठ' मिळवणारे भालचंद्र नेमाडे हे चौथे मराठी साहित्यिक ठरले.

भालचंद्र नेमाडे यांच्या साहित्याचा आढावा घेतल्यास एक गोष्ट लक्षात येते. त्यांची साहित्यदृष्टी समाजजीवनाला आरपार भेदणारी आहे जी जीवनाच्या लख्ख प्रतिबिंबात क्षणभर तरी प्रत्येकाला स्वतःचा शोध घेण्यास प्रवृत्त करते. त्यांनी मराठी साहित्यात जबाबदारपणे नवी वाट चोखाळून, नवे साहित्यप्रयोग करत मराठी साहित्य समृद्ध केले आहे.

❖ ❖ ❖ ❖

माहितीपर

# राष्ट्रीय सेवा योजना : एक मुक्त व्यासपीठ

कु.ज्योती रामचंद्र कदम, बी.ए.भाग-२

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासून विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवेबाबत जागृत करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. पहिल्या शिक्षण आयोगाने (१९५०) राष्ट्रीय सेवेचा विद्यार्थ्यांसाठी स्वयंसेवी पद्धतीने अंतर्भाव करण्यात यावा अशी शिफारस केली होती. एप्रिल १९६७ मध्ये झालेल्या विविध राज्यांच्या शिक्षणमंत्र्यांच्या परिषदेमध्ये असे सुचविण्यात आले की, विद्यापीठ स्तरावर विद्यार्थ्यांना पूर्वीपासून सुरु असलेल्या एन.सी.सी. मध्ये स्वयंसेवी पद्धतीने सामील करून घ्यावे आणि त्याला पर्यायी योजना म्हणून 'राष्ट्रीय सेवा योजना' हा नवीन कार्यक्रम देण्यात यावा. असे परिषदेमध्ये सुचविण्यात आले. त्यानुसार १९६७ मध्ये झालेल्या कुलगुरुंच्या परिषदेमध्ये या शिफारशीचे स्वागत करून या योजनेचा सविस्तर विचार करण्यासाठी कुलगुरुंची विशेष समिती नेमण्यात आली. या शिफारशीनुसार केंद्रिय शिक्षण मंत्रालयाने १९६७-७० मध्ये राष्ट्रीय सेवा योजना सुरू केली. १९६९ हे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे जन्मशताब्दी वर्ष होते. गांधीजींनी राष्ट्रीय सेवा हाच धर्म मानला होता. म्हणून त्याच वर्षी राष्ट्रीय सेवा योजना सुरु करण्यात आली.

विद्यार्थ्यांचा या योजनेस चांगला प्रतिसाद मिळाला. सन १९६९ मध्ये ४०,००० विद्यार्थ्यांनी सुरु झालेल्या या योजनेमध्ये वर्षानुवर्षे वाढ होऊन सद्या ८ लाखांवर विद्यार्थी संख्या पोहोचली आहे. आता या येजनेचा विस्तार सर्व राज्यामध्ये व देशातील सर्व विद्यापीठांमध्ये झालेला आहे. विद्यार्थी, शिक्षक, आई-वडिल, पालक, शासकीय अधिकारी, शासन, विद्यापीठे, महाविद्यालये आणि सामान्य नागरिकांनीही राष्ट्रीय सेवा योजनेची गरज व महत्त्व मान्य केले आहे. या योजनेमुळे युवकांच्यामध्ये जीवनाच्या वास्तवतेची जाणीव निर्माण झाली आहे. त्यामुळे ते समाजातील प्रश्न चांगल्या प्रकारे

NATIONAL SERVICE SCHEME

> *'राष्ट्रीय सेवा योजना' हे विद्यार्थ्यांना घडवणारे मुक्त व्यासपीठ आहे. ही योजना एक आदर्श विद्यार्थी घडवणारी योजना आहे. विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम तसेच राष्ट्राची सेवा करण्याचे मार्गदर्शन या योजनेतून मिळते. विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, टापटिपपणा, नीटनेटकेपणा, वक्तशीरपणा,*

समजावून घेऊन त्यांचे विश्लेषण करू लागले आहे. त्यामध्ये १९७६-७७ पासून विविध विषयांवरील विशेष श्रमसंस्कार शिबीर म्हणजे राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्वात मोठे योगदान आहे.

'राष्ट्रीय सेवा योजनेचे' बोधवाक्य NOT ME BUT YOU म्हणजेच 'माझ्यासाठी नव्हे, आपणांसाठी' असे आहे. हे वाक्य म्हणजे लोकशाही जीवनशैलीचा गाभा आहे आणि निस्वार्थी सेवेची गरज व्यक्त करते. तसेच आपण इतरांच्या मतांचा आदर करावा असे सांगते. तसेच इतर लोकांचा सहानुभूतीने विचार करायला प्रवृत्त करते. राष्ट्रीय योजनेचे बोधचिन्ह हे कोणार्क येथील सूर्यमंदिराच्या रथचक्राच्या आधारावर तयार करण्यात आले आहे. या सूर्यमंदिराची प्रचंड चाके सृजनशीलता, संवर्धन व मुक्तीचे प्रतिकात्मक रूपाने चित्रण करतात व वेळ आणि काळ या संदर्भात जीवनाची गतिमानता दर्शवितात. चिन्हाची रचना जीवनातील विकास प्रक्रिया ध्वनीत करते. ते सातत्य व बदलाचे प्रतिक असून राष्ट्रीय सेवा योजना समाज परिवर्तन आणि उद्धारासाठी सातत्याने प्रयत्नशील राहिल असे सूचित करते.

राष्ट्रीय सेवा योजनेचे बोधचिन्ह बिल्ल्यावर छापण्यात आले आहे. समाजसेवेची वेगवेगळी कामे करीत असताना राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक हा बिल्ला लावतात. कोणार्कच्या सूर्यमंदिराच्या रथाला २४ चाके आहेत ते दिवसातील २४ तासाचे प्रतिनिधित्व करतात. प्रत्येक चाकास ८ आरे आहेत. ते दिवसातील ८ प्रहर दर्शवितात. जो कोणी हा बिल्ला लावतो त्यास हा बिल्ला जाणीव करून देतो की दिवसातील २४ तास किंवा १८ प्रहर तो राष्ट्रीय सेवेसाठी तत्पर आहे. बिल्ल्यातील लाल रंग स्वयंसेवकांमधील ज्वलंतपणा, क्रियाशीलता व उत्साहाचे प्रतिक आहे. त्यामधील गर्द निळा रंग ब्रह्मांडाचे प्रतीक आहे. या ब्रम्हांडामध्ये राष्ट्रीय सेवा योजना हा एक अत्यंत लहान भाग आहे की; जो मानवाच्या कल्याणासाठी आपला वाटा उचलण्यास सदैव तयार आहे. अशा प्रकारे लोकसेवेतून शिक्षण आणि शिक्षणातून लोकसेवा हे राष्ट्रीय सेवा योजनेचे ध्येय आहे.

राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये सामिल होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना प्रत्येक वर्षी किमान १२० तास तसेच सलग दोन वर्षाच्या कालावधीमध्ये २४० तास समाजसेवेचे काम विविध कार्यक्रमांद्वारे राष्ट्रीय सेवा योजनेच्या ध्येय धोरणानुसार करावे लागते. राष्ट्रीय सेवा योजनामध्ये स्वयंसेवकांना विविध कर्तव्ये पार पाडावी लागतात. विविध योजनांचे कार्यक्रम राबविले जातात. त्यामध्ये 'गाव दत्तक' हा राष्ट्रीय सेवा योजनेमधील अतिशय अर्थपूर्ण कार्यक्रम आहे. एखाद्या गावावर किंवा ग्रामीण भागावर लक्ष केंद्रित करणे अधिक फायद्याचे असते. या कार्यक्रमाची पहिली पायरी म्हणून विविध गावांमध्ये व ग्रामीण भागामध्ये संपर्क प्रस्थापित करणे आवश्यक असते. त्यामुळे ज्या गावामध्ये नेतृत्व सुविकसित आहे असे गाव निवडण्यास मदत होते. म्हणजेच योग्य नेतृत्व असणारे गाव निवडणे हे जास्त महत्त्वाचे ठरते. ज्यामुळे पाठपुरावा आणि मूल्यमापन करण्याची दुप्पट खात्री असते.

राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये 'शिबीर' हा एक महत्त्वाचा कार्यक्रम आहे. विशेष शिबीरे महाविद्यालय किंवा विद्यापीठ पातळीवर सात दिवसांच्या कालावधीसाठी उन्हाळ्याच्या आणि हिवाळ्याच्या सुट्टीमध्ये ग्रामीण भागात, शहरी झोपडपट्टीमध्ये किंवा दलित वस्त्यामध्ये आयोजित केली जातात. साधारणत: शिबिरामध्ये ५०-१०० विद्यार्थी संख्या असते. मोठ्या स्तरावर आंतरमहाविद्यालयीन आणि राज्यस्तरीय शिबिरे सुद्धा वेळोवेळी आयोजित केली जातात. शिबिरार्थी शिबिरातील जीवनचर्येचा आनंद उपभोगतात. चांगल्या नागरिकत्वाचे गुण शिकतात आणि समाज सेवा देऊ करतात. अशी शिबिरे 'विकासासाठी युवक' या खास प्रकल्पांतर्गत आयोजित केली जातात.

'राष्ट्रीय सेवा योजना' म्हणजे केवळ गाव स्वच्छ करणे किंवा गटारे स्वच्छ करणे नव्हे. राष्ट्रीय सेवा योजना म्हणजे आपल्यातील कलागुणांना, कल्पनांचा विचार प्रकट करण्यासाठी मिळालेले एक मुक्त व्यासपीठ आहे. सात दिवस घराबाहेर राहुन जगाचा अनुभव देणारी ती एक आदर्श शाळाच आहे. पण या शाळेमध्ये आपणच शिक्षक असतो आणि आपणच विद्यार्थी असतो.

महिला महाविद्यालय उंब्रज येथील 'राष्ट्रीय सेवा योजना' ही एक आदर्श विद्यार्थी घडवणारी योजना आहे. या शिबिरात काम करणारे प्रत्येक प्राध्यापक हे या योजनेला जणू आपले घर समजतात. महिला महाविद्यालय उंब्रजच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने 'शाश्वत व सर्वागीण ग्रामीण विकास' हे ब्रीदवाक्य घेऊन हे विशेष श्रमसंस्कार शिबीर ऐतिहासिक मौजे भोसलेवाडी ता.कराड, जि.सातारा येथे संपन्न झाले. या योजनेत विविध विषयावर व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली होती. त्यामध्ये थोडसं समाजासाठी, 'स्वच्छ भारत, सुंदर भारत' ''बदलते शैक्षणिक धोरण'' ''जलसंवर्धन ही काळाची गरज'' ''महिला आरोग्य'' असे विविध कार्यक्रम आयोजित करून सर्वागीण ग्रामीण विकास साधण्याचा प्रयत्न केला आहे.

'राष्ट्रीय सेवा योजना' हे विद्यार्थ्यांना घडवणारे मुक्त व्यासपीठ आहे. ही योजना एक आदर्श विद्यार्थी घडवणारी योजना आहे. विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम तसेच राष्ट्राची सेवा करण्याचे मार्गदर्शन या योजनेतून मिळते. विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, टापटिपपणा, नीटनेटकेपणा, वक्तशीरपणा, स्त्री-पुरुष समानता या मूल्यांची बीजे रोवण्याचे काम हे शिबिर करते. शिबिरामुळे ग्रामीण जीवनाचा एक आनंद मिळतो. तसेच ग्रामीण लोकांचे विविध प्रश्न, त्यांची दु:खे जवळून पाहता येतात व या जगाशी या निमित्ताने एक नवे नाते जोडले जाते. शिबिरात सातही दिवस भरगच्च कार्यक्रम असतात. कार्यक्रमांच्या अशा नियोजनामुळे व्यवस्थापन कसे करावे याचे शिक्षण मिळते. या योजनेमुळे विद्यार्थ्यातील कलागुणांना वाव मिळतो. पथनाट्य, नाटक यामुळे विद्यार्थ्यांना त्याच्यात कोणते गुण आहेत याचे ज्ञान मिळते. शिबिरात

दुपारच्या सत्रात होणाऱ्या व्याख्यानांमुळे अनेक विद्वान व तज्ञ व्यक्तींचा सहवास लाभतो. त्यामुळे सकारात्मक विचार करण्याची प्रेरणा मिळते. आपल्यातील गुण कळल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण होते.

राष्ट्रीय सेवा योजनामुळे विद्यार्थ्यांनी स्वत: कार्यक्रमाचे नियोजन व व्यवस्थापन करण्याचे एक कौशल्य येते. नेतृत्व गुण, स्टेजवर जाऊन बोलण्याची भीती जाते. माणसातील माणुसकी जागी होते. एक आदर्श व्यक्तिमत्त्व घडते. राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये आपल्या घरातील सर्व समस्या बाजूला ठेवून सर्व शिक्षक, शिक्षिका तसेच शिपाई काका सहभागी होतात. मुलांच्यासमोर एक आदर्श ठेवण्याचे काम आमचा प्राध्यापक वर्ग करत असतो. घर सांभाळण्याचे तंत्र आणि मंत्र, जीवनात कसे वागावे, यशोशिखर कसे सर करावे हे आम्हाला या योजनेमुळे आत्मसात होते.

राष्ट्रीय सेवा योजनेची सुरूवात ही प्राणायाम, योगासने या कार्यक्रमाने होते. आजच्या या धावपळीच्या युगात व्यायाम, योगासने हे दुर्मिळ होत चालले आहे. पण हे शिबिर योगासनाचे धडे गिरवत मुलांच्या शारीरिक वाढीसाठी, चैतन्य निर्माण करण्यासाठी नेहमी तत्पर असते. पथनाट्याच्या माध्यमातून समाजात घडणाऱ्या घटनेचे आपण एक भाग आहोत याचे भान जागे होते. आज राष्ट्रीय सेवा योजनेमुळे खेड्यापाड्यात शिक्षणाची गंगा वाहू लागली आहे. माझ्या मित्र-मैत्रिणींनो; आपणही या सेवेत सहभागी होऊन राष्ट्राच्या विकासात हातभार लावूया. या शिक्षणाच्या प्रवाहातून शिक्षण घराघरात पोचवू. व्यायाम-योगासने करून आपल्या व्यक्तिमत्त्वाला नवी चमक देऊ. तुम्ही या योजनेत सहभागी व्हा म्हणजे समजेल. राष्ट्रीय सेवा योजना 'व्यासपीठ' का आहे ते सर्व एकत्र येऊन या सेवेमध्ये सहभागी होऊन राष्ट्राला प्रगतीपथावर नेण्यासाठी नक्कीच स्वयंस्फूर्तीने सहभागी होऊन हातभार लावू आणि मग आनंदाने म्हणूया.

हम सब मिलकर देश का
अपने जग में नाम जगायेंगे
एन.एस.एस का परछम
लेकर आगे बढ़ते जायेंगे ।

❖ ❖ ❖ ❖

## सत्य

देवाने आपल्या शरिराची
रचनाच अशी केलेली आहे
की; आपण स्वत:ची पाठही
थोपटू शकत नाही आणि
स्वत:ला लाथही मारू
शकत नाही. म्हणूनच;
माणसाच्या जीवनात
हितचिंतकांची आणि निंदकांची
आवश्यकता आहे.

कु.पूजा पाटील
बी.ए.भाग-३



**सुट्टे पैसे**

कंडक्टर : ज्याच्याकडे सुट्टे पैसे नाहीत, त्यांनी बसमधून लगेच खाली उतरा.
वृद्ध प्रवासी : साहेब, तुमच्याकडे सुट्टे पैसे आहेत ?
कंडक्टर : नाहीत.
वृद्ध प्रवासी : मग सगळ्यात अगोदर तुम्ही खाली उतरा.

❖ ❖

शनिवारचा दिवस असतो. चिंटू अंथरूणात लोळत पडलेला असतो. तेवढ्यात बाबा येतात व म्हणतात,
''चिंटू, उठ शाळेला जायचं नाही का ? त्यावर चिंटू म्हणतो.
काय हो बाबा, तुम्हीच म्हणत नाही का ?
उद्या करायची कामं आज करायची व ती आत्ताच करायची.
म्हणून मी उद्याची सुट्टी आज घेतोय.''

❖ ❖

''रागाच्या भरात मी तिच्यावर छत्री फेकली.''
बाळकराम घाबरत घाबरत पोलिस स्टेशनमध्ये सांगू लागले.
''नाही ना, नुसतीच जखमी झालीय, म्हणून तर मी पळालो आणि थेट इथे आलो.''

कु.पूजा पाटील
बी.ए.भाग-३





व्यक्तिचित्रण

# संवेदनशील कवी : मंगेश पाडगांवकर

कु.अपर्णा वापूराव यादव, बी.ए.भाग-३

*पाडगांवकरांचे काव्य वाचले कि काव्यरसीकांना ''जगून ज्याची वाट पाहिली, ते सुख आले दारी.....'' असे वाटून आनंद होतो. 'विंदा करंदीकर', 'वसंत बापट' आणि 'पाडगांवकर' यांचे त्रिकूट महाराष्ट्रभर केलेल्या काव्य-जागरणाच्या आठवणींमुळे. परंतू त्यांच्या कवितेची जातकुळी वेगळी होती. जीवन हे सुंदर आहे आणि ते जगले पाहिजे हे आत्मियतेने सांगत होते.*

''लाखो शिंपले शोधल्यानंतर,
एक मोती सापडतो......
आणि त्याचप्रमाणे,
लाखो लोकांमध्ये एकच
कवी भेटतो...... !''

या जगामध्ये लोक प्रचंड आहेत आणि त्याचप्रमाणे त्यांच्या विचारशैलीही वेगवेगळ्या आहेत. आणि या लोकांमध्येच काही 'कवी' लपलेले असतात. लोक गर्दीमध्ये घुराले कि फक्त दंगा आणि इतरांना काहीतरी बोलत असतात. त्या गर्दीतून प्रत्येक जण आपली वाट शोधून बाहेर पडत असतो. म्हणतात कि, 'गर्दीला डोकं नसत' परंतू या गर्दीला 'कवी' जेव्हा पाहतो तेव्हा त्यावर छानशी कविता लिहितो. रसिकांना अनुभवायला देतो. हा फरक असतो 'सामान्य माणूस' आणि 'कवी' मध्ये, त्याचप्रमाणे एखाद्या फुलाकडे पाहताच आपण फक्त ते कसे आपणांस मिळेल याचा विचार करतो. त्याला त्या झाडापासून वेगळे करतो. परंतू 'कवी' हा त्या फुलावरही नव्हे तर त्याच्या प्रत्येक पाकळीवरती कविता करतो. त्या फुलाला त्या झाडापासून वेगळे केले तर त्याच्या वेदना कवीला जाणवतात. एकूणच काय तर 'कवी' हा फक्त कवी नसतो तो एक 'संवेदनशील कवी' असतो. म्हणतात ना,

''जे न देखे रवी,
ते देखे कवी......''



आणि आज मी अशाच एका 'अनमोल', 'पावित्र्याने भरलेल्या', 'रसाळयुक्त', 'संवेदनशील', 'माणसाला जीवनात प्रेमाने जगायला शिकविणारे' अशा विविध गुणांनी युक्त असलेल्या 'कविवर्य, मंगेश पाडगावकर' यांच्याविषयी लिहिताना माझ्या शब्द कोशातील शब्द कमी नक्कीच पडतील. कारण ते एक प्रतिभेचे देणे असणारे कवी होते. जगायला शिकविणारे कवी होते. जन्मावर प्रेम करायला शिकविणारे कवी होते. हे जग कवितांचे, गाण्यांचे, ललित लेखांचे आणि मीरा-कबीराच्या भाषांतरांचे..... मराठी काव्य रसीकांचे. ज्यांच्या प्रतिभेच्या धारानृत्याने मराठी साहित्य रसिकांना गेली साहा दशके रिझविले, सुखाविले तसेच वृत्तबद्ध करण्यापासून नादवंत बोलगाण्यापर्यंतच्या कवितेच्या विविध रंगरूपांतून जीवनाचे आनंदमयी तत्त्वज्ञान मांडणाऱ्या या कविश्रेष्ठाने मराठी मातीला कवितेचा उत्सव साजरा करायला शिकविले. अशा महान 'कवी मंगेश पाडगावकर' यांचा जन्म १० मार्च १९२९ मध्ये वेंगुर्ले येथे झाला. 'मराठी' आणि 'संस्कृत' हे दोन विषय घेऊन त्यांनी एम.ए. केले. त्यानंतर त्यांनी दोन वर्ष 'मुंबई' येथे 'रूईया' महाविद्यालयात मराठीचे अध्यापक म्हणूनही काम केले. त्याचप्रमाणे १९५३

ते १९५५ हे दोन वर्षे त्यांनी 'साधना' या साप्ताहिकाचे संपादक म्हणून काम केले. एवढेच नव्हे तर आणखी त्यांनी 'मुंबई' येथे आकाशवाणीवर १९६४ ते १९७० या कालावधीत निर्माता म्हणूनही आपल्या कामाचा जोरदार ठसा उमटविला होता.

कविवर्य, मंगेश पाडगांवकर यांची कविता, गीते म्हणजे जणूकाय मोगऱ्याची टपोरी फुलंच. पाडगांवकरांची कविता ही नेहमी 'ताजी', 'तरल', आणि 'लोकांच्या ओठांमध्ये राहिल' अशी रचना केली. कवितां-गीतामधील आशयघनता सातत्याने टिकविलेला हा श्रेष्ठ कवी ! 'अभिजात', 'कविता', 'गीत', 'बालगीत', 'संगीतीका', 'बोलगाणी', 'वात्रंटिका' असे नाना प्रकार त्यांनी फार समर्थपणे हाताळले होते.

मंगेश पाडगांवकर हे संस्कारक्षम वयात प्रा.वा.ल.कुलकर्णी, कविवर्य बा.भ.बोरकर, रावसाहेब पटवर्धन यांच्या सहवासात, संगतीत ते मनोमन सुखावले.

प्रा.वा.ल.कुलकर्णी यांनी पाडगांवकरांना 'कविता', 'गीत' यामधला फरक सूक्ष्मपणे समजविला. त्याचप्रमाणे बा.भ.बोरकर यांनी पाडगांवकरांच्या बाळमुठीत समर्थ शब्दकलेचा एक केशरी तुरा दिला आणि पटवर्धन बंधूंनी शब्दांच्याही पलिकडे एक सामर्थ्याचा पल्ला असतो याचं भान दिलं. अशा खानदानी संस्कारात मंगेश पाडगावकर यांची 'राजमुद्रा' तयार झाली. गीत-गाण्याचं प्रयोजन सांगताना पाडगांवकरांनी म्हटले आहे -

''आपल्या हाती नसती काही हे समजावे.
कुणी जर दिले हात आपुले हाती घ्यावे.
कधीच नसतो मातीवरती हक्क आपुला.
पाण्याने जर लळा लाविला रूजून यावे.''

ग्रांट रोडला जिना हॉल आहे. तिथे सांस्कृतिक कार्यक्रम होत असत. तेथून पाडगांवकर जात होते. त्या हॉलमध्ये कविसंम्मेलन आहे असे त्यांना समजले. त्यावेळी रविकिरण मंडळाचे कवी यशवंत, कवी गिरीश तसेच सोपानदेव चौधरी, संजीवनी यासारखी कवी कविता गाऊन म्हणत. त्या कवींच्या त्या कार्यक्रमाला 'काव्यगायन' म्हणण्याची प्रथा होती. मंगेश पाडगांवकर आणि वसंत बापट यांना या संमेलनास जाण्याच्या इच्छा प्रकट झाल्या आणि ते गेले. पाडगांवकर आणि बापट यांनी मात्र कमालच केली. पाडगांवकरांनी 'जिप्सी' आणि 'लारालप्पा' तर बापट यांनी 'बिजली' व 'दख्खनराणी' या कविता म्हटल्याबरोबर श्रोत्यांनी त्यांना प्रचंड असा प्रतिसाद दिला आणि य दोन कवींनी फड मारत झोकात कविता वाचल्या.

काही काळापर्यंत बा.सी.मर्ढेकर आणि त्यानंतर बऱ्या काळापर्यंत पु.शि.रेगे, सदानंद रेगे, शरदचंद्र मुक्तिबोध, इंदिर संत असे श्रेष्ठ कवी उत्तम कविता लिहीत होते. परंतू व्हायचं हे कि त्या कविता रसिकापर्यंत पोहचत नव्हत्या. परंतू मंगेश पाडगांवक आणि वसंत बापट यांनी मात्र निरनिराळ्या वळणाची आणि स्तरावरील देखील कविता लिहीत होते. त्या कविता अशा प्रकारच्य होत्या कि त्या रसिकांना विचार करावयास प्रवृत्त करत होत्या तसेच रसिकांना खुश, मग्न आणि आनंद देणाऱ्या अशा होत्या नव्हे तर अजूनही आहेत.

मंगेश पाडगांवकर तारूण्यात होते तेव्हा त्यांचा संसार थाटला 'साधना' साप्ताहिक मुंबईतून निघत होते. आर्थर रोड तुरुंगाजवळ 'साधना प्रेस' होती. पाडगांवकरांना येणारी काव्यवाचनाची निमंत्र यांना खूप महत्त्व होते. कारण, त्या कार्यक्रमाचे त्यांना २५-३० रूप मिळत; पण तेच तुलनेने बरेच वाटायचे.

पाडगांवकरांची काव्यप्रतिभा निरनिराळी रूपे घेऊ लागली 'सलाम' या कवितासंग्रहाने उपहासात्मक आणि समाजचिंतनप कवितेला वेगळे रूप दिले. भाषेऐवजी बोलभाषेत गमतीदार गाणी लिहिण्याचा प्रयोग त्यांनी 'बोलगाणी' यामध्ये केला. मंगे पाडगांवकरांनी अनेक भावगीते लिहून त्याला अनेक थो संगीतकारांच्या चाली देऊन एकूणच गीतगायनाचा दर्जा वाढविला कवितांतून ते जसे घरोघरी पोहचले तसेच या गीतातून काना-काना आणि मनामनात पोहचले. गीते ही सर्वांच्या ओठी खेळत होतीच परं हळूहळू ती ओठातून पोटात जाऊन व नंतर हृदयात घर करून बसली पाडगांवकरांनी अनेक तरूण-तरूणींना आपल्या प्रिय व्यक्तिवर आणि स्वत:वर प्रेम करायला शिकविले. ''या जन्मावर, या जगण्यावर शतद प्रेम करावे'' हा त्यांचा संदेश जणूकाय महाराष्ट्राचे ब्रीद वाक्य बनले. पाडगांवकर एका गाण्याच्या कार्यक्रमाचे निवेदन करत होते समोर 'लता मंगेशकर' बसल्या होत्या. गायक अरूण दात्यांचे भा रवी दाते तबल्यावर साथीला होते. पाडगांवकर म्हटले, ''माझं आत जे 'गाणं' प्रसिद्ध होणार आहे ते लता मंगेशकरांनी म्हटले आहे.' त्यांची स्तुती पाडगांवकर करत होते. तेवढ्यात रवी दाते ओरडले ''पाडगांवकर, हे सगळं कवितेत सांगा.'' तेव्हा पाडगांवकरांनी लगे तिथल्या-तिथे रचून ओळी म्हणाले,

''ऐकता गाणे गायकाचे, वानितो त्याच्या स्वरांना......
ऐकता गाणे लताचे, मानितो मी ईश्वराला...... !''

पाडगांवकर एकदा सांगत होते. गीतांचा चांगला मुखडा सूचताना कधी-कधी खूप त्रास होतो. एकदा माझी पत्नी न्हायल्यानंतर गच्चीमध्ये कपडे वाळत घालत होती. तेव्हा वाऱ्याने तिचे ओले केस उडत होते. ते दृश्य बघून मला गीतांचा मुखडा सुचला,

''जेव्हा तुझ्या बटांना,
उधळी मुजोर वारा.....
माझा न राहतो मी,
हरवून हा किनारा......''

त्याचप्रमाणे आणखी -

''श्रावणात घननिळा बरसला'' हे गीत मी निसर्गात जाऊन लिहीले नाही. तर अगदी एका अत्यंत विसंवादी वातावरणात ते लिहिलं आहे.

१९५३ मध्ये पाडगांवकर यांचा ''निंबोणीच्या झाडामागे'' हा ललितलेख निबंध संग्रह प्रकाशित झाला. 'बोरकरांची कविता', 'विंदा करंदीकर' यांची 'निवडक कविता' हे त्यांनी संपादित केलेले काही महत्त्वपूर्ण ग्रंथ आहेत. 'जिप्सी', 'छोरी', 'उत्सव' इत्यादींमधूनही निसर्गाचे सुंदर चित्रण आपल्या डोळ्यासमोर उभे करण्याचे काम पाडगांवकरांनी केले.

''श्रावणात घननिळा बरसला'' या कवितेतून ते निसर्गातून फिरवून आणल्याची जाणीव करून देतात. तसेच 'बायबल' या ग्रंथाचा मराठी अनुवादही त्यांनी केला.

''पेला अर्धा सरला आहे'
असंसुद्धा म्हणता येतं.....
'पेला अर्धा भरला आहे'
असं सुद्धा म्हणता येतं......
'सरला' आहे म्हणायचं कि 'भरला' आहे म्हणायचं,
तुम्हीच ठरवा आता कसं जगायचं...... !''

एकिकडे कवी मंगेश पाडगांवकर हे 'शुक्रतारा मंद वारा' आणि 'श्रावणात घननिळा बरसला' यासारखी मधूर गाणी एका बाजूने मांडताना दिसतात आणि त्याचप्रमाणे दुसरीकडे ते 'सामाजिक' 'राजकिय' अशा वेगळ्या भाष्य करणाऱ्या कविता सांगतात. आणि यातूनच असे दिसून येते कि, त्यांच्या कविता या रसिकांचे मन खच्चीकरण करत नाहीत आणि त्यांच्या कविता कधीही शिळ्या होत नाहीत. त्यांच्या या प्रतिभेला सतत नवनवे उन्मेष फुटत गेले. वेगवेगळ्या बाजाची कविता त्यांनी लिहिली. असा हा कवी म्हणजे विरळाच नाही का ! आणि म्हणूनच त्या काळातील इतर कवींमध्ये पाडगांवकर हे अधिक उठून दिसतात. पाडगांवकरांना कविता या अंत:करणातून सुचतात आणि म्हणूनच ते त्यांच्या कवितातून लोकांच्या हृदयात राहतात.

पाडगांवकरांनी इंग्रजीतील 'महाभारताचा' अनुवाद मराठीत केला. तसेच शेक्सपिअरच्या नाटकाचे अनुवादही केले. पाडगांवकरांची पिढी ही दिग्गज होती. मराठीत १९४५ सालापासून 'मुक्तिबोध', 'पाडगावकर', 'करंदीकर' आणि बापट यासारखे दिग्गज होते. 'बोलगाणी' हा पाडगांवकरांचा काव्यरचनेतला वेगळा प्रयोग. 'मीरा', 'कबीर' आणि 'तुलसीदास' यांच्या कवितांचे भावानुवादही पाडगांवकरांनी अत्यंत प्रभावीपणे केले होते. पाडगांवकरांचे 'भोलानाथ', 'बबलगम' आणि 'चांदोमामा' हे त्यांचे बालकविता संग्रह प्रसिद्ध आहेत.

१९६४ मध्ये प्रकाशित झालेला 'वात्रंटिका' हा त्यांचा कवितासंग्रह पाडगांवकरांची एक वेगळी ओळख करून देणारा ठरला.

''सांग सांग भोलानाथ,
पाऊस पडेल काय......''

हे गीत त्यांनी लिहिले आणि म्हणूनच त्याचप्रमाणे,

''शुक्रतारा मंदवारा,
चांदणे पाण्यातूनी...''

हे देखील ते सहजपणे सांगतात, ही 'सजगता' आणि 'सरलता' हे पाडगांवकरांचे मोठे वैशिष्ट्य. याच वैशिष्ट्याने त्यांनी भावगीताला उंचीवर नेऊन ठेवले. मराठी वाचकाला नक्की काय हवे आहे याची पुरेपुर जाण पाडगांवकरांना होती. त्यांनी कवितेइतकेच स्वत:वरही प्रेम केले. हे त्यांच्या जगण्यातून, कवितेतून आपणांस समजते.

''पानोपानी शुभशकुनाच्या
कोमल ओल्या रेषा.....
अशा प्रितीचा नाद
अजाहत शब्दावाचून भाषा....''

हे पाडगांवकरांचे काव्य वाचले कि काव्यरसीकांना ''जगून ज्याची वाट पाहिली, ते सुख आले दारी.....'' असे वाटून आनंद

होतो. 'विंदा करंदीकर', 'वसंत बापट' आणि 'पाडगांवकर' यांचे त्रिकूट महाराष्ट्रभर केलेल्या काव्य जागरणाच्या आठवणींमुळेच. परंतू त्यांच्या कवितेची जातकुळी वेगळी होती. विंदा प्रमाणे किंवा कुसुमाग्रजांप्रमाणे ते जीवनाचे तत्त्वज्ञान मांडण्याच्या किंवा शोधण्याच्या प्रयत्नात कधीच गेले नाहीत तर जीवन हे सुंदर आहे आणि ते जगले पाहिजे हे आत्मियतेने सांगत होते आणि म्हणूनच त्यांना 'आनंदयात्री' असे बोरकर म्हणतात. दोस्ती वाढविणे, माणसात वावरणे, हास्यविनोद आणि काव्यनंदात राहणे त्यांना सतत आवडायचे. पाडगांवकर जसे आहेत तसेच राहिले आणि जगलेसुद्धा.....

''लाख चूका असतील केल्या,
केली पण प्रिती.....''

ही त्यांचीच कबुली, छंदबद्ध, मुक्तबंध, मुक्तछंद कविता आणि शब्दवर्तनी, बोलगाणी, बालगीते, भावगीते, अनुवाद, महाभारत, शेक्सपिअरच्या विषयी लेखन अशा काव्याच्या विविध क्षेत्रात पाडगांवकरांनी अगदी एखाद्या पक्ष्यासारखा मुक्त संचार केला. १९७० च्या दशकात पाडगांवकरांनी ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कवी विंदा करंदीकर आणि वसंत बापट यांच्याबरोबर महाराष्ट्रभर, देशात आणि देशाबाहेरील काव्यवाचनाचे अनेक कार्यक्रम करून रसिकांना मंत्रमुग्ध केले. पाडगांवकरांनी लिहिलेली ''या जन्मावर, या जगण्यावर शतदा प्रेम करावे'' ''भातुकलीच्या खेळामधली राजा आणिक राणी.....'' अशा गीतांनी रसिकांना भावनांच्या हिंदोळ्यावर झुलवले.

''प्रेम म्हणजे प्रेम असतं,
तुमचं-आमचं अगदी
सेम असतं.''

ही कविताही विशेष गाजली. मंगेश पाडगांवकरांचा 'श्वास' आणि 'ध्यास' फक्त कविताच होत्या. अशा या 'महान', 'कर्तृत्ववान', 'तेजस्वी', 'ओजस्वी' कवीला माझा मानाचा मुजरा....

❖ ❖ ❖ ❖

## चारोळ्या

हातातील फेकून दे
कुऱ्हाड माणसा
तुझ्याप्रमाणे जगव आता
एक एक झाड माणसा ।

❖ ❖

गोड देते घास माती
पोसते पोटास माती
नोकरीची सोड आशा
फावड्याने तास माती
काढ ती दोरी गळ्याची
फेडते कर्जास माती

❖ ❖

कुणी तरावे, कुणी बुडावे,
अशीच असते जीवनसरिता.
जगणाऱ्याला भान असावे
जगतो आपण मरण्याकरिता.

आयुष्याचा खरा अर्थ
बऱ्याच उशिरा कळून आला.
पण कळूनही आता उपयोग नव्हता
कारण अंत आता जवळ आला.

❖ ❖

मुळातच नातं जुळलं नाही तर
तुटण्याचं दुःख होत नाही
पण जुळलेलं नातं तुटलं तर
वेदनेस अंत उरत नाही.

❖ ❖

अपेक्षा आपल्याकडून केली जाते
आपण कोणासाठी तरी जगावं.
मग आपण का करू नये अशी अपेक्षा
कुणी तरी आपल्यासाठीसुद्धा जगावं.

**कु.प्राजक्ता पोरे**
बी.ए.भाग-३



## चारोळ्या

जीवनाच्या वाटेवर
सुखाचाच आग्रह
सुखामागे दुःख
हे का विसरावं ?

❖ ❖

ऊन-सावलीच्या लपंडावात
सूर्य क्षितिजाकडे सरकत होता.
चांदण्यांनं भरलेलं आभाळ घेऊन
चंद्र अंधाराला सारत होता.

❖ ❖

पाण्यापेक्षा ''तहान'' किती
याला जास्त किंमत असते.
मृत्यूपेक्षा ''श्वासाला'' जास्त किंमत असते.
या जगात प्रेम तर सर्व करतात पण
प्रेमापेक्षा ''विश्वासाला'' जास्त किंमत असते

**कु.स्नेहल निमं[illegible]**
बी.ए.भाग-[illegible]





वैचारिक

# आतंकवाद : माणुसकीला काळीमा फासणारा

**कु.तेजश्री विलास गोरे**, बी.ए.भाग-१

*स्वप्नाहून सुंदर पृथ्वीला नरकमय बनविणाऱ्या या नराधमांना चांगलाच धडा शिकविला पाहिजे. आजपर्यंत पाकिस्तानसारख्या राष्ट्राने या समस्येतून खूप त्रास दिला आहे. परंतू प्रत्येक वेळी आपणच मैत्रीचा हात पुढे करून त्यांच्याशी शांततेने राहण्याचे आपले सर्व प्रयत्न निष्फळ राहिले आहेत.*

२८ नोव्हेंबर २००८ रात्रीचे ९ वाजून ४० मिनिटे. पूर्ण देश भारत-इंग्लंड यांच्यातील पाचव्या एकदिवशीय सामन्यातील भारताच्या विजयी महारथावर स्वार होवून आनंद साजरा करत होता. तर काही उद्योगधंद्याच्या व्यापात तर कोणी दिवसभराच्या थकव्यानंतर कुठेतरी सुखाचे चार घास खावून विश्रांती करत होता. तर काही धावपळीच्या, धकाधकीच्या जीवनात थोडासा विरंगुळा म्हणून आपल्या परिवार, मित्रांसोबत हॉटेलमधील चटकदार जेवणाचा आस्वाद चाखत होते. पण हे शांत सुखमय जीवन कुणालातरी पहावणारे नव्हते. क्षणार्धात मुंबई नगरी आतंकवाद्यांच्या हातची भक्षक बनली. कळत नकळत होत्याचे नव्हते झाले. मुंबई शहर हे नेहमीच भारताचे न्यूयॉर्क म्हणून समजले जात असल्यामुळे लोकांच्या गर्दीने खचाखच भरलेली असते. हीच मुंबई देशाची आर्थिक राजधानी म्हणून ओळखली जाते. या सर्व गोष्टी लक्षात घेता आतंकवाद या राक्षसी प्रवृत्तीने मुंबईला आपल्या जाळ्यात फसवले. मुंबईच्या बाबत घडलेली ही घटना कुणीही विसरू शकणार नाही. मुंबापुरीतील हॉटेल ताज, हॉटेल ओबेरॉय अन् नरीमन हाऊस याच त्या जागा होत्या. ज्या स्थानिक लोक तसेच आंतरराष्ट्रीय पर्यटक यांनी नेहमीच गजबजलेल्या असतात. त्यांनाच या आतंकवाद्यांनी आपले भक्ष्य बनवले. आपणा सर्वांना ठाऊक आहेच की भारतातील सर्वात मोठ्या या आत्मघाती हल्ल्यात जवळ-जवळ १८३ निरपराध लोक मारले गेले अन् कित्येक लोक जखमी झाले. यात पोलिस दलाचे काही अधिकारी, काही कर्मचारी तसेच सेना आणि एन.एस.सी. चे जवानही सामिल होते. मारल्या गेलेल्या लोकांत काही आंतरराष्ट्रीय नागरिकांचाही समावेश होता.



असा हा आतंकवाद आपल्या कुकर्माची हद्द ओलांडणारा, निरपराध जीवनाला क्षणार्धात संपवणारा, लोकांच्या मनात दहशतीचे भयानक वादळ निर्माण करणारा, राष्ट्राच्या आर्थिक, सामाजिक विकासाला कितीतरी वर्षे पुन्हा मागे ढकलणारा, लोकांच्या भावनांशी दानव बनून खेळणारा असा हा आतंकवाद कधी संपणार हे महातांडव नृत्य, कधी संपणार. हे रक्ताचा सडा शिंपणारे गलिच्छ कृत्य, सांगा कधी संपणार. आज फक्त भारतच नाही तर पूर्ण जग या आतंकवादाच्या प्रश्नापुढे मान झुकवून उभे आहे. मग कधी व्हायची आपली एकजुट, कुठे आहे या आतंकवादाचा केंद्रबिंदू, कोण जन्म देतोय या क्रुर महादानवांना. कधी कोणी बारकाईने विचार केलाय ! आजपर्यंत या गोष्टीचा. आजपर्यंत आपण इतकी वर्षे या समस्येला तोंड देवून सुद्धा सर्व काही गप्प बसून पाहत आलो आहे. आपल्या मनातील खदखदणारे दुःख मुक्तपणे गिळत आलो आहे का ? कुठेपर्यंत करायचं हे सहन ?

२७ नोव्हेंबरच्या या भयंकर आतंकी हल्ल्यातून खरं तर आमची सहनशीलताच संपली आहे. कारण आजपर्यंत फक्त या समस्येला राजकारणातून, नेता आणि मंत्री लोकांच्या फक्त विचार विमर्शातून, शांततेतून पार पाडण्यासाठी निरर्थक प्रयत्न झाले होते. परंतू या घटनेतून बरेच काही शिकायलाही मिळालं. माणूसकीच्या नावावर कलंक असणारा हा दहशतवाद जातीय वादातून एक दिवस मानव जातीलाच गिळंकृत करेल. दहशतवाद या विकृत रूपानंतर असे पुराव्यांनुसार आढळून आले आहे की, पाकिस्तानसारखा मुस्लिम धर्मीय देश फक्त त्यांच्या निरर्थक मागण्यावरून धर्माच्या, जातीच्या नावावरून तेथील लोकांच्या मनात मानवतेविरूद्ध डोक्यात विष पेरत आहेत. येथील नवयुवकांना त्यांच्या इच्छेविरूद्ध त्यांच्या मनात ''मरा पण धर्मासाठी'' हा चुकीचा मूलमंत्र पेरत आहेत अन् हेच चुकीच्या मार्गदर्शनातून भडकलेले माथेफिरू नवयुवक आपल्या अनमोल जीवनाची पर्वा न करता या आतंकवादाच्या अग्नीत उडी घेतात. मग त्यावेळी त्यांना समोर दिसत असतो तो निष्पाप लोकांच्या जीवनाला संपवून टाकण्याचा निर्धार. हे का ? कशासाठी ? पाकिस्तान या अशा अमानुष कृत्यापासून केव्हा सुधारणार ? आजपर्यंत आपण पाहिले असेल की, जगातील प्रख्यात आतंकवादी ओबामा बिन लादेन, दाऊद इब्राहिम यांना अंतर्गत राह, मदत ही पाकिस्तान, अफगाणिस्तानसारखी राष्ट्रेच देत आली आहेत. अमेरिकेवरील वर्ल्ड ट्रेड सेंटर हल्ला, मुंबईमधील १९९३ ची बॉम्बस्फोट घटना तसेच अलिकडचा हॉटेल ताज, हॉटेल ओबेरॉय याच्यावर झालेला हल्ला हेच सिद्ध करतो की, आम्ही आमची सुरक्षा व्यवस्था दुबळी ठेवून आतंकवादापुढे आम्ही हतबल झालो आहोत. आमचा हाच एक चुकीचा गैरसमज होता की, एक दिवस शांततेच्या मार्गाने ही राष्ट्रे आपली चूक ओळखून त्यांच्या प्रांतातून पुरवत असलेल्या आतंकी हालचालींना बंद करतील पण नाही, हे लोक सुधारणारे नाहीत.

मुंबईच्या आतंकवादी हल्ल्यात आपल्या प्राण्यांचे बलिदान देऊन देशासाठी एक प्रेरणास्थान बनून गेले. त्यामध्ये एन.एस.जी.चे कॅप्टन उन्नीकृष्णन तसेच पोलिस अधिकारी हेमंत करकरे, विजय साळसकर आणि अशोक कामटे यांचा समावेश आहे. यांच्यासारखी माणसे जोपर्यंत या देशात आहेत तोपर्यंत आतंकवाद कधीच यशस्वी होणार नाही. या लोकांच्या शरीरातील धमन्यात देशभक्तीने, सळसळणारे रक्त वाहत होते. त्यामुळेच स्वतःच्या प्राणांची आहुती देऊन देशाला काही वेळ का होईना संकटातून दूर करण्यासाठी संघर्ष केला.

शेवटी एवढंच सांगावसं वाटतं की; सर्व काही सुरळीत चालू असताना या स्वप्नाहून सुंदर पृथ्वीला नरकमय बनविणाऱ्या या नराधमांना चांगलाच धडा शिकविला पाहिजे. आजपर्यंत पाकिस्तानसारख्या राष्ट्राने या समस्येतून खूप त्रास दिला आहे. परंतु प्रत्येक वेळी आपणच मैत्रीचा हात पुढे करून त्यांच्याशी शांततेने राहण्याचे आपले सर्व प्रयत्न निष्फळ राहिले आहेत. या देशाने ''खायचे दात वेगळे अन् दाखवायचे वेगळे'' याच नीतीने आमच्याशी व्यवहार केला. आपण प्रत्येक वेळी सहनशीलता दाखवली पण त्यांनी ती आपली ती कमजोरी समजून आपल्या पाठीवर वार केले. म्हणून तेव्हा अशी माणूसकीला काळिमा फासणारी घटना पुन्हा होऊ नये यासाठी आपण नेहमीच सतर्क राहूया.

❖ ❖ ❖ ❖



## आई

देवाकडे मी माझं मरण मागितलं
त्यावर देव म्हणाला.......
मरण तर देईन मी तुला पण.....
मी त्या आईला काय सांगू,
जिने प्रार्थनेत तुझं दिर्घायुष्य मागितलं.

कु.स्नेहल निमट
बी.ए.भाग-२





ललित

# माणुसकी म्हणजे नेमकं आहे तरी काय ?

कु.स्नेहा वावर, बी.ए.भाग-१

*जिथे 'माणूसकी' हा धर्मच आपण पाळत नसू तर दुसऱ्या कोणत्याही धर्माचा प्रचार करून, तो पाळून अशी कोणती मोठी सिद्धी आपल्याला मिळणार आहे ? हे पण त्या देवालाच माहिती ! धर्म-धर्म म्हणून जाळपोळ, दंगे, बंद आणि खूप काही आपल्या या देशात असून सुद्धा आपण म्हणतोच की, ''जहाँ सत्य, अहिंसा और धर्म का पग-पग लगता है डेरा; वो भारत देश है मेरा''*

'हिंदू, मुस्लिम, शीख, इसाई हम सब है भाई-भाई !! अशा या धर्माधर्मातील विविधतेने नटलेल्या आपल्या भारत देशात सर्व जाती-जमाती, धर्मपंत सर्वजण ऐक्याने राहतात.' असे आपल्याला इयत्ता ४थी पासून सांगतानाचे मला तरी आठवते. इतर राष्ट्रांपेक्षा काहीतरी वेगळं आपल्या या भारतात असल्याची भावना निर्माण होते. देशाला मिळालेल्या ऐतिहासिक वारसा, परंपरा, वास्तुवैभव अशा वेगवेगळ्या देणग्यांचे नेहमीच कौतुक होत आलेले असूनही जो कौतुक करतो तोच या सर्वांना बाधा पोहोचवतो. जाती पाडतो, उच्च-नीच ठरवतो, धर्म-भेद करतो आणि मग हम सब भाई-भाईचा नारा लावणारे म्हणतात 'हम सब दुश्मन !!!'

'क्षुद्र किंवा मागास वर्ग' म्हणतानाच त्या शब्दाला गावाच्या वेशीबाहेरचा रस्ता दाखवल्यासारखं वाटतं. तरीपण, मग धर्माचे, जातीचे धडे गिरवूनही आजच्या आपल्या भारतातला माणूस अशिक्षित का ?? असा प्रश्न नक्कीच पडतो.

२०१४ मध्ये प्रदर्शित झालेला चित्रपट "P.K." चित्रपट म्हणजे एक विरंगुळा. पण त्याचं अवडंबर माजवून याच शिक्षितांनी तो चित्रपट बंद पाडलाच ना ! त्यातून काय घेण्यासारखं आहे काय; नाही हा ज्याचा त्याचा प्रश्न; यावर प्रत्येकाचं वेगळं मत असू शकतं. पण त्यावर आपलीच विरूद्ध बाजू थोपवणं अशी आपली भारतीय संस्कृती मुळीच शिकवत नाही.

'माणूसकी' हाच धर्म म्हणत म्हणत माणसात तिलाच अस्तित्व नाही. त्या चित्रपटातून काहीसं चुकीचं दाखवण्यात आलं असं मला तरी वाटत नाही. धर्माच्या नावाखाली उघडलेल्या कंपन्यांत काळ्या बाजाराशिवाय दुसरं काही नाहीच मुळी. लोकांच्या मनावर अंधश्रद्धेचा आणि देवाबद्दल असलेल्या विनाकयास श्रद्धेचा हा परिणाम म्हणावा लागेल. त्यातूनच आपला डाव साधून घेणारे भोंदूबावा म्हणजेच त्या कंपन्यांचे मालक. यांना काही कमतरता नाही. एकवेळ नोकरी मिळणर नाही या भारतात पण हे भोंदूबावा पावला-पावलांवर समोर येतील.



एकविसावं शतक 'संगणकयुग' असे आपण म्हणतो फक्त; कारण पैशांची फसवणूक लुबाडून घेणारे आपल्यातलेच सुशिक्षित लोक असतात.

एक प्रसंग सांगावासा वाटतो, कोल्हापूरातील रोज अनेक चहाचे गाडीवाले रोज एक कप रस्त्यावर ओतून देतात; तो कशासाठी तर देवाला नैवेद्य असं कळालं. विचार करण्यासारखी गोष्ट आहे; असे दिवसातून किती कप धुळीत मिळत असावेत, असा आपला देव नैवेद्य म्हणून किती कप चहा पिणार ही

हसण्यासारखी गोष्ट आहे. पण तोच एक कप जर एका गरीब व्यक्तीला फ्री मध्ये दिला तर आपला देव मुळीच चिडणार नाही. जिथे दोन वेळेच्या जेवणासाठी लोक आकाशपाताळ एक करतात; तिथेच दुसरीकडे ही अवस्था.

जिथे 'माणूसकी' हा धर्मच आपण पाळत नसू तर दुसऱ्या कोणत्याही धर्माचा प्रचार करून, तो पाळून अशी कोणती मोठी सिद्धी आपल्याला मिळणार आहे ? हे पण त्या देवालाच माहिती ! धर्म-धर्म म्हणून जाळपोळ, दंगे, वंद आणि खूप काही आपल्या या देशात असून सुद्धा आपण म्हणतोच की,

''जहाँ सत्य, अहिंसा और धर्म का पग-पग लगता है वेड़ा;
वो भारत देश है मेरा''

भारतीयांना खरंच भारतीय होण्याची गरज आहे !

❖ ❖ ❖ ❖




## पुन्हा कधी ना.....

सांग ना सखे, मी काय काय करू ?
म्हणजे तुला छान वाटेल !
मांडूयात का ? पुन्हा भातुकलीचा खेळ
म्हणजे आपले वालपण भेटेल !
किती चोरल्या आपण चिंचा, कैऱ्या
म्हणून कुणी आपले क्षणच चोरले !
आयुष्य झाले आंबट आंबट
वाढते वय तेवढे उरले !
किती खेळलो झोके, फुगड्या
ना थकलो कधीच, मारता दोरीच्या उड्या
आठवणींच्या हिंदोळ्यावर नको वाटते काही
जबाबदारीचे झोके आता सोसवतही नाही.
किती होतात आता गट्ट्या-कट्ट्या
पण ती मजा येत नाही, तुझी सर कोणा नाही !
पत्र्यहावर जाऊन मारू गप्पा
जिथे दिवस-रात्र बंधन नाही.
खूप सांगायच्यात गमती-जमती
एक डाव पुन्हा, घालू मस्ती
कळत नव्हते त्या क्षणांना, कसे पडत गेले अंतर
बालपणीचा काळ मधूर तो
पुन्हा कधी ना भेटतो नंतर !

**कु.तेजस्विनी पाटी[ल]**
बी.ए.भाग-[३]

## मला हे Comparision आवडलं

चहा ..... ! की कॉफी...... !!
चहा म्हणजे उत्साह.....
कॉफी म्हणजे स्टाईल..... !!
चहा म्हणजे मैत्री..... !
कॉफी म्हणजे प्रेम..... !!
चहा एकदम झटपट
कॉफी अक्षरश: निवांत..... !!
चहा म्हणजे झकास.....
कॉफी म्हणजे वाह मस्त..... !!
चहा म्हणजे कथासंग्रह
कॉफी म्हणजे कादंबरी.....!!
चहा नेहमी मंद दुपारनंतर.....
कॉफी एक धुंद संध्याकाळी..... !!
चहा चिंब भिजल्यावर
कॉफी ढग दाटून आल्यावर..... !!

चहा = discussion.....
कॉफी = conversation
चहा = living room
कॉफी = waiting room ..... !!
चहा म्हणजे उत्स्फूर्तता
कॉफी म्हणजे उत्कटता..... !!
चहा म्हणजे धडपडीचे दिवस.....
कॉफी म्हणजे धडधडीचे दिवस..... !!
चहा वर्तमानात दमल्यावर.....
कॉफी भूतकाळात रमल्यावर..... !!
चहा पिताना भविष्य रंगवायचे..... !
कॉफी म्हणजे स्वप्न रंगवायची !!

**कु.दिपाली घाडगे**
बी.ए.भाग-३





ललित

# माझ्या आठवणीतला गाव - भांबे

**कु.वनिता काटे**, बी.ए.भाग-३

*नदीकाठी वसलेल्या माझ्या गावात आमच्या वाडवडिलांनी मोठ्या कष्टातून उभी केलेली घरे, वहिवाटीला आणलेली ही माती, (जमिन) त्या जमिनीच्या बांधावर लावलेली फळे, झाडे, घरांच्यासमोर तयार केलेले अंगण, ज्या अंगणामध्ये आम्ही त्यांच्यासमोर खेळलो, नाचलो, बागडलो, माझ्या या गावची आठवण हे सर्व सोडून येताना आमच्या मनाला खूप यातना झाल्या.*

सह्याद्री पर्वताच्या कुशीत वसलेलं तारळी नदीच्या तिरावरती व डोंगराच्या बाजूला वसलेलं हे माझे छोटेसे भांबे गाव. पाटण तालुक्याची शेवटची हद्द व त्याला लागून सातारा जिल्ह्याची हद्द. दोन्ही हद्दीच्या मधून बारमाही वाहणारी तारळी नदी. आमच्या गावच्या पूर्व बाजूला मोठा ओढा व पश्चिमेला डोंगर व उत्तरेकडून वाहणारी तारळी नदी. या नदीचा व ओढ्याचा पूर्वेला संगम झाला. ओढा व डोंगर ही आमच्या गावची तशी पहिली तर हद्द आणि याच्यामध्ये वसलेलं आमचे छोटसं भांबे गाव. आमच्या गावची लोकसंख्या तर ४०० ते ५०० च्या आसपास.

गावात पाहिले तर गाव शेतीमध्ये अग्रेसर व आमच्या गावातील लोक तारळी नदीला माती व दगडाचा बांध घालून आडव्या पाटाने पाणी जमिनीला पुरवण्याचे काम सारे गावातील लोकं मिळून करत असत. यामुळे शेतीमध्ये पिके उत्तम प्रकारची पिकवली जात असत. शेतीमध्ये साधारणत: मोजकीच पिकं घेतली जात असत व ही पिके आणण्यासाठी लोकांना दिवसरात्र कष्ट करावे लागत असत. बैलाच्या साहाय्याने ही शेती केली जात असत. तसेच या शेतीमध्ये भात, गहू, भुईमूग इत्यादी प्रकारचीच पिके घेतली जात असे. दोन बैलाच्या सहाय्याने भाताची पेरणी केली जात होती व त्या भाताला पिकवण्यासाठी चिखलात दिवसरात्र त्या बैलांना मरावे लागत असत. तसेच शेतीमध्ये भात हे उत्तम प्रकारे पिकवले जात. माझ्या गावच्या लोकांना बाजार करण्यासाठी तारळे या गावाला जावे लागत असायचे. तसेच हे भात विकून आपल्या घरगुती गरजा पूर्ण केल्या जात. आठवड्यातून एकदाच बाजार करण्यास माझ्या



गावचे लोक तारळे या गावाला जात. तसेच भाताचे तांदूळ करून ते दिवसभर तारळ्याच्या 'तांदळाची पेठ' या ठिकाणी डोळे लावून कोणी घेतय का ? ते वाट पाहत वसायचे. तसेच त्यानंतर आमच्या गावाला जाण्यासाठी एकच गाडी असायची. त्या गाडीनं आठवड्याभराचं सामान घेवून लोकं घरी यायची व आठवडाभर ते साहित्य पुरवून वापरावे लागायचे. जाण्या-येण्यासाठी रस्ताच नसायचा; वाटा बंद व्हायच्या. तसेच आमच्या तारळी नदीवरून अलिकडे व पलिकडे करण्यासाठी लाकडी पुलाचा वापर केला जात असे. तोही पावसात वाहून जायचा व साऱ्या वाटा बंद व्हायच्या. त्यामुळे लोकांना येण्यासाठी अथवा जाण्यासाठी मार्ग उपलब्ध नसायचा.

त्यानंतर आमच्या गावातील लोकांनी शासनाकडून होडीची मागणी केली व त्याद्वारे माझ्या गावचा दळणवळणाचा कारभार त्या होडीच्या साहाय्याने सुरू झाला. तसेच माझ्या गावाला सर्व

सोयी ह्या निसर्गातूनच उपलब्ध झालेल्या होत्या. महत्त्वाचे म्हणजे पिण्याचे पाणी गावाला डोंगरावरती एक पाण्याचा झरा काढून त्या झऱ्यातील पाणी (ग्रायव्हेटीने) लोखंडी पाईपमधून गावच्या वरच्या बाजूला एक पाण्याची टाकी बांधून त्या टाकीमध्ये पाणी सोडले जायचे व त्या टाकीला दोन नळ लावून तेथे सर्व गावचे लोक पाणी भरायचे. शेतीचे पाणी, पिण्याचे पाणी यासाठी कोणत्याही प्रकारची पाणीपट्टी भरावी लागत नसे व वीजबिलही आकारले जात नरात.

माझ्या या छोट्याशा गावात ४थी पर्यंतच प्राथमिक शाळा. या शाळेचा पट हा १० ते १२ असायचा. आम्ही पण त्याच शाळेत ४थी पर्यंतचे शिक्षण घेतले. माझ्या गावातील मुलांना दप्तर कराले असायचे हे ही माहित नव्हते. दप्तर म्हणून वियाण्याच्या पिशव्याचा वापर करत होतो. तसेच आमच्या शाळेत एकच गुरूजी असायचे. ते पण कधी यायचे तर कधी यायचे नाहीत. मग आम्हीच शाळा उघडून बसायचो.

माझ्या या गावातील लोकांना कसल्याही प्रकारचे भांडण, राजकारण, पार्टी असले प्रकार तर माहितच नरायचे. आमच्या गावचे वैशिष्ट्य म्हणजे; माझ्या गावची ग्रामपंचायत निवडणूक ही बिनविरोधच होत असत व गावकरी मिळून हा निर्णय घेत असत व तो सर्वांना मान्य असायचा.

तसेच माझे हे गाव अत्यंत साधे व अत्यंत गरीब असलेले गाव. माझ्या गावातील घरे ही दगडाची बांधलेली व त्यावरून चिखल व राखेने सारवलेली. घरातच गुरांचा गोठा असायचा. त्यामध्ये शेळी, बैले, म्हैसी, गाई यांचा समावेश असायचा. म्हैसीचे दुधाचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर व्हायचे; पण दुध विकण्याची सोय माझ्या गावाला नव्हती. त्यामुळे लोक त्या दुधाचे ताक मोठ्या रांजणात बनवायचे. तो रांजण मातीचा असायचा व ते ताक आहारात त्याचा वापर केला जात असायचा. तसेच आमच्या गावातील लोकांना मांसाहार खूप आवडीचा असायचा पण मासे विकत आणणे शक्य नसायचे. लोकांजवळ पैसे नसायचे त्यामुळे लोकांनी किवटे नावाची एक बांबूचे साधन तयार करून त्याद्वारे मासे मारून आणत असत व माशांचा आस्वाद घेत असत.

अशा या गुण्यागोविंदाने राहणाऱ्या माझ्या गावाला १९९८ मध्ये तारळी धरणाने दृष्ट लागली व या माझ्या गावच्या पुनर्वसनाचे नोटीस गावाच्या हाती लागले व या गावावर दुःखाचा डोंगर कोसळला. अनेक घरे या तारळी धरण प्रकल्पामुळे उध्वस्त झाली व अनेक लोकांच्या दुःखाचा अश्रूंचा बांध फुटला. लोकांना अश्रू अनवर झाले. आम् लहान मुलांना त्यावेळेस काहीच कळत नव्हते पण या घटनेमुळे अने लोकांची मने दुखावली गेली.

त्यानंतर लगेचच काही महिन्यात तारळी धरणाचा पायाभर शुभारंभ मा.शरदरावजी पवार साहेब यांच्या हस्ते संपन्न झाला त्याचवेळी दुसरीकडे माझ्या गावचा व माझ्या गावातील लोकां आयुष्यातील खडतर जीवनप्रवास सुरू झाला. या प्रकल्पामुळे हजा धरण ग्रस्तांची घरे उध्वस्त झाली. या तारळी धरणामध्ये ७ गावे व वाड्या अशी एकूण ११ गावे विस्थापित झाली व लोकांच्या पायाखाल जमिनच सरकली. अनेक नाती दुभंगली गेली. अनेक वर्षांचा सहवा कायमचा दुरावला.

वुडीत क्षेत्रातील जमिनीचे व घरांचे शासनाने काडीमोल दरा किंमती केल्या व आमची ही भूमी लिलावात काढली. तसेच गावा डोंगर हा तर काही लोकांनी अत्यंत स्वस्त दरात त्याची विक्री करण्य आली. या प्रकल्पाला विरोध करण्यासाठी अनेक आंदोलने, मो काढले; परंतू शासनापुढे आम्हाला नमते घ्यावे लागले. २००१ सा आम्हाला आमच्या घरांचे व जमिनीचे पैसे देण्यात आले व त्यानं आमच्या नवीन गावासाठी उंब्रज या गावापासून १२ किलोमी अंतरावर असणाऱ्या 'वडगाव' या गावाच्या शेजारी माळरानावर ये आम्हाला बसवले. या माळरानावर आम्हाला दिलेल्या पैशाम कशीवशी घरे बांधून काढली व आम्ही भांबे हे गाव वसवले. आम्हा या गावात आल्यानंतर थोड्या फार प्रमाणात शेती मंजूर झाली. कोरड जमीन व ही जमीन करता-करता आमच्या डोळ्यात पा येऊ लागले. कधीही दुसऱ्याच्या रानात काम न करण्यास जाणा माझ्या गावच्या लोकांना दुसऱ्याच्या बांधावर जावून दिवसभर तळप उन्हात काम करावे लागले व त्या कामाचा मोबदला म्हणून ५० रू हजेरी दिली जात होती. तसेच पिण्याच्या पाण्याचीही टंचाई भा लागली. दुसऱ्याच्या विहिरीवर जावून पाणी आणावे लागत अस अशा प्रकारच्या समस्या माझ्या गावाला जाणवू लागल्या व क्षणोक्ष माझ्या जुन्या गावाची आठवण लोकांच्या मनात येवू लागली.

या पुनर्वसनामुळे माझ्या गावचे जीवनच बदलून गेले. याठिका आल्यानंतर याठिकाणचा परिसर, माणसे, सर्व काही नवीन अनोळखीच होतं. मुक्या जनावरांच्यावरही याचा परिणाम जा लागला होता. मोकळ्या रानातून दिवसभर मनसोक्त चरून येणा व मनसोक्तपणे पोहणाऱ्या जनावरांना 'खुटा' व 'दावं' एक झालं होतं व पाण्याचा आणि त्यांचा संबंध तर खूप दूरवरचाच होता. सारं काही एका क्षणात बदलून गेलं होतं. माझा गाव सर्व सोईपासून वंचितच राहिला.

तसेच ज्या धरणामध्ये नदीकाठी वसलेल्या गावात आमच्या वाड वडिलांनी मोठ्या कष्टातून उभी केलेली घरे, वहिवाटीला आणलेली ी माती, (जमिन) त्या जमिनीच्या बांधावर लावलेली फळे, झाडे, घरांच्यासमोर तयार केलेले अंगण. ज्या अंगणामध्ये आम्ही यांच्यासमोर खेळलो, नाचलो, बागडलो, माझ्या या गावची आठवण सर्व सोडून येताना आमच्या मनाला खूप यातना झाल्या. परंतू ामध्ये दुःखाची बाब म्हणजे आम्हाला नागरी सुविधांपासून, तसेच य असणाऱ्या जमिनीपासून सरकारने आम्हाला वंचित ठेवलेले आहे. ाझ्या गावातील आजोबा, वयरकर वृद्ध लोकं त्याच गोष्टीकडे डोळे ावून पाहत आहेत.

आज माझ्या गावातील सर्व लोक मिळेल तो कष्टाचा रोजगार रून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत आहेत व आपल्या मुलांना शिक्षणासाठी मदत करत आहेत व दिवसरात्र रोजगार करून आपली उपजीविका भागवत आहेत. याच गोष्टीमुळे मनाला खूप यातना होतात आणि मनात पहिले दिवस आठवतात व माझा हा छोटासा गाव सदैव आमच्या मनात कायम राहिल. कधीही मनातून व हृदयातून न जाणारा हा माझा गाव होता. या गावानेच आम्हां लोकांना जगण्याची नवी उर्जा दिली व त्याच गावाने आम्हांला जगण्याची नवी आशा दिली. असा हा माझा तारळी नदीच्या काठावर, डोंगराच्या कुशीत वसलेलं माझे भांबे हे गाव लोकांच्या सदैव स्मरणात राहिल. म्हणूनच मला शेवटी म्हणावेसे वाटते,

धन्य ती मायभूमी, पवित्र ती तारळी नदी,<br>
रमलो जेथे बालपणी, आठवण येते क्षणोक्षणी....

अशा या माझ्या सुंदर व विविधतेने नटलेल्या 'भांबे' या गावाला कोटी-कोटी प्रणाम !

❖ ❖ ❖ ❖

## विनोद



पाहुणे : बाळ तुझं नाव काय ?<br>
मुलगा : नाव सांगू कुठलं !<br>
पाहुणे : असे आई-बाबांनी तुझ जे नाव ठेवलय, शाळेत गुरूजी किंवा मित्र ज्या नावाने हाक मारतात ते नाव सांग !<br>
मुलगा : आई दगड्या म्हणते, बाबा बैलोबा म्हणतात, गुरूजी ठोंब्या म्हणतात, मित्र बन्या म्हणतात.

शिक्षक : चंद्रावर पहिल पाऊल कोणी टाकलं ?<br>
गंपू : सर चंद्रावर पहिलं पाऊल नील आर्मस्ट्राँगने टाकलं.<br>
शिक्षक : तर चंद्रावर दुसरं पाऊल कोणी टाकलं ?<br>
गंपू : काय सर, दुसरं पाऊलही त्याचच असणार ना !

कु.पूजा माने<br>
बी.ए.भाग-१

## आई

आई म्हणजे मंदिराचा उंच कळस,<br>
अंगणातील पवित्र तुळस,<br>
भजनात गुणगुणावी अशी संतवाणी,<br>
आई म्हणजे आरतीत वाजवावी<br>
अशी लयबद्ध टाळी आणि<br>
वेदनेनंतरची सर्वात पहिली आरोळी.<br>
आई.........वेगळीच असते.<br>
डोळे मिटून प्रेम करते ती प्रेयसी असते.<br>
डोळे मिटल्यासारखे करते, ती मैत्रीण असते.<br>
डोळे वटारून प्रेम करते, ती<br>
पत्नी असते, आणि........<br>
डोळे मिटेपर्यंत प्रेम करते,<br>
ती आई असते.<br>
खरंच......आई किती वेगळी असते.

कु.अपर्णा पवार<br>
बी.ए.भाग-३

ललित

# आई

कु.दिपाली पोपट घाडगे, बी.ए.भाग

''आईसाठी काय लिहू,
आईसाठी कसे लिहू,
आईसाठी पुरतील एवढे
शब्द नाहीत कोठे.
आईवरती लिहिण्याइतपत
नाही माझे व्यक्तिमत्त्व मोठे.''

खरच 'आई' या एकाच शब्दात किती आपुलकी, प्रेम, जिव्हाळा आहे. 'आ' म्हणजे 'आत्मा' आणि 'ई' म्हणजे 'ईश्वर'. आई म्हणजे प्रेमाचा सागर. आई ही प्रेमाची आस असते. आईतील आपण अंशच असतो. सर्वात सुंदर नातं हे आईचं असतं. म्हणूनच आईवद्दल लिहिताना शब्द खूपच कमी पडतात. खरच, आईची बरोबरी या जगात कोणाशी करता येणार नाही आणि म्हणूनच मी माझ्या आईवद्दल थोडेफार लिहिते आहे. माझी आई फारशी शिकलेली नाही. परंतू मनाने व संस्काराने ती खूप श्रीमंत आहे. तिची ही सगळी संस्काराची श्रीमंती माझ्यामध्ये उतरावी आणि माझे जीवन सफल व्हावे.

''आई माझा गुरू,
आई कल्पतरू,
सौख्याचा सागरू,
आई माझी !''



*एखाद्या मुलाच्या दुर्दैवाने त्याचे वडिल नसले तर त्याची आई त्याच्यासाठी आईही असते आणि वडिलही बनते. त्याला वडिलांची कमतरता जाणवू देत नाही. पण एखाद्या मुलाच्या दुर्दैवाने त्याची आई नसेल, तर वडिल 'आई' होऊ शकत नाही.*

अशा सुंदर आणि नेमक्या शब्दात सा गुरुजींनी आईचा महिमा वर्णिला आहे. साने गुरू हे स्वत:च मातृहृदयी होते. म्हणूनच त्यांचे शब्द सा आहेत. आई आपल्याला काय काय शिकवते ? न महिने नऊ दिवस उदरात ठेवून ती जगण्याची ल शिकवते. जगात पाऊल ठेवताच रडणाऱ्या बाळा हसायला शिकवते. पडणाऱ्या बाळाला चालाय शिकवते. बोलायला शिकवते. रूसायला आ रागवायला शिकवते. आई ही रक्तामासाच गोळ्याला घडवते आणि म्हणूनच आईसारखे जगात कोणतेही जग सुंदर आहे. याच लहान बाळा मिळणारे पहिले आश्वासन म्हणजेच आई ! पऱ्यां पाखरांना हळूच या म्हणणारी ! झोपलेल राजकुमाराच्या स्वप्नात जा म्हणणारी आईच अस

एका झोक्याबरोबर पाळणा - म्हणजेच बा दूर जाते आणि हातात धरलेल्या दोरीने आई त्या पुन्हा स्वत:जवळ खेचते. आपल्या बाळाला कि

र जावू द्यायचे ते आईच ठरवते. त्यावेळी तिच्या हाती असणारी री असते संस्काराची ! किती छोट्या गोष्टीतून संस्कार करते आई ! हज जाता जाता आई आपल्यावर खूप चांगले संस्कार करत असते. वच्छतेचे, मोठ्यांशी आदराने वागण्याचे, प्रामाणिकपणाचे, न्यायाचे, पुलकीचे, प्रेमाचे आणि विश्वासाचेही ! म्हणूनच आई म्हणजे स्काराचे एक महामंगल विद्यापीठच !

''आई एक नाव असतं
घरातल्या घरात गजबजलेलं गाव असतं.
आई असते मंदिराचा उंच कळस.
अंगणातील पवित्र तुळस.
भजनात गुणगुणावी अशी संतवाणी
वाळवंटात प्यावं असं थंड पाणी
आई म्हणजे आरतीत वाजवावी अशी लयबद्ध टाळी.
आणि वेदनेनंतरची सर्वात पहिली आरोळी.''

खऱ्या अर्थाने परमेश्वराला घरोघरी जाता येणं अशक्य होतं णि म्हणूनच त्याने आईला घरोघर पाठविले आहे. 'आई' हे आपलं स्काराचं पहिलं विद्यापीठ आहे. आई आपल्या बाळाचं नाव ठेवते. म्हा या नावाचा प्रभाव कळत नकळत त्या व्यक्तीवर होत असतो. चे उत्कृष्ठ उदाहरण म्हणजे 'यशवंतराव चव्हाण' यांच्या नावातच श' होते व त्यांना ते आयुष्यभर मिळाले देखील.

संकटात साथ देणारी, दु:खात पाठीशी उभी राहणारी आई सते. मुलं कितीही अपयशी झाले तरी त्याला यशाचा मार्ग खवणारी, धीर देणारी ही फक्त आईच असते. आईचे सगळ्यात त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे सृजन नवनिर्मिती ! नव्याला जन्म देण्यासाठी स्वत: यातना सहन करते. स्वत:चा प्राण धोक्यात घालते. अपार ष्ट घेते. हे जसे माणसांना लागू आहे तसेच पाखरांनाही लागू आहे. ड ना. सुगरण बाभळीच्या किंवा विहिरीकाठच्या झाडांवर मोठ्या शल्याने घरटे बांधते. एक-एक काडी निवडून आणते. झाडाच्या दीला कौशल्याने गुंफते. वेचुन आणलेल्या गवताच्या काडीकाडीतून यार होतो एक तरंग महाल ! अगदी असेच आपल्या आईने आपणाला ढवताना किती त्रास घेतले असतील. किती त्याग केला असेल.

त्याचा विचार करते का कोण ? आईचे सर्वात जास्त महत्त्व कळते ते आजारपणात ! सर्दी, डोकेदुखीपासून टायफॉईड, मलेरियापर्यंत सगळे आजार त्यावेळी प्रचंड त्रासदायक असतात. अशावेळी आपल्याला वेळोवेळी औषध पाणी देणारी, गरम जेवण जेवु घालणारी, उशा-पायथ्याला बसून हातपाय चेपणारी, डोक्यावरून हात फिरवणारी फक्त आणि फक्त आईच असते. आपलं मुल आजारी असेल तेव्हा रात्ररात्र उपाशी राहणारी फक्त आणि फक्त आईच असते. मूल रडत असेल तर तिला झोप येत नाही.

आणि म्हणून आईच्या बाबतीत,

''जोपर्यंत हसत नाही बाळ,
तोपर्यंत खायला उठतो काळ.''

मुलं म्हणजे भविष्याची सुंदर स्वप्न असतील तर आई म्हणजे सुंदर स्वप्न पाहणारे डोळे आहेत. स्वप्नांनी डोळ्यांशी बेईमानी करायची काय ? तेही एकदा ठरवावे लागते.

''स्वामी तिन्ही जगाचा,
आई विना भिकारी.''

एखाद्या मुलाच्या दुर्दैवाने त्याचे वडिल नसले तर त्याची आई त्याच्यासाठी आईही असते आणि वडिलही बनते. त्याला वडिलांची कमतरता जाणवू देत नाही. पण एखाद्या मुलाच्या दुर्दैवाने त्याची आई नसेल, तर वडिल 'आई' होऊ शकत नाही. ते वडिलच राहतात. आईचे अश्रू म्हणजे ज्वालामुखीतून बाहेर आलेला तप्त लाव्हारस. सभोवतालचे जनजीवन उध्वस्त करण्याचे सारे सामर्थ्य त्यामध्ये असते. पण ती तसे करत नाही. आई ही संस्काराची फार मोठी देणगी आहे. 'समाज', 'कुटूंब', 'देश', 'सुख-दु:ख', 'धर्म', 'राजकारण' या सर्वांना आदराने स्पर्श करणारी आणि या सर्वांचे ज्ञानाचे धडे देणारी फक्त आईच असते. उदा. जिजामाता, झाशीची राणी, अहिल्याबाई होळकर, सावित्रीबाई फुले, लक्ष्मीबाई पाटील, इंदिरा गांधी, मेघा पाटकर अशा असंख्य मातांची नावे घेता येतील. या सर्वांनीच कुटुंबाला आदर्श दिलाच पण त्याबरोबर भारतदेशाला परिवर्तनाच्या दृष्टीने मोठे योगदान दिले आहे.

❖ ❖ ❖ ❖

## कोण पाहिजे ?

जन्म द्यायला आईच पाहिजे.
राखी बांधायला बहिणच पाहिजे.
गोष्टी सांगायला आजीच पाहिजे.
हट्ट पुरवायला मावशीच पाहिजे.
पुरणपोळी भरवायला मामीच पाहिजे.
जीवनाच्या सोबतीला मैत्रीणच पाहिजे.
आयुष्याच्या साथीला बायकोच पाहिजे.
पण हे सर्व करायला आधी एक
मुलगी जगली पाहिजे.....

कु.मनिषा काळे
बी.ए.भाग-३



## कर्मवीर भाऊराव पाटील

ज्यांनी स्वत: सोसले दु:ख
निर्माण करण्यासाठी सुख
स्वत: उपाशी राहून भागवली इतरांची भूक
तेजाने ज्याचे चमकत होते मुख
असे आमुचे आण्णा लाखात एक
लाखात एक,
स्वावलंबी शिक्षणाच्या वार्ता
ज्यांनी पोहचवल्या रयतेच्या काना
कोणाचेही भय न ठेवता निर्भीड केले मना
ज्यांच्यापुढे झुकतात सर्वांच्याच माना
शिक्षण प्रसारासाठी जे फिरले रानावना
ते आमुचे आदर्श कर्मवीर आण्णा
कर्मवीर आण्णा,
आण्णा तुमची स्मृती
समाजामध्ये कायम राहणार
कर्मवीर भाऊराव पाटील
नाव जगात गर्जणार
जगात गर्जणार....

कु.पूजा माने
बी.ए.भाग-१

## मैत्री

असे हृदय तयार कर की,
त्याला कधी तडा जाणार नाही.
असे हास्य तयार कर की,
हृदयाला त्रास होणार नाही.
असा स्पर्श कर की,
त्याने जखम होणार नाही.
अशी मैत्री कर की,
त्याचा शेवट कधी होणार नाही.
एक दिवस मन मनाशी बोलेल,
फक्त शब्दांचा भास राहिल..... !
डोळे माझे पाणावलेले,
तो क्षण अबोल राहिल...... !
पुन्हा सांगड घालायची
नाही असा नियतीचा खेळ राहिल..... !
पण जीवनभर आठवेल
अशी या मैत्रीची ओढ राहिल........ !!!



कु.अपर्णा पवार
बी.ए.भाग-३



## शेतकरी

सामान्य माणसाची दुनिया न्यारी
दु:खाचे डोंगर पेलतो माथ्यावरी.
सुखाच्या शोधात वणवण भटकतो प
अन्नासाठी कष्ट अपार करी.
परिस्थिती असे हलाखिची जरी
ना सोडी स्वाभिमान तरी.
मनोरंजनाची ना आशा धरी
कधीतरी नुसत्या आसवांनी पोट भरी
महागाईची झळ सोसतो परी
एक रूपया दान देई मंदिरी
अन् मुखी म्हणे हरी-हरी

कु.पूजा सा
बी.ए.भा





## ाद आईची

हिनेमागून महिने
वटी वर्ष सरून जाते.
द्धाश्रमाच्या पायरीवर
ट तुझी पाहते.
भिजून जातो पदर
अन् मन रिते रहाते
तुझी मनीऑर्डर येते.
से नकोत यावेळी
च येऊन जा.
ाळा मला तुझ्या
री घेऊन जा.
तुझा बा होता तोवर
काळ बरा गेला.
तुझी आठवण काढत
उघड्या डोळ्यांनी गेला.
वटपर्यंत सांगत होता,
क माझा भला.
मोठा साहेब,
याचं मोठं कौतुक त्याला.
माझ्याही हृदयात फोटो,
तुझा तू पाहून जा.
बाळा मला तुझ्या
घरी घेऊन जा.
दुष्काळाच्या साली,
जन्म तुझा झाला.
तुझ्या दुधासाठी
आम्ही चहा सोडून दिला.
वर्षाकाठी एक कपडा
पुरवून-पुरवून घातला.
सालं घातली वापाने,
पण तुला शाळेमधी घातला.

कु.आश्विनी निकम
बी.ए.भाग-३

## मैत्री

माझं मलाच नाही कळलं,
प्रेम तुझ्यावर कधी झालं.....
मी फक्त जीव लावला,
हृदय केव्हाच तुझं झालं ।।१।।

आधी तुला मैत्रीण मानायचो,
रात्रंदिवस गप्पा मारायचो.....
तुझ्या विना एक एक क्षण,
तुझे मॅसेज वाचून काढायचो ।।२।।

माझ्या प्रत्येक कवितेत मी,
फक्त तुलाच शोधायचो.....
तुला समोर पाहून मी,
एकटा गालातच हसायचो ।।३।।

खूप प्रयत्न करून आज,
तुला प्रपोज करायचं ठरवलं.....
पण तुला समोर पाहताच,
शब्दांनीच शब्दांना फिरवलं ।।४।।

तूच जाणशील माझं प्रेम,
वेड्या मनाची ही आशा होती.....
मी कधी प्रेमात पडणारच नाही,
ही नेहमीच तुझी भाषा होती ।।५।।

भीती वाटायची नेहमी मला,
तू मला सोडून जाण्याची.....
माझ्या प्रेमाला नाकारून,
माझी मैत्री पण तोडण्याची ।।६।।

तू जरी माझं प्रेम नाकारलंस,
तरी मी तुझी मैत्री स्वीकारेन.....
पण, शपथ घेऊन सांगतो,
आयुष्यभर प्रेम मात्र तुझ्यावरच करेन ।।७।।

कु.प्राजक्ता पोरे
बी.ए.भाग-३





## तो आणि ती...... !

तो आला नाही की,
ती सुकून जाईल.
ती फक्त आणि फक्त
त्यांचीच वाट बघत असते.
तो आला की सगळीकडे
हिरवळ पसरत असते आणि,
मनाचाच झरा.....
ओथंबून वाहत असतो.
दु:खाच्या क्षणी सगळ्यांना
आनंद तोच देत असतो.
आणि, तो आला की,
ती बहरून गेलेली असते......
आणि सगळ्यांच्या
चेहऱ्यावर आनंद बहरून आलेला
असतो आणि,
तो तिच्यापासून आधुरा आहे
आणि त्याचे आणि तिचे मिलन व्हायला
तो तिच्यापाशी आला पाहिजे.
कारण..........
तो म्हणजे .......... पाऊस.
आणि,
ती म्हणजे ......... जमीन.

कु.रोहिणी जाधव
बी.ए.भाग-३

## जिद्द



रात्रीच्या अंधारानंतर पहाटेचा प्रकाश असतो.
जीवनातील निराशेनंतर आशेचा किरण असतो.
गुलाबाच्या झाडाला काट्यानंतर फूल असते.
डोळ्यातील अश्रूनंतर ओठावर हसू असते.
खचलेल्या मनाला कोणीतरी दिलासा देणारं असतं.
यशाच्या उंबरठ्यावर आपली वाट पाहणारं सुद्धा असतं.
फक्त एकच जिद्द हवी सतत पुढे पुढे जाण्याची
एकदा टाकलेलं पाऊल कधीच मागे न घेण्याची.

कु.श्रद्धा पवार
बी.ए.भाग-२

## नवा शिवाजी




नव्या युगाचा नवा शिवाजी या मातीने घडवावा
पुन्हा एकदा महाराष्ट्र हा शिखरावरती चढवावा.

दिवसाढवळ्या लुटून खाकी अधिकारी हे हारामी
भ्रष्ट माजले द्रष्ट माजले नेते सगळे कुचकामी
सत्तेवरून खेचून खाली एकमेकाला तुडवावा
नव्या युगाचा नवा शिवाजी या मातीने घडवावा.

आई कळेना, बहिण कळेना, काही कळेना कुत्र्यांना
धाक दाखवून गप्प बसविती समाजातल्या भित्र्यांना
या साल्यांचा गर्भकोथळा वाहन खाते खुडवावा
नव्या युगाचा नवा शिवाजी या मातीने घडवावा.

उभ्या जगाच्या पोर्शिद्याच्या फास लागला गळ्यांना
मरणाराची घोर वेदना कशी कळावी सगळ्यांना
जाहिरनाम्यासह नेत्यांना तळ्यात नेऊन बुडवावा
नव्या युगाचा नवा शिवाजी या मातीने घडवावा.

कुणी न जावो बळी कुणाचा कुणी न राहो दुःखी
अपमानाचे जीणे कुणाच्या कधी न येवो माथी
नव्या युगाचा नवा नगारा नव्या हाताने वडवावा
नव्या युगाचा नवा शिवाजी या मातीने घडवावा.

कु.सुवर्णा कांबळे
बी.ए.भाग-१

## कळत नाही.....

स्वच्छ पाण्याचा तळ दिसत असला की
पाण्यात उतरण्याची भिती वाटत नाही
तसंच माणसाच्या बाबतीत असतं
त्याच्या मनाचा तळ समजला की
त्याच्या सहवासाची भिती वाटत नाही
आणि नातंही स्वच्छ वाटू लागतं !
''ओढ'' म्हणजे काय ते
''जीव'' लावल्याशिवाय कळत नाही.
''प्रेम'' म्हणजे काय ते
स्वत: केल्याशिवाय कळत नाही.
विरह म्हणजे काय ते
''प्रेमात'' पडल्याशिवाय कळत नाही.
''जिंकणं'' म्हणजे काय ते
''हरविल्याशिवाय'' कळत नाही.
''दु:ख'' म्हणजे काय ते
''अपेक्षा भंग'' झाल्याशिवाय कळत नाही.
''सुख'' म्हणजे काय ते
''दुसऱ्याच्या हास्यात'' शोधल्याशिवाय कळत नाही
''समाधान'' म्हणजे काय ते
''आपल्यात'' शोधल्याशिवाय कळत नाही.
मैत्री म्हणजे काय ते
''जीव'' लावल्याशिवाय कळत नाही.
''आपली माणसं'' कोण ते
''संकटाशिवाय'' कळत नाही.
''सत्य'' म्हणजे काय ते
डोळे उघडल्याशिवाय कळत नाही.
''उत्तर'' म्हणजे काय ते
प्रश्न पडल्याशिवाय कळत नाही.
''जबाबदारी'' म्हणजे काय हे ती
सांभाळल्याशिवाय कळत नाही.
''काळ'' म्हणजे काय हे तो
निसटून गेल्याशिवाय कळत नाही.

कु.दामिनी गाव
बी.ए.भाग-





## प्रत्येक मुलगी सुंदर असते.....

प्रत्येक मुलगी सुंदर असते
कोणी कायेने सुंदर असते
कोणी मनाने सुंदर असते
कोणी संस्काराने सुंदर असते
कोणी विचाराने सुंदर असते.

प्रत्येक मुलगी सुंदर असते
कोणाची चाल सुंदर असते
कोणाची शरीराची ठेवण सुंदर असते
कोणाची हास्य लोभावणे सुंदर असते
कोणाचे बोलणे वेड लावणारे असते.

प्रत्येक मुलगी सुंदर असते
कोणाचे गाणे सुंदर असते
कोणाचे लिखाण सुंदर असते
कोणाचे कविता सुंदर असते
कोणाचे वस्त्र सुंदर असते.

प्रत्येक मुलगी सुंदर असते
फक्त सुंदरता पाहण्यासाठी नजर लागते
बाह्य सुंदरता ही सुंदरता नसते.....
आंतरिक सुंदरता मनाला खूप भावते.....

कु.आश्विनी वेल्हाळ
बी.ए.भाग-१

## विसरायला हवे

खरंच विसरायला हवे तुला
पण विसरायचे कसे ?
डोळ्यामधील आसवांना
आवरायचे कसे ?

खरंच विसरून जा हे सांगणे
असते सहज सोपे
बढाईने बोलता येते
वागणे नसते सोपे.

सोडून तू माझा हात
शोधलीस नवी वाट
मी मात्र नाकासमोर
चाळत राहिले भूतकाळाचा घाट.......

कु.रोहिणी जाधव
बी.ए.भाग-३

## निरोप घेताना

निरोप घेता कॉलेजचा
मन दु:खानं भरून येतं
वाटतं पुन्हा-पुन्हा यावेत ते दिवस
आणि कधी संपूच नयेत पुन्हा
पण नसतं ते शक्य
कारण सगळेच असतात मग्न
आपला मार्ग शोधण्यात
रंगवित सुखद-सुखद स्वप्ने
आपल्या यशस्वी आयुष्याची
पण शेवटी एकच सांगणे....
दिसलात तुम्ही कुठे तर
ओळख दाखवावी ती जुनी
आपलं म्हणून...
बस इतकेच मागणं..........

कु.अपर्णा बापूराव यादव
बी.ए.भाग-३



## ।। प्रतिज्ञा ।।

भारत माझा देश आहे. सारे हिंसक अत्याचारी व नराधम माझे शत्रू आहेत. माझ्या देशातील बुरसटलेल्या संस्कृतीचा मला तिटकारा आहे. अशा संस्कृतीची मी विरोधक आहे. व्रतबंध, रूढी, स्पृश्यास्पृश्यतेचा कलंक मुळासकट उपटण्याची माझी तयारी आहे. मुंगीस साखर आणि माणसाला पाण्यापासून वंचित ठेऊन तडफडून मारण्याची सांस्कृतिक परंपरा समुळ नष्ट व्हावी, म्हणून मी सदैव प्रयत्न करीन. पिडीतांचे रक्षण व संवर्धन यातच माझे सर्वस्व आणि कल्याण सामावले आहे.

कु.स्नेहा वर्गे
बी.ए.भाग-३



## आमचा मान आमचा अभिमान : प्राध्यापक व विद्यार्थिनी


…चार्य डॉ.कैलास जगदाळे
आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये पेपर वाचन


प्रा.डॉ.मच्छिंद्र सकटे
आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये पेपर वाचन


प्रा.सुहास निर्मळे
आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये पेपर वाचन


प्रा.डॉ.अभय पाटील
आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये पेपर वाचन


प्रा.डॉ.तानाजी पाटील
आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये निबंध प्रसिध्द


प्रा.लालासाहेब पवार
आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये निबंध प्रसिध्द


प्रा.आशा मडावी
आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये निबंध प्रसिध्द


प्रा.भद्रिनाथ ढाकणे
आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये निबंध प्रसिध्द


प्रा.शिल्पा कुंभार
सेट परीक्षा उत्तीर्ण


सोनाली कदम
१२ वी कला प्रथम


ज्योती कदम
बी.ए.भाग १ व उत्तमवाचक प्रथम


ज्योती जगदाळे
बी.ए.भाग २ प्रथम


सविता म्हेत्रे
बी.ए.भाग ३ प्रथम


दिपाली गोडसे
…वाजी विद्यापीठ बॉक्सिंग तृतीय क्रमांक


कोमल पवार
शिवाजी विद्यापीठ नियतकालिकातील लेखास बक्षीस


स्नेहल वायदंडे
एन.एस.एस.
बेस्ट ग्रुप लिडर


प्रणाली इंगळे
एन.एस.एस.
उत्कृष्ट स्वयंसेवक


पूजा पाटील
ग्रंथ समीक्षा प्रथम क्रमांक

## राष्ट्रीय सेवा योजना



श्रमसंस्कार शिबीर उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना मा.आनंद भंडारी



श्रमसंस्कार शिबीर समारोप प्रसंगी मार्गदर्शन करताना प्राचार्या डॉ.प्रतिभा गायकवाड



श्रमसंस्कार शिबीरामध्ये मार्गदर्शन करताना डॉ.विनोद बाबर



श्रमसंस्कार शिबीरामध्ये मार्गदर्शन करताना प्रा.डॉ.एस.एम.भोसले



श्रमदान करताना महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी



वृक्षारोपण करताना मा.शशिकांत भोसले, अनिल भोसले व मान्यवर



शिबीरामध्ये विद्यार्थिनींचे हेल्थ चेकप करताना महिला डॉक्टर व प्राध्यापक



शिबीरामध्ये पशुचिकित्सा करताना डॉ.कांबळे

## स्पर्धा परीक्षा



स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना प्रा.डॉ.एम.बी.भोसले



'एम.पी.एस.सी. आणि मानवी अधिकार व हक्क' या विषयावर मार्गदर्शन करताना प्रा.डॉ.चंद्रकांत खंडागळे व प्राचार्य डॉ.कैलास जगदाळे



'स्पर्धा परीक्षेचे महत्व' या विषयावर मार्गदर्शन करताना प्रा.डॉ.अनिल कोकाटे





विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना मा.श्री.अभिजित निकम (तहशीलदार गुहागर)



एम.पी.एस.सी. परीक्षेचे महत्त्व सांगताना प्रा.डॉ.एस.आर.निकम



प्रास्ताविक करताना प्रा.डॉ.अभय पाटील (संचालक, स्पर्धा परीक्षा केंद्र)



स्पर्धा परीक्षा समितीच्यावतीने वृक्षारोपण करताना प्राचार्य डॉ.कैलास जगदाळे



मान्यवरांचे स्वागत करताना प्रा.डॉ.तानाजी पाटील

## जिमखाना विभाग



वार्षिक क्रीडा स्पर्धा उद्घाटन प्रसंगी
प्राचार्य डॉ.कैलास जगदाळे व प्राध्यापक



व्हॉलीबॉल क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन करताना
प्राचार्य डॉ.कैलास जगदाळे



क्रीडा विभाग प्रमुख प्रा.दिनेश पाटील
विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना



सातारा विभागीय व्हॉलीबॉल स्पर्धेतील
रोमांचकारी क्षण



क्रीडा विभाग प्रमुख प्रा.दिनेश पाटील विद्यार्थिनीकडून
व्यायामाचे प्रात्यक्षिक करून घेताना



वार्षिक क्रीडा स्पर्धा कबड्डी खेळामधील
आकर्षक पकड



सातारा विभागीय कबड्डी स्पर्धेमधील
रंगलेला सामना



शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आंतरविभागीय बॉक्सिंग स्पर्धेतील
संघासोबत प्राचार्य डॉ.कैलास जगदाळे व प्राध्यापक



# हिंदी विभाग



"फिर एक हादसा
क्यो हुआ? कहाँ हुआ?
क्या फर्क पडता है ...
पचास बेगुनाह मारे गए
सौ से अधिक घायल हुए
घर जलाए गए
स्त्रियौ बेइज्जत की गई ...
शाबास दिलेरो
हम प्रभावित हुए तुम्हारी कामयाबी से ।

- कुंवर नारायण

संपादक:
प्रा.डॉ.वंदना मोहिते

त्रिवेणी
सन २०१५-२०१६

# अनुक्रमणिका


■ गद्य विभाग

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | हिंदी राष्ट्रभाषा | मेघाराणी बोरगे | बी.ए.भाग ३ | ..२९ |
| २. | अंध:विश्वास और विज्ञान | भाग्यश्री जोशी | बी.ए.भाग ३ | ..३१ |
| ३. | आज की युवा पिढी | ज्योती कदम | बी.ए.भाग २ | ..३२ |
| ४. | मेरी यादे | वर्षा मराठे | बी.ए.भाग ३ | ..३४ |

■ पद्य विभाग

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | बेटी अनमोल रतन | प्रतीक्षा वाघ | बी.ए.भाग १ | ..३५ |
| २. | दस महत्त्वपूर्ण बिंदू | ज्योती कदम | बी.ए.भाग २ | ..३५ |
| ३. | बाप ऐसा भी | प्रतीक्षा वाघ | बी.ए.भाग १ | ..३६ |
| ४. | शेरो-शायरी | प्राजक्ता पोरे | बी.ए.भाग ३ | ..३६ |




वैचारिक

## हिन्दी-राष्ट्रभाषा

कु.मेघाराणी विवेक बोरगे, बी.ए.भाग-३

हम हर साल १४ सितंबर को हमारे देश में हिंदी दिन मनाते है। यह दिन हमारी तृभाषा को सम्मान दिलाने का दिन है। उस भाषा को सम्मान दिलाने का दिन है। से तीन चौथाई हिंदुस्तान समझता है और जिस भाषा में एक दुसरे से जोडे रखने साधन प्रदान किया, उस भाषा के लिए आज का यह दिन समर्पित है।

''लेकिन क्या हिंदी मर चुकी है।'' या वह इतने खतरे में है कि हमे उसके लिए शेष दिन समर्पित करना पड़ रहा है।

हिंदी दिन जैसा मात्र एक औपचारिक दिन बनकर रह गया है। ऐसा लगता है, से लोग गुम हो रहे हिंदी को अपनी श्रद्धांजली अर्पित कर रहे है। वरना आप ही मे बताइए क्या आपने कभी चीनी दिवस, फ्रेंच दिवस या अंग्रेजी दिवस के बारे में ना है। नहीं ना ? तो हिंदी दिवस मनाने का एक ही अर्थ निकलता है। गुम हो रही दी को बचाने का एक प्रयास।

जब बच्चा पैदा होता है, तब यह पेट से ही हिंदी सिखकर नहीं आता, हिंदी का ला ज्ञान उसे आसपास सुनाई देनेवाली आवाजों से प्राप्त होता है और भारत मे, दातर घरों में लोगों की बोलचाल की भाषा हिंदी ही है। जब बच्चा चार या पाच ल का हो जाता है, तब उसे अंग्रेजी स्कूल या नर्सरी में दाखल किया जाता है। स्कूल में बच्चों को अंग्रेजी इस तरह पढ़ाई जाती है, जैसे वही आगे चलकर उसका पालन-पोषन करेगी।




अंग्रेजी बने बॉस, हिंदी झेले गरीबी वही दुसरी ओर जिन्हें अंग्रेजी ठीक से नही आती वह अंग्रेजी में कमजोर रह जाते है और उन्हें अनपढ और गँवार समझा जाता है।

*जब बच्चा पैदा होता है, तब यह पेट से ही हिंदी सिखकर नहीं आता, हिंदी का पहला ज्ञान उसे आसपास सुनाई देनेवाली आवाजों से प्राप्त होता है और भारत मे, जादातर घरों में लोगों की बोलचाल की भाषा हिंदी ही है। जब बच्चा चार या पाच साल का हो जाता है, तब उसे अंग्रेजी स्कूल या नर्सरी में दाखल किया जाता है।*

अगर कोई इंटरव्यू देने जाए तो सबसे पहला सवाल उसे एक ही पूछा जाता है, कि क्या तुम्हें अंग्रेजी आती है। बहुत कम ऐसी जगह है, जहाँ हिंदी के ज्ञान के बारे में चर्चा कि जाती है। अंग्रेजी और हिंदी कि इस प्रगती के भागदौड में कौन जितेगा, यह तो मैं नहीं बता सकती, लेकिन हिंदी कि ओर से उम्मीद की किरण जगाती हुए, एक शेर अदा करना चाहती हूँ।

''मंजिल उन्ही को मिलती है।
जिनके सपनों में जान होती है।
खाली पंख होने से कुछ भी नहीं होता
हौसलों से उड़ान होती है।

अगर हममें हौसला हो की हम हमारी हिंदी भाषा को हमारे मंजिल तक ले जा सकते है। तो हम अवश्य सफल होंगे।

लेकिन बात सिर्फ शैक्षणिक संस्थाओं तक सिमीत नहीं है। जानकारों की नजारों में हिंदी की

बरबादी में सबसे अहम रोल हमारी संसद का है। भारत स्वतंत्र हुआ तब हिंदी को वह दर्जा दिया नहीं गया। उसे सिर्फ राज्यभाषा बना दिया गया। उसी राज्यभाषा अधिनियम धारा ३ के तहत यह कहा गया है कि सारे सरकारी दस्तावेज और कानून अंग्रेजी में लिखे जाए और बाद में इन्हें हिंदी में अनुवादित कर दिया जाए। लेकिन होना यह चाहिए था कि सारे सरकारी दस्तावेज और कानून हिंदी में लिखे जाते और आवश्यकता हो तो, उन्हें अंग्रेजी में अनुवादित कर दिया जाता, लेकिन ऐसा नहीं हुआ।

सरकार को यह समझने की जरूरत है कि हिंदी हमे एक-दुसरे से जोड़े रखनेवाली भाषा है और इसका प्रयोग करना हमारा नैतिक एवमं सार्वधानिक दायित्व है। अगर हमने अभिसे हिंदी की उपेक्षित करना शुरु किया तो एक समय ऐसा ना आए कि हिंदी का सारा वजूद ही खत्म हो जाएगा।

India has got freedom near about 65 years but there were many problems facing us in last 20 years the particular region Marathwada in state of Maharashtra is facing the problem of 'Draught' and the altimate result of unfavourable condition is the suicide of farmers. This is serious issue in our state. The committee opointed under the headship of Sen Gupta to study the farmers. The Sen Gupta's committee has protraited the fearfull figure of suicide committed throughout the India by farmers and that figure is 2,66,204 from the year 1995 to 2002 and the single state of Maharashtra. Unfortunately seen near about 40 thousand farmers suicide. Later in that report he has quoated that 'The Land of Maharashtra' is becoming the grave land.' The single occassion is suffiecient to bring the reality in that perticular region and on this issue Sadanand Deshmukh has written the novel 'Baromaas'. He has mention this issue and shown the reality of farmers to us. He has got 'Sahitya Akadami Award 2004.' For this novel 'Baromaas.'




Along with the main subject he has mention number of sub-subjects in the novel like unemployment, Superstitions beliefs, Corruption, Caste System, Tradition verses modern, The quarrel in the forms rural verses urbān,

***In this novel Shubhanrao and Madhukar commited suicide because of bank loan and unemployment. They are not facing this problems. So, they are choosing this way. Sadanand Deshmukh thrown light on the serious issue or problem. He shows that the real picture of society by the Novel 'Baromaas'.***

The peasant movements, The government policies. The propaganda of left and right thinking. All these subjects responsible for the suicide of farmers.

The Novelist along with the responsible circumstances the natural climates and the manmade elements on the surface level. We think that suicide in the particular region is due to the irregularity of nature but actually the other elements and system are responsible for larger number of suicides in a particular region. The particular area now days known as the draught area. The lack of irregation is responsible for the production of a agriculture

productions. The area is devided into Irrigated or non-irrigated area and non irrigated area is totally depend on the nature. The nature became whimsical one. But in true sense to be the whimsical nature the human being is responsible for it.

In this novel Shubhanrao and Madhukar commited suicide because of bank loan and unemployment. They are not facing this problems. So, they are choosing this way. Sadanand Deshmukh thrown light on the serious issue or problem. He shows that the real picture of society by the Novel 'Baromaas'. I think thats we are from the farmers family so we have to give Moral support to them.

Save farmer save country.

❖ ❖ ❖ ❖

## Jokes

Principal : Agar Koi Ladka girls hostel me gaya,
First time Rs. 100 will be fine
Second time Rs. 500 will be fine

Ganya : Sir, What is fare of Monthly Pass ?

**Poonam Ishwar Suryawanshi**
B.A. I

❖ ❖

Vanita asks her lover, Sanju, 'If you get engaged, will you give me a ring ?'

Sure, replies Sanju, 'What's your Phone Number ?'

❖ ❖

Wife : Listen please !

Husband : What ?

Wife : Today I was in hospital to check up.

Husband : What Doctor said ?

Wife : Doctor said B.P. is playing the game of high and low. What is this B.P.

Husband : Nothing now days your Bawalat Pana Kami Zast Hotai, Bas.

❖ ❖

Sakharam enters in the Kitchen opens the Sugar Box, sees insides and closes it. The wife observes the whole episode. Again Sakaram comes and does the same thing.

The wife asks, 'Why are you doing this ?'

Sakharam replies : 'Doctor told me to check sugar level regularly.'

❖ ❖

Royan opens his lunch box in the middle of the street. Why it so ?

Only just confirm whether he is going to office or coming to home.

❖ ❖

Ganya asked to Manya, 'How was your exam ?'

Manya : 'It was OK, but i couldn't answer the past form of think. I thought and thought and finally I Wrote thunk !

**Sneha Shivaji Chandugade**
B.A. III





*Moral Story*

# Who is Happy ? The Peacock or the Crow

**Poonam Ishwar Suryawanshi**, B.A.-I

A crow lived in the forest and was absolutely satisfied in life. But one day he saw a swan. "This swan is so white", he thought "and I am so black." This swan must be the happiest bird in the world."

He expressed his thoughts to the swan "Actually." the swan replied, "I was feeling that I was the Happiest bird around until I saw a parrot which has two colours. I now think the parrot is the happiest bird in the creation." The crow then approached the parrot. The parrot explained, "I lived a very happy life until I saw a peacock. I have only two colours, but the peacock has multiple colours.

The crow then visited a peacock in the zoo and saw that hundreds of people had gathered to see him. After the people had left the crow approached the peacock "Dear peacock", the crow said, "you are so beautiful. Every day thousands of people come to see you. When people see me. They immediately shoo me away. I think you are the happiest bird on the planet.

The peacock replied, "I always thought that I was the most beautiful and happy bird on the planet. But because of my beauty, I am entrapped in this zoo. I have examined the zoo very carefully and I have realized that the crow is the only bird not kept in a cage. So for past few days I have been thinking that if I were a crow, I could happily roam everywhere."

***We make unnecessary comparison with others and become sad. We don't value what God has given us. This all leads to the vicious cycle of unhappiness. Learn to be happy in what you have instead of looking at what you don't have.***

That's our problem too. We make unnecessary comparison with others and become sad. We don't value what God has given us. This all leads to the vicious cycle of unhappiness. Learn to be happy in what you have instead of looking at what you don't have. There will always be someone who will have more or less than you have. Person who is satisfied with what he/she has, is the happiest person in the world.

❖ ❖ ❖ ❖

*Literary*

# English at its Best !

Jyoti Ramchandra Kadam, B.A.-II

When Britishers came to India, they built up their own status in the country, grew stronger and started dominating. Gradually, India began losing its own identity and came under the colonial rule of the Britishers. 'Slaves' was the term given to the Indians by them and so were treated in that rude manner. India experienced bad under rule and went through brutal exploitation against themselves. Nevertheless, Britishers left the country 'free' with a beautiful language English.

English has been the most important language from decades and still remains to be one. It is a Latin word and its origin comes from the language, French. English has been accepted as the global language. The 72% of the world speaks and understands the language. Its communicative platform provides a sense of being in an equal level when various countries meet. It is a language that consists of 26 alphabets with its various forms and rules within. The language has been accepted by all the countries the world as their functional language. As a matter of fact. Many people fail to understand it and many don't even know about its existance.




*Choose the language 'English' explore it find its depth and enter into a new phase of life where everything would seem to be easier than before and interesting than ever !*

English plays a very important role in one's life, at least for those who are in a need to acquire a better education and a better job. Life offers various kinds of jobs to a person but to get recruited for the same takes more or less a tedious effort. When a person interviews another person the conversation is expected to be in English and that defines the candidates more than any other ways. But many fail to pass the interview as they fail to execute themselves to the expectations of the organization in the language they prefer to take up. The degree of English needs to be take under consideration since it gives a higher standard to the awareness and the knowledge of the very fine language.





Fluency in English describes a person in a very different form and helps the person to come out with unique thoughts and ideology. It is true that people having a better command over the language posses a smarter personality that would outstand the others.

Famous personality Wiliam Shakespeare is known worldwide due to his classic contribution towards the English Literature. He is fondly remembered by all the English philosophers with high dignity and respect. Students read a lot about his ideas and skill in his various poems, stories and plays. His writings have left a permanent landmark in the history of English Literature and would be remembered even in the days to come.

Choose the language 'English' explore it find its depth and enter into a new phase of life where everything would seem to be easier than before and interesting than ever !

❖ ❖ ❖ ❖

## *What is the use ?*

I love you,
You love me
But what is the use ?
Caste is barrier
I belongs the upper class
You are from the lower class
How we preserve the flame of love
The traditions, culture and
religion obstacles in our love
They became the concrete wall
The father and mother are priest,
They keeps their mind absent
became the slave of customs
dear we will remember it
in our grave, o, love it is true
what is the use ?

**Ashwini Balaso Shedage**
**B.A.III**

## *Ability*

I am Ph.D. holder
unable to utter it,
I afraid of it to tell others
I can't utter it as achievement
To complete my chapters
I sit on the carpet
before the junior of me
she tells me, I quote it,
What a miracle, chapter completes
I offtenly visits her home
even after declaration of degree
I put some amount before the photo
but she donated it to the temple
even today I have need,
to check the proof
she denied,
my ego aware of degree
I used my poor brain

**Rani Godase**
**B.A.III**

त्रिवेणी

# अनुक्रमणिका

## ■ गद्य विभाग


| | | | |
|---|---|---|---|
| १. 'स्मार्ट शहरे – विकसनशील शहरांचे बदलते चित्र' | अनुराधा केंजळे | बी.ए.भाग १ | ..५७ |
| २. स्मार्ट शहरे – 'भारताच्या वेगवान विकासाचे इंजिन' | अनुराधा केंजळे | बी.ए.भाग १ | ..५९ |
| ३. 'शिक्षणाचे अर्थशास्त्र' | मोनिका जाधव | बी.ए.भाग १ | ..६१ |
| ४. 'अर्थशास्त्राचे जनक–ॲडम स्मिथ | प्रणाली इंगळे | बी.ए.भाग २ | ..६४ |
| ५. गांधीपूर्व काळातील भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातील 'स्त्रियांचे कार्य' | काजल घाडगे | बी.ए.भाग ३ | ..६७ |
| ६. 'दहशतवाद' | पूजा पाटील | बी.ए.भाग ३ | ..६९ |
| ७. मुक्या प्राण्यांवर प्रेम करा | मनिषा काळे | बी.ए.भाग ३ | ..७१ |
| ८. शकुन–अपशकुन एक समाजशास्त्रीय संशोधन | दीपाली घाडगे | बी.ए.भाग ३ | ..७३ |
| ९. उज्वल भवितव्य घडवायचे असेल तर विचार बदला | वर्षा वाल्हेकर | बी.ए.भाग २ | ..७५ |
| १०. माहिती तंत्रज्ञान | दामिनी गावडे | बी.ए.भाग १ | ..७७ |
| ११. स्वॉट विश्लेषण | दामिनी गावडे | बी.ए.भाग १ | ..७९ |
| १२. मतदार राजा जागता हो | मिथिला भोसले | बी.ए.भाग २ | ..८१ |




वैचारिक

# स्मार्ट शहरे-विकसनशील शहरांचे बदलते चित्र

कु.अनुराधा दत्ताराम केंजळे, बी.ए.भाग-१

**स्मार्ट सिटी : संकल्पना आणि धोरण**

**संकल्पना आणि व्याख्या :**

स्मार्ट सिटी या योजनेची सुरूवात वर्ष २००५ मध्ये करण्यात आली. तर अमृत योजना ही जे.एन.एन.यु.आर.एम.च्या अंमलबजावणी दशकानंतर सुरू झाली. नागरिकांसाठी देण्यात येणाऱ्या सोयी-सुविधांमध्ये ई-गव्हर्नर व सेवांची इलेक्ट्रॉनिक पोहोच, गुन्हेगारीवर नियंत्रणासाठी व्हिडीओ, सी.सी. टी.व्ही. कॅमेऱ्यांद्वारा देखरेख, जल पुरवठा व्यवस्थापनासाठी स्मार्ट मीटर्स, स्मार्ट पार्किंग आणि इंटलिजंट वाहतुक व्यवस्थापन अशा उपयांचा समावेश होतो. स्मार्ट सिटीची संकल्पना आणि धोरण कसे असावे ? केंद्र व राज्य सरकारांनी पूर्वीच्या प्रशासकीय नागरी व्यवस्थापन योजनांचा आढावा घेऊन 'स्मार्ट सिटी' अंतर्गत १०० शहरांची निवड केली. त्यासाठी लागणारे निकष, वैशिष्ट्ये अटी सर्वांची इत्यंभूत माहिती या लेखात देण्यात आली आहे.

मानवी संस्कृती शक्ती, संस्कृती, व्यवसाय आणि उत्पादनाचे केंद्र यांची शक्तीस्थळे असलेल्या शहरांनी पुढे नेली आहे. इतिहासकार सिंधु खोऱ्यातील संस्कृती ही शहरी संस्कृती मानतात. यानंतरच्या काळात भारतात प्राचीन काळात पाटलीपुत्र (पटणा), वैशाली, कोसंबी आणि उज्जैन अशी अनेक महान शहरी स्थाने आणि आग्रा आणि शहाजांहाबाद (दिल्ली) अशा मध्ययुगीन शहरी संस्कृतीचा विचार केल्यास ही यादी खूप मोठी आहे. (रामचंद्रन १९९५, चंपालक्ष्मी २००६)



*स्मार्ट सिटी संकल्पनेला समजून घेण्यासाठी शहरांचा स्वभाव समजून घेणे आवश्यक आहे. शहरे ही धन लोकसंख्येची आहेत. ज्यांच्यात व्यावसायिक कौशल्य व त्याबरोबरच सामाजिक आणि वंशीय एकजीनसीपणाचा अभाव आहे. खरेतर एकजिनसीपणाचा अभाव आणि विविधता ही नव संशोधनाला चालना देणाऱ्या ऐतिहासिक काळात स्थापना झालेल्या शहरांचे वैशिष्ट्य आहे.*

स्मार्ट सिटी संकल्पनेला समजून घेण्यासाठी शहरांचा स्वभाव समजून घेणे आवश्यक आहे. शहरे ही धन लोकसंख्येची आहेत. ज्यांच्यात व्यावसायिक कौशल्य व त्याबरोबरच सामाजिक आणि वंशीय एकजीनसीपणाचा अभाव आहे. खरेतर एकजिनसीपणाचा अभाव आणि विविधता ही नव संशोधनाला चालना देणाऱ्या ऐतिहासिक काळात स्थापना झालेल्या शहरांचे वैशिष्ट्य आहे. पण त्यात सर्व समावेशकता, प्रामाणिकपणा आणि न्याय यांचे आव्हान यात आहे. त्याबरोबरच शहरे ही अज्ञातवासात अस्तित्वात नसतात. तर ती शहरी श्रेणी रचनेचा भाग असतात. ज्यात ती एकमेकांना जोडलेली असतात. ज्याद्वारे शहरी व्यवस्था निर्माण होते. खालच्या पातळीवरील शहरांची श्रेणी रचना (छोटी शहरे आणि गावे) ही जास्त करून ग्रामीण भागांशी जोडलेली असतात. तर मोठ्या शहरांपासून ते छोट्या शहरापर्यंतच्या शहरी श्रेणी रचनेच्या सर्व पातळ्यांवर ग्रामीण भागातून शहरी भागात होणाऱ्या

स्थलांतराचा प्रभाव असतो. या दृष्टीकोनातून बघीतल्यास शहरे ही आर्थिक विकासाची केंद्रेच नाहीत तर विकासाचे फायदे शहरी आणि गामीण भागासहीत वसाहत श्रेणी रचनांच्या विविध पातळ्यांवर पोहोचवण्याचे साधन आहेत. जी शहरांपर्यंत मर्यादित नाहीत तर शहरे ही तीव्र प्रवाहाचे घटक आहेत. जी शहरे आणि ग्रामीण भागाच्या संपूर्ण स्पेक्ट्रमसाठीही आहत जे माहिती, भांडवल, वस्तूंचे दळणवळण हालचाल सेवा आणि कामगारांचे स्थलांतर यांच्या विविध पातळ्यांद्वारा एकमेकांना जोडलेली आहत. भूतकाळात अशी अनेक शहरे त्यांना आर्थिक विकास आणि सामाजिक बदल यांचे अग्रदूत राहिली आहेत. मानवी इतिहासाच्या युगारंभाबाबत ती वेगवानही राहिली आहेत.

स्मार्ट सिटीची संकल्पना प्रथम ८०च्या दशकाच्या शेवटी ''शहरांच्या बाबतीत एक नवी ओळख'' म्हणूनही पुढे आली आणि तेव्हापासून विविध बाबतीत सदर संकल्पनेचा वेगाने विकास झाला आहे. (ऍंथोपोलोस आणि वल्कली, २०१२) टाऊनसिडनुसार (२०१४) स्मार्ट सिटीज ही अशी जागा आहे जिथे माहिती तंत्रज्ञानाचा वापर जुन्या आणि नवीन समस्यांच्या निराकरणासाठी केला जातो.

**स्मार्ट सिटी मोहिम :**

२००५ मध्ये जे.एन.एन.आर.यु.एम. (जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनरूत्थान योजना)ला सुरूवात करण्यात आली. वर्ष २००५ मध्ये सुरूवात करण्यात आली स्मार्ट सिटी आणि अमृत याची पुर्नरचना जवळपास जे.एन.एन.आर.यु.एम. नंतर एका दशकानंतर करण्यात आली. जे.एन.एन.आर.यु.एम. हे आधीच्या शहरी धोरण आणि कार्यक्रमापेक्षा वेगळे होते. कारण त्यात देशाच्या आर्थिक विकासात शहरांचे असलेले महत्त्व मान्य झाले कारण देशाचे एक तृतियांश सकल राष्ट्रीय उत्पादन हे शहरातून आले होते. (भगत २०११) अलीकडचे स्मार्ट सिटी आणि अमृत हे नागरी विकासाचे कार्यक्रम जे.एन.एन.आर.यु.एम. योजनेअंतर्गत सुरू करण्यात आलेल्या नागरी विकास कार्यक्रमांशी सातत्यपूर्ण असून त्यात गांभिर्यही आले नाही.

स्मार्ट सिटीज मिशन कार्यक्रमात वर्ष २०१५-२०१६ ते २०१९-२०२० या पाच वर्षाच्या काळात १०० शहरांचा समावेश असेल. याचा कदाचित विस्तार होऊ शकेल. जो नागरी विकास विभागाच्या मुल्यांकनावर अवलंबून असेल त्यामुळे स्मार्ट सिटीच्या संकल्पना आणि कार्यक्रम हे सतत विकसित होत राहतील. सदर मोहिम स्मार्ट सिटीची कोणतीही व्याख्या देत नसली तरी ज्या शहरांना प्रगल्भ उपायांनी स्मार्ट व्हायचे आहे. अशा शहरांच्या क्षमतांना विकसित करण्यात ध्येय ठेवते. स्मार्ट याप्रगल्भ उपायांमध्ये इ गव्हर्नन्स आणि सेवांची इलेक्ट्रॉनिक पोहोच, गुन्हेगारीवर व्हिडीओद्वारे देखरेख, जलपुरवठा व्यवस्थापनासाठी स्मार्ट मीटर्स, स्मार्ट पार्किंग आणि इंटलिजंट वाहतुक व्यवस्थापन अशा अनेक उपायांचा समावेश होतो. अशा प्रगल्भ उपायांच्या वापरामुळे शहरांना तंत्रज्ञान माहिती आणि डेटा यांचा वापर सुधारणा करण्यासाठी करता येईल यामुळे विभागांवर आधारित विकास पुर्नरचना (शहर सुधार) आणि पुनर्विकास (शहर विस्तार) हे शहरांभोवती विकसीत करता येतील ज्यामुळे वाढत्या शहरी लोकसंख्येला सामावता येऊ शकेल. स्मार्ट सिटी विकासाच्या कार्यक्रमांमुळे मुबलक रोजगार निर्मिती होईल आणि गरिबांची काळजी घेतली जाईल असे परिकल्पित करण्यात आले आहे. त्यामुळे स्मार्ट सिटी ही सर्वसमावेशक असतील अशी कल्पना करण्यात आली आहे.

स्मार्ट सिटीज मोहिमेची अंमलबजावणी पूर्णवेळ विशेष, कार्यकारी अधिकारी आणि केंद्र, राज्य सरकारे आणि स्थानिक प्रशासन यांचे नामांकन असलेल्या विशेष उद्देश माध्यमांद्वारा (एसपीव्ही) केली जाईल. शहर स्तरावर एसपीव्ही ही कंपनी कायदा २०१३ अंतर्गत मर्यादित कंपनी असेल.

**आव्हाने आणि परिणाम :**

सध्याच्या भारतीय शहरी व्यवस्थेचे वैशिष्ट्ये म्हणजे त्यात ब्रिटीश काळात वाढलेल्या मुंबई, कलकत्ता आणि चेन्नई व राष्ट्रीय राजधानी दिल्ली या मोठ्या शहरांसहित ७९३५ शहरे आणि नगरे यांचा समावेश होतो. यांच्या पाठोपाठ बंगलोर, हैदराबाद, अहमदाबाद आणि पुणे अशा दुसऱ्या क्रमांकाच्या शहरांचा समावेश होतो. या आठ शहरांची एकमेकांवरील अवलंबता आणि जोडणी व त्याबरोबरच स्थानिक रूपे व शहरी क्षेत्रे यांच्यात भारताला जागतिक आर्थिक महासत्ता बनवण्याची क्षमता आहे. पण मोठ्या प्रमाणावर आव्हाने असल्यामुळे ही शहरे कदाचित हे करू शकणार नाहीत. त्यामुळे नागरी विकास कार्यक्रम महत्त्वाची भूमिका पार पाडू शकेल. विभागीय असमानता, शहरी ग्रामीण भेद आणि शहरा शहरांमधील तफावत हे भारताच्या शहरी रूपांतरण आणि आर्थिक विकासातील अडथळे आहेत. सध्याच्या केंद्र सरकारच्या स्मार्ट सिटी आणि अमृत (शहरी रूपांतरण आणि पुनरूत्थानासाठी अटल मोहिम) अंतर्गत असलेल्या संकल्पना आणि कार्यक्रम यांना सापेक्ष बघितले पाहिजे.

❖ ❖ ❖ ❖





वैचारिक

# स्मार्ट शहरे-भारताच्या वेगवान विकासाचे इंजिन

कु.अनुराधा दत्ताराम केंजळे, बी.ए.भाग-१

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी स्मार्ट योजनेअंतर्गत तरतूद केलेल्या एकूण निधीचा आकडा बघता सर्वसामान्य नागरीकांना माहिती तंत्रज्ञान युगातील संभाव्य तंत्रज्ञान विकासाची कल्पना येईल. अनेक नवनवीन योजनांच्या घोषणा आणि त्याची अंमलबजावणी या घोडदौडीत नागरिकांनी स्वत: स्मार्ट होऊन शहरे स्मार्ट करण्याची आवश्यकता आहे. प्राचीन विकसीत शहरांचे दाखले बघितल्यास, स्वातंत्र्यात्तर काळात आपण प्रशासकिय सुव्यवस्थेत मागे का पडलो याचे उत्तरही स्व अभ्यासाने सापडते. विकसीत देशांच्या शर्यतीत, स्मार्ट शहरांची शर्यतीत, स्मार्ट शहरांची बांधणी करताना, वेगवान नागरी सुविधा उपलब्ध करून देताना वर्तमानाचे भान ठेवणे आर्थिक सुबत्ता, पायाभूत नागरी सुविधा सेवा घेताना बदलत्या परिस्थितीचे भान राखल्यास अनेक नागरी कौटुंबिक, प्रशासकीय प्रश्न सुटण्यास मदत होईल.

*यावर्षीच्या अर्थसंकल्पात पंतप्रधानांनी उद्याच्या भारताला आमुलाग्र बदलण्याची एक मोठी घोषणा केली, ती म्हणजे ''१०० स्मार्ट सिटी उभारण्याची''. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांचे सरकार सत्तेत आल्यानंतर शंभर स्मार्ट शहरे वसवण्याचा संकल्प सोडला होता. या शहरांसाठी तब्बल सात हजार ६०कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली आहे.*

भारताला प्राचीन काळापासूनच संपन्न शहरांची परंपरा आहे. सिंधु संस्कृतीसारख्या जगातील सर्वात प्राचीन संस्कृतीच्या काळातदेखील शहरीकरणाचे पुरावे आढळतात. या काळात हडप्पा, मोहंजोदडो, लोथल, कालीबांगण इत्यादी अनेक शहरांनी सिंधु संस्कृतीच्या विकासात हातभार लावला. यानंतर मध्ययुगीन काळ व आधुनिक काळातही अनेक शहरे देशाच्या विकासाचे केंद्रबिंदू बनले.

स्वातंत्र्यानंतरही शहरीकरणाच्या विकासाकरिता अनेक योजना राबविल्या गेल्या. जसे शहरी पुनर्निमाण योजना, आवास योजना इत्यादी. मात्र कालौघात अनेक मोठ्या शहरांचे बकालीकरण, विद्रूपीकरण होऊ लागले. याची अनेक कारणे आहेत. जसे वाढत्या लोकसंख्येचा अतिरिक्त ताण, पायाभूत सुविधांची तिव्र टंचाई, प्रदुषण, अपुरी दळणवळण व्यवस्था, झोपडपट्ट्या व गगनचुंबी इमारतींची उभी आडवी अनियंत्रित वाढ.



**स्मार्ट शहरे :**

यावर्षीच्या अर्थसंकल्पात पंतप्रधानांनी उद्याच्या भारताला आमुलाग्र बदलण्याची एक मोठी घोषणा केली, ती म्हणजे ''१०० स्मार्ट सिटी उभारण्याची''. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांचे सरकार सत्तेत आल्यानंतर शंभर स्मार्ट शहरे वसवण्याचा संकल्प सोडला होता. या शहरांसाठी तब्बल सात हजार ६०कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. विकासाची गंगा मोठ्या लोकसंख्येपर्यंत पोहोचत असल्याने ग्रामीण भागातून शहराकडे जाणाऱ्या स्थलांतरितांची संख्या वाढतच चालली आहे. त्यामुळे सध्याच्या महानगरांच्या लगतच्या परिसरांना आणि मध्यम लोकसंख्येच्या शहरांना स्मार्ट

शहरांमध्ये रुपांतरीत केले जाईल'' असे अर्थमंत्री अरूण जेटली यांनी विषद केले. आता शहर विकास खात्याने शंभर स्मार्ट शहरांच्या यादीचे विवरण हे राज्याची लोकसंख्या व सांविधिक नगरे या आधारे (उत्तर प्रदेश १३, तामिळनाडू १२, महाराष्ट्र १०) जाहिर केले आहे. या शहरांमध्ये सर्व प्रश्नांदर स्मार्ट उत्तरे असतील. ती सुविधांच्या माध्यमातून स्मार्ट शहरे यांचा अर्थ जिथे कुठल्याही पायाभूत सुविधेची कमतरता नाही असे.

**पायाभूत सुविधा कोणत्या ?**

एक स्मार्ट शहराच्या संरचनेत पुढील घटकांचा समावेश असेल.

- पुरेसा पाणी पुरवठा,
- सुनिश्चित वीज पुरवठा,
- घनकचरा व्यवस्थापन व स्वच्छता,
- सक्षम शहरी गतिशिलता व सार्वजनिक परिवहन,
- गरिबांकरिता किफायतशीर घरे,
- सक्षम आई.टी. कनेक्टीव्हीटी व डिजिटेलायजेशन,
- सुशासन विशेषत: ई प्रशासन व नागरिकांची भागीदारी,
- सुस्थिर पर्यावरण,
- विशेषत: महिला, मुले, वृध्द नारिकांची सुरक्षा, आरोग्य व शिक्षण सुविधा.

**स्मार्ट उपाययोजना :**

ई-प्रशासन व नागरिकांना सुविधा :

१. सार्वजनिक सूचना व तक्रार निवारण
२. इलेक्ट्रॉनिक सेवा पुरवठा
३. नागरिक : शहरांचे नेत्र व कान
४. सी.सी. टी.व्ही. द्वारे देखरेख.

**कचरा व्यवस्थापन :**

५. कचऱ्यापासून ऊर्जा व इंधन
६. कचऱ्यापासून कंपोस्ट खत
७. पाण्यावर १०० टक्के प्रक्रिया.

**जल व्यवस्थापन :**

८. स्मार्ट वीज मीटर्स
९. गळतीचा शोध व उपाय
१०. जल दर्जा देखरेख.

**स्मार्ट शहरांची वैशिष्ट्ये :**

- जमिनीचा उपयोग अधिक कार्यक्षम होण्यासाठी ''योजना तयार करतील, ज्यात अनेक सुसंगत कार्यकलाप आणि एक दुसऱ्याच्या जवळील जमिनीचा उपयोग यांचा समावेश होतो. यात मिश्र जमिनीच्या वापरास चालना देणे, जमिनीच्या वापरास चालना देणे, जमिनीच्या वापरास व भवन उपनियम यामध्ये राज्य सरकारे सवलती देतील.
- सामाजिक एकोपा निर्माण होण्यासाठी विविध सामाजिक स्तरातील लोकांना आवास उपलब्ध करून देतील.
- जवळील क्षेत्राचा विकास करताना वायु प्रदूषण कमी करणे, संसाधनांची हानी रोखणे, स्थानीय अर्थव्यवस्थेस चालना देणे व सुरक्षा प्रदान करणे, प्रशासनीक सेवांचे कार्यालये थोड्या अंतरावरच असावीत.
- नागरिकांच्या जीवनात गुणवत्ता वाढविण्यासाठी परिस्थितीच्या संतुलनावर भर देताना मोकळ्या जागा पार्क, खेळांचे मैदाने व मनोरंजनाच्या स्थानास विकसित करणे.
- सर्व प्रकारच्या सार्वजनिक तसेच पर्यायी परिवहन सुविधांचा विकास करणे.
- शासनाला नागरिक अनुकूल बनविणे. यात उत्तादायित्व व पारदर्शकता आणण्यासाठी ऑन लाईन सेवांवर निर्भर राहणे. विशेषत: सेवांचा खर्च कमी करण्यासाठी मोबाईलचा उपयोग करणे.
- स्थानीय आहार, आरोग्य, शिक्षण, कला, वस्त्रे आदि मुख्य कार्याकलाप यांच्या आधारे शहरास एक ओळख करून देणे.
- क्षेत्रास आपत्तीपासून सुरक्षित ठेवणे, कमी संसाधनांचा महत्त्व उपयोग करणे व स्वस्त सेवा प्रदान करणे.

या मिशनमध्ये १०० शहरांचा समावेश केला जाईल व त्याचा कालावधी पाच वर्षे (वित्तीय वर्षे २०१५-१६ ते २०१९-२०) असेल.

❖ ❖ ❖ ❖





ललित

# शिक्षणाचे अर्थशास्त्र

कु.मोनिका संभाजी जाधव, बी.ए.भाग-१

अर्थशास्त्र हे असे सामाजिक शास्त्र आहे की ज्यामध्ये दुर्मिळ स्त्रोतांची विभागणी, निवड समाज करते, की ज्यामुळे वर्तमान व भविष्यामध्ये माल व सेवांचा पर्यायी वापर योग्य प्रकारे केला जाऊ शकतो.

अर्थशास्त्र सामाजिक शास्त्र असल्यामुळे स्वत:च्या निवडीचे आणि पर्यायी शोधण्याच्या संबंधित आहे. माल आणि सेवा कशा प्रकारे निर्माण करावयाची आणि कोणासाठी यासंबंधी समाज निर्णय घेण्यासंबंधीचा अभ्यास केला जातो. रॉबिन्सनने केलेल्या व्याख्यांनुसार ''अर्थशास्त्र'' हे सामाजिक शास्त्र आहे. ज्यात दुर्मिळ बाबींचा आणि त्यास पर्यायी वापराचा व संपवण्याच्या संबंधीच्या मानवी वर्तनाचा अभ्यास केला जातो. ॲडम स्मिथ यांच्या मते अर्थशास्त्राचा विचार राष्ट्राच्या संपत्तीच्या दृष्टिकोनातून केलेला दिसतो.

शिक्षणातून कार्यक्षम व संस्कारक्षम मनुष्यबळाची निर्मिती करून समाजाचा व राष्ट्राचा विकास करणे हे शिक्षणाच्या अर्थशास्त्राचे मुख्य उद्दिष्ट आहे. शिक्षणामुळे व्यक्तिच्या गुणवत्तेत आणि कार्यक्षमतेत बदल होतो आणि हा बदल देशाच्या भांडवल विकासाला गती देतो. शेतीप्रधान अर्थव्यवस्थेमध्ये शिक्षणाकडे दुर्लक्ष झाले. औद्योगिक क्रांतीमुळे कुशल कामगारांची गरज निर्माण झाली आहे. आज कोणत्याही प्रकारच्या अर्थव्यवस्थेत प्रगतीसाठी विकासासाठी नव्या तंत्रज्ञानाची संशोधनाची कौशल्याची गरज आहे व ही गरज शिक्षणच भागवू शकेल. शिक्षणाच्या रुपात भांडवल गुंतवणूक करून उच्च दर्जाचे मनुष्यबळ निर्माण झाले किंवा नाही. या मनुष्यबळाचा उपयोग



***शिक्षणाचे अर्थशास्त्र हे आर्थिक तत्त्वे, संकल्पना व शिक्षण प्रक्रियेतील नियम, कायदे याचे उपयोजन आहे, मानवी वर्तन (मानवी निर्णयासंबंधी) कृती प्रतिक्रिया आणि शालेय बाबतीत मानवी वर्तन आर्थिक विकासामध्ये कशाप्रकारे पुढे वाटचाल करते यासंबंधी मानवी वर्तनाचा अभ्यास केला जातो. शिक्षणाचे अर्थशास्त्र हे सामान्य अर्थशास्त्राची एक शाखा आहे.***

समाज व राष्ट्र उन्नतीसाठी कितपत होत आहे. यासंबंधीचा अभ्यास शिक्षणाच्या अर्थव्यवस्थेमध्ये केला जातो.

**शिक्षणाच्या अर्थशास्त्राचा अर्थ व स्वरूप :**

१९६० नंतर अमेरिकेतील अनेक अर्थशास्त्रज्ञांनी देशाच्या आर्थिक विकासात मानव संसाधन विकासाकडे लक्ष वेधले. त्यासाठी त्यांनी शिक्षणातील गुंतवणुकीवर जोर दिला व त्यातूनच शिक्षणाचे अर्थशास्त्र या विषयाचा जन्म झाला.

१) ''मनुष्य बळाच्या विकासासाठी केली जाणारी धनाच्या रूपात गुंतवणूक व त्याद्वारे मनुष्यबळाचा संख्यात्मक व दर्जात्मक विकास त्याचा शोध त्याचे अध्ययन व नियोजन यासारख्या अनेक संबंधित बाबींचा विचार करणारा विषय म्हणजे शिक्षणाचे अर्थशास्त्र होय.

२) ज्या अर्थशास्त्राच्या शाखेमध्ये दुर्मिळ साधनांचे वाटप विशीष्ट पूर्व निश्चित उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी

कसे करावे याच्याशी निगडीत असणारे सर्व प्रश्न अभ्यासले जातात. त्या शिक्षणाचे अर्थशास्त्र असे म्हणतात.

३) शिक्षणात वापरता येणाऱ्या वस्तुंची निर्मिती पुरवठा आणि तत्सम बाबींचे आर्थिक व्यवस्थापन करणारे शास्त्र म्हणजे शिक्षणाचे अर्थशास्त्र होय.

शिक्षणाचे अर्थशास्त्र हे एक क्षेत्र आहे. ज्यामध्ये अर्थशास्त्रापेक्षा वेगळे असून त्यामध्ये चौकशीच्या क्षेत्रासंबंधीचा अभ्यास केला जात नाही. शिक्षणाचे अर्थशास्त्र हे आर्थिक तत्त्वे, संकल्पना व शिक्षण प्रक्रियेतील नियम कायदे याचे उपयोजन आहे. मानवी वर्तन (मानवी निर्णयासंबंधी) कृती प्रतिक्रिया आणि शालेय बाबतीत मानवी वर्तन आर्थिक विकासामध्ये कशाप्रमारे पुढे वाटचाल करते यासंबंधी मानवी वर्तनाचा अभ्यास केला जातो. शिक्षणाचे अर्थशास्त्र हे सामान्य अर्थशास्त्राची एक शाखा आहे. ज्यामध्ये उपलब्ध दुर्मिळ स्त्रोताच्या निवडीनुसार वापर करून चांगल्या प्रकारे शैक्षणिक निष्पत्ती होऊ शकेल यासंबंधी शैक्षणिक व्यवस्थापक कशाप्रकारे वापर करेल याबाबत अभ्यास केला जातो. कामगार अर्थशास्त्र, वाढ व विकास, सिध्दांत अर्थशास्त्र यातील प्राथमिक संकल्पनांचा वापर शिक्षणाच्या अर्थशास्त्रात केला जातो. जगविख्यात अर्थशास्त्रज्ञ जसे ॲडम स्मिथ, अल्फ्रेड मार्शल, जॉन स्टुअर्ट मिल यांनी शिक्षणातील सार्वजनिक गुंतवणुकीत शिक्षण आणि विकास याचा मोठ्या प्रमाणावर पुरस्कार केला. १९५० मध्ये अर्थशास्त्रज्ञांनी शिक्षण आणि आर्थिक वाढ यातील सहसंध, शिक्षक आणि उत्पन्नाचे विभाजन आणि शिक्षणाला अर्थपरवठा या मुद्द्यांवर जास्त लक्ष केंद्रित केले.

शिक्षणातील उत्पादन म्हणजे इमारती तंत्रज्ञान व शिक्षक कामगार हे आवश्यक दुर्मिळ स्त्रोत आहे. धोरण निश्चित करण्याऱ्यांनी खालील गोष्टी ठरविल्या पाहिजेत.

१) शिक्षणाच्या प्रत्येक स्तरावर किती खर्च करणे. (काय उत्पादन करायचे)
२) समाजाच्या फायद्यासाठी जास्तीतजास्त शैक्षणिक सेवा कशाप्रकारे पुरवायच्या. (कशाप्रकारे शिक्षण उत्पादन करायचे)
३) शिक्षणाच्या प्रत्येक स्तरावर कोणाला शिक्षण द्यावे. (शिक्षण कोणाला पुरवायचे)

शिक्षण प्रक्रियेमध्ये तीन घटक निर्णय घेणारे आहेत, ते म्हणजे -
१) समाज
२) संस्था/पुरवठा करणारे
३) व्यक्ती किंवा (शिक्षण सेवा खरेदी करणारे)

निर्णय घेणाऱ्यांसाठी दोन महत्त्वाच्या समस्या म्हणजे निवड आणि दुर्मिळता होय.

शिक्षणाच्या अर्थशास्त्रामध्ये मुलभूत समस्या म्हणजे शिक्षणातील अनिर्बंध गरज पुरविण्यासाठी मानवी व भौतिक संसाधन मर्यादित बाबींचा समाज, संस्था आणि व्यक्ती यांना कशाप्रकारे वापर करता येईल. या मुलभूत समस्यांवर उपायासाठी काही आर्थिक संकल्पनांचा उपयोग केला जातो.

शिक्षणातील खाजगी आणि सामाजिक परतावा मानवी भांडवल आणि शिक्षणाच्या उपपत्ती/सिध्दांत शिक्षणातील अनार्थिक फायदा, शिक्षण आणि आर्थिक विकास, अर्थशास्त्राला शिक्षणाचे योगदान शैक्षणिक खर्चाचे मापन, मनुष्यबळाचे नियोजन, शैक्षणिक नियोजन आणि मानव संसाधन विकास, शैक्षणिक किंमत, किमतीचे विश्लेषण, शैक्षणिक उत्पादन, शैक्षणिक परीणामकारकता आणि कार्यक्षमता, किंमतक्षमता आणि किंमतीची परिणामकारकता, किंमत फायदा विश्लेषण आणि शिक्षक पुरवठा, शैक्षणिक आणि निष्पक्षपातीपणा या सर्वांचा शिक्षणाच्या अर्थशास्त्रात समावेश होतो.

**शिक्षणाच्या अर्थशास्त्राची व्याप्ती :**

शिक्षण क्षेत्रातील सर्व प्रश्न (उत्पादन, वितरण, वापरासंदर्भात) सोडविण्यासंदर्भात शिक्षणाचे अर्थशास्त्र कामी येते.

**१) उत्पादन :**

शिक्षणातील दर्जेदार उत्पादन निर्मितीसाठी (विद्यार्थी) आवश्यक आदाने प्रक्रिया व्यवस्थित पार पाडण्यासाठी शिक्षणाचे अर्थशास्त्र मदत करते.

**२) वितरण :**

तयार झालेले उत्पादन वितरीत झाले पाहिजे व त्यातून समाजाच्या गरजा भागल्या पाहिजेत. वितरणाची व्यवस्थासुध्दा यामध्ये येते. किंमत ठरविणे, वाटप करणे व ग्राहकांच्या गरजा, पुरवठा यासंबंधीचे प्रश्न हाताळण्यासाठी मदत होते.

**३) वापर :**

उत्पादनासाठी प्रक्रिया चालू असताना ज्या ज्या बाबींचा वापर होणार आहे याचे व्यवस्थापन तसेच ज्या ठिकाणी दुर्मिळता निर्माण





होईल अशी दुर्मिळता दूर करणे हे शिक्षणाच्या अर्थशास्त्रात समाविष्ट असते.

**शिक्षणाच्या अर्थशास्त्राची गरज :**

आर्थिक विकासाचा पायाभूत आधार म्हणजे कामगारांची गुणवत्ता. पण या गुणवत्तेत अचानक वाढ करता येत नाही. त्यासाठी विद्यार्थी देशापासूनच बालकांच्या गुणवत्तापूर्ण विकासाकडे लक्ष देणे गरजेचे आहे. तर त्यातून संस्कारक्षम कार्यक्षम मनुष्यबळाची निर्मिती होऊ शकते. यासाठी प्रत्येक देशाने शिक्षणावर किती व करा खर्च करावा, शिक्षण बचत आहे की उपभोग आहे; शिक्षक, विद्यार्थी व वेळ यांचे गुणोत्तर कसे असावे. तसेच शाळांमध्ये विद्यार्थी व शिक्षकांच्या प्रमाणात किती व कोणत्या शिक्षकांच्या असाव्यात या सुविधांचा अध्ययन अध्यापन प्रक्रियेवर कोणता परिणाम होतो या गोष्टींचा विचार करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर औपचारिक व अनौपचारिक शिक्षण प्रणालीची एकवाक्यता, मानवाच्या सर्वांगीण विकासामध्ये शिक्षणाचे योगदान व शिक्षणामुळे देशाच्या आर्थिक विकासाला कशी गती मिळू शकते. या सर्व घटकांचा विचार करणे आवश्यक आहे. तरच संस्कारक्षम व कार्यक्षम मनुष्यबळाची निर्मिती करू शकतो. या सर्व गोष्टींचा अभ्यास शिक्षणाच्या अर्थशास्त्रामध्ये केला जातो.

**सर्वकश शिक्षणासाठी अर्थव्यवस्थेत बदल :**

शिक्षण हे सर्वांगीण विकासाचे साधन आहे. समाजाच्या व राष्ट्राच्या गरजा आणि उद्दिष्ट्ये यांच्याशी शिक्षणाचा निकटचा संबंध आहे. ज्ञानाधिष्टीत अर्थव्यवस्था अस्तित्वात येण्यासाठी शिक्षण क्षेत्रावर मोठा खर्च करणे ही काळाची गरज आहे. सध्या हा खर्च करणे ही काळाची गरज आहे. सध्या हा खर्च राष्ट्रीय उत्पन्नाचा चार टक्के इतकाच आहे. तो सात टक्क्यांपर्यंत वाढवायला हवा. कारण अशा खर्चाला मनुष्यबळातील गुंतवणूक समजले जाते. या गुंतवणूकीमुळे अर्थव्यवस्थेचा विकास होतो म्हणून देशभर प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च शिक्षणाचा प्रसार व्हावा यासाठी प्रयत्न केले जात आहेत. या दृष्टीने अध्यापक शिक्षण हा मुलभूत उद्योग मानावा लागेल. यामध्ये अध्यापक निर्मिती अध्यापक सेवाशर्ती अध्यापकाची आर्थिक परिस्थिती व त्याला मिळणाऱ्या सोई सवलती यांचा हा विचार प्रामुख्याने केला पाहिजे.

ज्ञानधिष्टीत अर्थव्यवस्था अस्तित्वात येण्यासाठी शिक्षणक्षेत्रावर मोठा खर्च करणे ही काळाची गरज आहे. तसेच ज्ञानधिष्टित अर्थव्यवस्थेत प्रत्येकाला संधी प्राप्त होण्यासाठी दर्जेदार शिक्षणसुध्दा अत्यंत महत्त्वाचे आहे.

**शिक्षणाचे अर्थशास्त्र :**

शिक्षणाच्या अर्थशास्त्रात शिक्षणाच्या श्रमशक्तीचा व्यावसायिक रचनेवरील परिणाम, नेमणूका आणि वढती, श्रमिकांची अंतर्गत व बाह्य गतिक्षमता, बचत प्रवृत्ती, आंतरराष्ट्रीय व्यापाराचा आकृतीबंध आणि विकास या दोन स्वतंत्र बाबी नसून त्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. शिक्षणामुळे आर्थिक विकास घडून येतो आणि विकासामुळे जास्त शिक्षण घेण्याची प्रेरणा निर्माण होते. शिक्षण ही मानवाची प्राथमिक गरज आहे. शिक्षणाचा परिणाम पोषण, पिण्याचे पाणी आरोग्यसेवा आणि निवारा इत्यादीवर घडून येतो. माणसाच्या अनेक गरजा आहेत. त्या म्हणजे अन्न, वस्त्र, निवारा या गोष्टी माणसाच्या गरजा आहेत. शिक्षणामुळे बेरोजगारी वाढल्या आहेत. शिक्षणामुळेच प्रशिक्षीत श्रमिकांचा पुरवठा वाढतो. त्यामुळे भांडवल, तंत्रज्ञान सेवा आणि प्रशासन दत्यादीचे व्यवस्थापन सुलभरित्या करता येते.

आर्थिक वृध्दीमध्ये शिक्षणाचे योगदान महत्त्वाचे असते. शिक्षणामुळे केवळ राष्ट्रीय विकासाला चालना मिळते असे नाही. त्याद्वारे उद्दिष्ट्ये निश्चित करता येतात. शिक्षण हा मानवाचा मुलभूत अधिकार असून त्याद्वारे व्यक्तीविकास साधता येतो. पर्यायाने सामाजिक विकास साध्य झालेले आहेत. सर्वांना मुलभूत शिक्षण दिले जाते. शिक्षण यांचा परस्पर संबंध अर्थशास्त्रामध्ये घेतला जातो.

शिक्षणाचे अर्थशास्त्र हे आर्थिक तत्त्वे, संकल्पना व शिक्षण प्रक्रियेतील नियम, कायदे याचे उपयोजन आहे, मानवी वर्तन (मानवी निर्णयासंबंधी) कृती प्रतिक्रिया आणि शालेय बाबतीत मानवी वर्तन आर्थिक विकासामध्ये कशाप्रकारे पुढे वाटचाल करते यासंबंधी मानवी वर्तनाचा अभ्यास केला जातो. शिक्षणाचे अर्थशास्त्र हे सामान्य अर्थशास्त्राची एक शाखा आहे.

❖ ❖ ❖ ❖

व्यक्तिचित्रण

# अर्थशास्त्राचे जनक : ॲडम स्मिथ

कु.प्रणाली जगन्नाथ इंगळे, बी.ए.भाग-२

ॲडम स्मिथ यांचा जन्म इंग्लंडमधील किर्काल्डी (Krikcalde) या खेड्यात ५ जून १७२३ रोजी झाला. प्राथमिक शिक्षण स्थानिक शाळेत पूर्ण केले तर पुढील शिक्षण ग्लासगो आणि ऑक्सफर्ड विद्यापीठात पूर्ण झाले. त्यानंतर १७५१ ते १७६३ या काळात स्मिथ यांनी ग्लासगो विद्यापीठात तर्कशास्त्र आणि तत्त्वज्ञान या विषयांचा प्राध्यापक म्हणून काम केले. त्यांचा पहिला ग्रंथ "Theory of moral sentiments" १७५९ मध्ये प्रसिध्द झाला. यानंतर १७७६ मध्ये "An inquiry into the natural & causes of wealth of Nation" हा ग्रंथ प्रसिध्द करण्यात आला. या ग्रंथामुळे ॲडम स्मिथ यांना लोकप्रियता मिळाली. ''राष्ट्रांची संपत्ती'' या ग्रंथाच्या लेखकाचा म्हणजेच ॲडम स्मिथ यांचा ''अर्थशास्त्राचे जनक'' असा उल्लेख करण्यात येऊ लागला. १७ जुलै १७९० मध्ये वयाच्या ६७व्या वर्षी ॲडम स्मिथ यांचा मृत्यू झाला.

अर्थशास्त्र हे अलीकडील काळात विकसित झालेले सामाजिक शास्त्र असले तरी अर्थशास्त्रीय विचार हा फार पूर्वीपासून चालत आलेला आहे. परिस्थितीनुसार तो बदलत गेला. मानवाच्या जन्मापासून आणि मानवी संस्कृतीपासून आर्थिक विचारसुध्दा तेव्हापासून अस्तित्वात आहे. आर्थिक कल्पना आणि आर्थिक प्रश्न सोडविण्यासाठी विचारवंतांनी विचार प्रकट केले. यात सर्वप्रथम ॲडम स्मिथ यांनी विचार स्पष्ट केले. म्हणून त्यांना ''अर्थशास्त्राचे जनक'' असे म्हटले जाते.



### ॲडम स्मिथ यांचे श्रमविभागणीचे विचार :

स्मिथ यांनी श्रमविभागणीच्या चर्चेपासून त्यांनी ग्रंथाला सुरूवात केली. स्वत:च्या विश्लेषणात श्रमविभागणीला केंद्रस्थान दिले आहे. संपत्तीची निर्मिती श्रमातून होते, असा विचार स्मिथ यांनी मांडला. संपत्तीची वृध्दी करावयाची असल्यास श्रमविभागणीच्या तत्वावर अर्थव्यवस्थेची उभारणी

> *एका कामाचे अनेक उपविभागात विभाजन करून ते निरनिराळ्या व्यक्तींकडे किंवा गटांकडे सोपविले जाते व त्या उपविभागांत समन्वय निर्माण केला जातो. त्यामुळे उत्पादनाची सलग प्रक्रिया निर्माण होते. श्रमविभागजनामुळे त्यास सतत तेच काम करावे लागत असल्याने त्यातूनच त्याचे कौशल्य वाढते. कामातील बारकावे लक्षात येतात. त्यातून उत्पादनाचा दर्जा सुधारतो.*

झाली पाहिजे हा विचार प्रभावीपणे मांडला.

ॲडम स्मिथ यांनी श्रमविभागणीचे महत्त्व पटवून दिले. एका कामाचे अनेक उपविभागात विभाजन करून ते निरनिराळ्या व्यक्तींकडे किंवा गटांकडे सोपविले जाते व त्या उपविभागांत समन्वय निर्माण केला जातो. त्यामुळे उत्पादनाची सलग प्रक्रिया निर्माण होते. श्रमविभागजनामुळे त्यास सतत तेच काम करावे लागत असल्याने त्यातूनच त्याचे कौशल्य वाढते. कामातील बारकावे लक्षात येतात. त्यातून उत्पादनाचा दर्जा सुधारतो. ॲडम स्मिथच्या मते श्रमविभाजन हे व्यक्तीच्या स्वहित साधण्याच्या प्रवृत्तीतून निर्माण होते.

### ॲडम स्मिथ यांचे भांडवलविषयक विचार :

ॲडम स्मिथ यांनी भांडवल संचयास महत्व दिले. ''राष्ट्राची संपत्ती'' या ग्रंथात दुसऱ्या खंडात भांडवलासंबंधी विश्लेषण केले आहे.





समाजातील भांडवलाचा संचय जितका अधिक राहील तितकेच त्या समाजाचे मजुरांना रोजगार पुरवण्याचे सामर्थ्य अधिक राहते आणि तितका त्या समाजात श्रमविभागणीला वावही अधिक असतो. म्हणजेच देशातल उद्योगधंद्यांचा विस्तार वाढविणे आणि देशातील जनतेच्या कल्याणात भर टाकणे होय, असे स्मिथचे मत होते. अल्पविकसित देशांत भांडवल संचयाच्या अभावी आर्थिक विकास मंद गतीने होतो. याचा अल्पविकसित देश अनुभव घेत असतात. ॲडम स्मिथ यांच्या मते, शेतीतील भांडवलदारांना पूर्ण असे स्वातंत्र्य द्यावे. ॲडम स्मिथ यांनी भांडवल गुंतवणूक कृषी, उद्योगधंदे, घाऊक व्यापार व किरकोळ व्यापार या क्षेत्रांत करावी असे मत मांडले.

### ॲडम स्मिथ यांचे चलनविषयक विचार :

स्मिथ यांच्या मते, पैशाचा उगम माणसाच्या नैसर्गिक प्रेरणेतूनच झालेला आहे. विनिमय ही मनुष्याची स्वाभाविक प्रेरणा आहे. सुरूवातीस वस्तू देऊन वस्तू घेणे अशा विनिमय पध्दतीतील अडचणी लक्षात आल्यावर सोने-चांदी या टिकाऊ व मौल्यवान धातूंचा विनिमय माध्यम म्हणून वापर सुरू झाला. नाही हे विनिमयाच्या दृष्टीने अतिशय उपयुक्त असे चलन ठरले.

परंतु सोने किंवा चांदी या मौल्यवान धातूंचे 'चलनमाध्यम' म्हणूनच महत्त्व आहे, हे स्मिथ यांनी स्पष्ट केले. व्यापारवादी विचारसरणीने धातुंनाच संपत्ती मानण्यात मोठी चूक केली असे स्मिथ यांचे मत होते. त्यांच्या मते, मौल्यवान धातू म्हणजे संपत्ती नसून घरे, अवजारे किंवा प्रत्यक्ष उपभोगाच्या वस्तू हीच त्यांच्या मते खरी संपत्ती आहे व पैसा हे फक्त संपत्तीचे देवघेव करण्याचे एक साधन आहे.

### ॲडम स्मिथ यांचे आर्थिक विचारांतील योगदान :

ॲडम स्मिथने अर्थशास्त्राचा पाया घातला. आपण ज्या आर्थिक संकल्पनांचा आणि सिध्दांतांचा आज अभ्यास करतो, त्यापैकी बऱ्याच सिध्दांतांची सुरूवात आपल्याला स्मिथच्या लेखनात झालेली दिसून येते. त्यांनी अर्थशास्त्राची व्याप्ती निश्चित केली. स्मिथने अर्थशास्त्रामध्ये एका नवीन विचारसरणीची सुरूवात केली. त्यामध्ये सुसंबध्दता आणण्याचा प्रयत्न केला. सनातन संप्रदायाचा संस्थापक असा मान ॲडम स्मिथ यांना देण्यात आला.

निसर्गवाद्यांनी अर्थशास्त्रीय विचार मांडण्यामध्ये मौलिकता व जोम दाखविला असला तरीही आज अर्थशास्त्राचा जनक व संस्थापक म्हणून ॲडम स्मिथ यांचेच नाव घेतले जाते. स्मिथ यांच्या अनुयायांनी स्मिथ यांचा गौरव केला आहे. तसेच टीकाकारांनीही त्यांचे गुण मान्य केले आहेत.

### ॲडम स्मिथ यांचा सनातन संप्रदाय :

Classical School या शब्दाचा अर्थ अभिजात, उत्कृष्ट, सनातन असा होतो. स्मिथ यांना सनातनवादी संप्रदायाचा संस्थापक म्हणून ओळखले जाते. त्यांनी अभिजात विचारांची परंपरा सुरू केली.

युरोपातील राजकीय, सामाजिक, वैज्ञानिक, धार्मिक घटकांमधील स्थित्यंतराचा प्रभाव स्मिथ यांच्या विचारांमध्ये जाणवतो. १८व्या शतकाच्या उत्तरार्धात युरोपातील सर्व घटकांमध्ये झपाट्याने बदल झाले. त्याचा परिणाम यापूर्वी मांडलेला आर्थिक विचार मागे पडून तत्कालीन परिस्थितीत उपयुक्त ठरतील असे नवीन विचार मांडण्यात आले. यातूनच एक नवी मतप्रणाली उदयाला आली. त्यालाच पुढे सनातनवादी अर्थशास्त्र किंवा सनातनवादी संप्रदाय म्हटले गेले. या संप्रदायाचा संस्थापक स्मिथ असून त्याला पुढे माल्थस, जे.बी. से. इत्यादी तज्ज्ञ अर्थशास्त्रज्ञ या संप्रदायास लाभले.

### ॲडम स्मिथ यांचा मूल्यसिद्धांत :

ॲडम स्मिथ यांनी मूल्यविषयक विचार मांडताना मूल्य या शब्दाचे अर्थ दोन भागात स्पष्ट केले आहे. ते म्हणजे उपयोगिता मूल्य व विनिमय मूल्य.

उपयोगिता मूल्य यावरून मुख्य मुल्य ठरविले जाते, त्यास उपयुक्तता मुल्य असेही म्हणतात तर विनिमय मूल्य म्हणजे एखाद्या वस्तूच्या बदल्यात इतर वस्तूंचे किती नग मिळू शकतात यावरून जे मूल्य ठरते त्याला विनिमय मूल्य असे म्हणतात. अशा प्रकारचे मूल्य मुख्यत: हिऱ्यासारख्या वस्तूंमध्ये आढळून येते. ॲडम स्मिथ यांच्या मते, पाण्याइतकी अतिशय उपयुक्त वस्तू दिली तरी तिच्या मोबदल्यात इतर वस्तूंचे थोडेसुध्दा नग मिळू शकत नाहीत.

ॲडम स्मिथ यांच्या मते, उपयोगिता मूल्य आणि विनिमय मूल्य यांत काहीही संबंध नसतो, असे मत मांडले. वस्तूचे विनिमय मूल्य महत्त्वाचे असून ते कसे निश्चित होते यावर स्मिथ यांनी लक्ष केंद्रित केले. त्यांच्या मते, 'श्रम' ही वस्तूचे मूल्य मोजण्याची फुटपट्टी असते. कोणत्याही वस्तूचे मूल्य हे त्या वस्तूच्या निर्मितीसाठी जेवढे श्रम खर्च झालेले असतील त्या खर्च झालेल्या श्रमाइतके असते, असे स्मिथ यांचे मत होते. त्यांच्या मते, 'श्रमिकाच्या दृष्टीने समान श्रमांचे मूल्य कोणत्याही वेळी आणि कोणत्याही ठिकाणी समानच असते.

**ॲडम स्मिथ यांचे विचार (आशावादी आणि निसर्गवादी) :**

ॲडम स्मिथ यांनी आपल्या ''दि वेल्थ ऑफ नेशन्स'' या ग्रंथातील सिध्दांतांची उभारणी दोन मध्यवर्ती कल्पनांच्या आधारे केली होती. त्या दोन मध्यवर्ती कल्पना म्हणजे निसर्गवाद आणि आशावाद. ॲडम स्मिथ यांच्या मते सर्व आर्थिक संस्था एखाद्या व्यक्तीने किंवा सरकारने निर्माण केलेल्या नाहीत. तसेच त्या कायद्यानेही स्थापन केल्या नाहीत, तर त्या आपोआप निर्माण झालेल्या आहेत. अदृश्य शक्तीचा प्रभाव व निसर्गनियम यांनुसार अशा संस्था निर्माण होतात. प्रत्येकाला स्वत:चे हित कशात आहे, हे निसर्गत:च कळत असते. समाजाला हितकारक ठरणाऱ्या आर्थिक संस्थांची निर्मिती वैयक्तिक स्वार्थ साधण्याच्या नैसर्गिक प्रवृत्तीतून होते.

ॲडम स्मिथ यांचा आशावाद हा निरपेक्ष आणि सर्वव्यापी असा नव्हता. उत्पादनाच्या बाबतीत जी प्रगती झालेली दिसून येत होती त्यामुळे त्याचा दृष्टीकोन आशावादी दिसून येत होता. मात्र, विभागणीची स्थिती पाहता त्याने निराशाच प्रकट केली. स्मिथ हे आशावादी अर्थशास्त्रज्ञ होते. त्यांच्या मते, ''जे जे निसर्गनिर्मित आहे, अगर निसर्गदत्त आहे ते ते सर्व मानवांना हितकारक आणि उपकारक असते, असे मानने यालाच आशावाद असे म्हणतात.'' स्मिथ यांच्या मते, प्रत्येक व्यक्ती स्वहित साधण्याचा प्रयत्न करीत असली तरी व्यक्ती-व्यक्तींचे हितसंबंध परस्परविरोधी नसल्यामुळे त्यातून समाजहित साध्य होत असते. स्मिथच्या आशावादी विचारांचा विकास फ्रान्स आणि अमेरिकेतील अर्थशास्त्रज्ञांनी केला.

**ॲडम स्मिथ व वैचारिक प्रभाव :**

ॲडम स्मिथ यांच्या व्यक्तिगत आयुष्यातील घटनांचा जसा त्यांचे विचार घडविण्यात काही वाटा आहे तसाच तत्कालीन आर्थिक, सामाजिक परिस्थितीचाही त्यांचा विचारांवर परिणाम झालेला आढळतो. स्मिथ यांच्या काळात युरोप खंडात मुख्यत: इंग्लंडमध्ये जी परिस्थिती निर्माण झालेली होती तिचा परिणाम ॲडम स्मिथ यांच्या विचारसरणीवर आणि तत्त्वज्ञानावर झाला होता. त्या काळात सामाजिक, राजकीय आणि आर्थिक क्षेत्रात क्रांतिकारक बदल घडून येत होते. त्यानंतर १७५६ ते १७६३ या काळातील इंग्लंड आणि फ्रान्समधील सप्तवार्षिक युध्द संपले. फ्रान्समधील राज्यक्रांती व अमेरिकेचे स्वातंत्र्ययुध्द इ. क्रांतिकारक घटना घडवून आणण्यासाठी आवश्यक असणारी नवी विचारसरणी प्रभावी ठरू लागली. थोडक्यात, व्यक्तिस्वातंत्र्य, व्यक्तीचे हक्क, समता इ. कल्पना मान्य होऊ लागल्या होत्या. अशाप्रकारे स्वतंत्र आणि स्वास्थ्य हे विचार सर्वत्र मांडले जात असतानाच ॲडम स्मिथ यांच्या लिखाणात त्यांचा प्रभाव पडावा हे योग्यच होते.

ॲडम स्मिथ यांनी आपल्या आर्थिक विचारांमार्फत आपला ठसा अर्थशास्त्रात उमटवला आहे. त्यामुळे जरी १७ जुलै १७३० मध्ये ॲडम स्मिथ यांचा मृत्यू झाला असला तरी आजही ह्या जगात ॲडम स्मिथ यांना ''अर्थशास्त्राचे जनक'' म्हणून ओळखले जाते. त्यांचे आजही विचार अभ्यासले जातात. त्यामुळे जरी ते शारीरिक दृष्ट्या या जगात नसले तरी वैचारिकदृष्ट्या ते आजही जिवंत आहेत. ॲडम स्मिथ हे आपल्या वैचारिकतेवर आज ह्या जगात प्रसिध्द आहेत. जोपर्यंत पृथ्वीवर सजीवता असेल तोपर्यंत अर्थशास्त्र ह्या जगात असेल आणि अर्थशास्त्रात ॲडम स्मिथ यांचे प्रभावी विचार असतील. अशाप्रकारे ॲडम स्मिथ यांची कामगिरी अमूल्य आहे.

❖ ❖ ❖ ❖

## *Nobel Prize Winners 2015*

- **Takaaki Kajita and Arthur B. McDonald**
  For the discovery of neutrino oscillations, which shows that neutrinos have mass
- **Youyou Tu**
  For her discoveries concerning a novel therapy against Malaria.
- **William C. Campbell and Satoshi Omura**
  For their discoveries concerning a novel therapy against infections caused by roundworm parasites.
- **Svetlana Alexievich**
  For her polyphonic writings, a monument to suffering and courage in our time
- **Tomas Lindahl, Paul Modrich and Aziz Sancar**
  For mechanistic studies of DNA repair

**Collection : Ashwini Shedage, B.A.III**





समीक्षा

# ''गांधीपूर्व'' काळातील भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील 'स्त्रियांचे कार्य'

कु.काजल शंकर घाडगे, बी.ए.भाग-३

आधुनिक भारताच्या इतिहासात ''स्वातंत्र्य चळवळ एक सुवर्ण पान मानले जाते.'' यातील संघर्ष महत्त्वाचा व वैशिष्ट्यपूर्ण आहे. कारण यामध्ये स्त्रीवर्गाने महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे. शतकानुशतके सामाजिक बंधनांच्या बेड्या या काळात भारतीय स्त्रीने तोडल्या. स्वातंत्र्य लढ्यात भाग घेऊन तिने हा लढा कायम तेवत ठेवला. पुरुषांच्या बरोबरीने स्वातंत्र्य लढ्यात भाग घेऊन हा लढा यशस्वी केला. यात त्यांनी अनंत हाल अपेष्टा सहन केल्या. त्यामुळे या लढ्याला उदात्तता प्राप्त झाली. गांधीपूर्व काळातील भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातील स्त्रियांचे कार्य अत्यंत महत्त्वाचे आहे.

> *आधुनिक भारताच्या इतिहासात ''स्वातंत्र्य चळवळ एक सुवर्ण पान मानले जाते.'' यातील संघर्ष महत्त्वाचा व वैशिष्ट्यपूर्ण आहे. कारण यामध्ये स्त्रीवर्गाने महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे. शतकानुशतके सामाजिक बंधनांच्या बेड्या या काळात भारतीय स्त्रीने तोडल्या. स्वातंत्र्य लढ्यात भाग घेऊन तिने हा लढा कायम तेवत ठेवला.*

सन १८८५ ला राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेनंतर राजकीय क्षेत्रात स्त्रियांचा उदय खऱ्या अर्थाने झाला. सन १८८५ ला 'मॅडम भिकाजी रूस्तुम कामा' या काँग्रेसच्या अधिवेशनास उपस्थित होत्या. याच अधिवेशनात सर चार्लस ब्रॉडला यांच्या प्रयत्नांमुळे पंडिता रमाबाई यांच्या नेतृत्वाखाली ८ स्त्रियांनी राष्ट्रीय काँग्रेसच्या महिला मंडळाचे प्रतिनिधीत्व केले. यात सरिता माणेकजी, रमा वडेर, परमांवाई, शेवंताबाई त्रिंबक, फॅरन डिसूझा, कॅनरन, काशीबाई कानेटकर, कदंबिनी बोस या सहभागी झाल्या. भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातील स्त्रियांची खऱ्या अर्थाने ही सुरूवात होय.

राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेनंतर खऱ्या अर्थाने भारतीय स्त्री सुशिक्षीत जी होती ती या चळवळीत सहभागी झाली. अडाणी स्त्री मात्र या चळवळीपासून दूर होती. मॅडम भिकाजी रूस्तूम कामा यांनी भारताचा पहिला राष्ट्रध्वज तयार केला व 'आंतरराष्ट्रीय समाजवादी परिषद' स्टॅटगार्ड जर्मनी येथील परिषदेत फडकविला. हिरवा, लाल व केशरी हे तीन रंग होते. सूर्य व चंद्र प्रतिमा होत्या. लालरंग शक्ती, केशरी विजय, हिरवा धैर्य, उत्साह यांचे प्रतिक होता. ध्वजावर सूर्य-हिंदू, चंद्र-मुस्लीम धर्म प्रतिक सूचीत केले होते. ब्रिटन, अमेरिका, जर्मनी येथे त्यांनी भारताच्या स्वातंत्र्य लढ्याबाबत लोकमत जागृत केले. ब्रिटनचे भारतीय लोकांवरील अत्याचार स्पष्ट मांडले. त्या भारताच्या अमेरिकेतील पहिल्या सांस्कृतिक प्रतिनिधी होत.



काँग्रेस मजबूत बनत चालली होती. राजकीय हक्कासाठी चळवळी सुरू केल्या होत्या. काँग्रेसची चळवळ दुभंगली जावी यासाठी इंग्रजांनी विविध प्रयत्न केले. याला विरोध म्हणून महिलांनी चर्चासत्रे, बैठका यांचे नियोजन केले व लोकजागृतीचे कामकाज केले. १९०५च्या 'बंगाल फाळणी' विरोधात 'बहिष्कार व स्वदेशी'चा पुरस्कार यात भारतीय महिला आघाडीवर होत्या. बंगालमध्ये स्वर्णकुमारीदेवी, सरलादेवी राणी व कुमुदिनी मित्तल या महिलांनी 'बहिष्कार व स्वदेशी'चा पुरस्कार सुतकताई, चरखा महत्त्व पटविण्यासाठी अनेक ठिकाणी सभा घेतल्या.

सन १८९७मध्ये सरलादेवी राणी यांनी 'भारती'या बंगाली मासिकाचे संपादन कामकाज केले. त्यातून त्यांनी अंधश्रध्दा, रुढी, परंपरा, आधुनिक शिक्षण, हिंदू-मुस्लीम एकता यांचा प्रसार केला. सरलादेवी राणी यांनी विविध प्रांतातील स्त्रीयांनी भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात सहभागी व्हावे यासाठी कविता रचली व ती काँग्रेसच्या अधिवेशनात गायली. तसेच सरलादेवी राणी यांनी 'स्वदेशी लक्ष्मी भांडार' हे दुकान चालविले. माल्डा येथे हातमाग उभारले. या हातमागाचे तलम कापड प्रसिध्द होते. सन १९०४मधील तलम वस्त्र निर्मितीचे बक्षीस त्यांना मिळाले होते.

बंगालमधील मेमनसिंग जिल्ह्यात स्थापन झालेल्या 'सुन्हाद समिती' या संघटनेशी त्यांचा जवळचा संबंध होता. या समितीमधील कार्यकर्त्यांनी भूमिगत राहून पुढे कामकाज केले.

'कुमुदिनी मित्तल' या काँग्रेसच्या तत्कालीन एक सक्रिय कार्यकर्त्या होत्या. त्यांनी 'बंगाली ब्राम्हण स्त्रियांची संघटना' स्थापन केली. यातील सर्व महिला सुशिक्षीत होत्या. त्यांनी काँग्रेसचे कार्य प्रामाणिकपणे केले. बंगाली ब्राम्हण स्त्रियांनी गोपनिय काम केले. ब्रिटीश पोलिसांच्या हालचालीवर या महिला नजर ठेवून असत.

आर्य समाजाच्या कार्यामुळे देशसेवा करणारी एक पिढी भारतात निर्माण झाली. त्यात काही महिला होत्या. आर्य समाजाच्या महिला कार्यकर्त्यांनी गांधीपूर्व काळातील भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात मोठी कामगिरी केली. यामध्ये पुरणदेवी, हरिदेवी, अग्यावतीदेवी शर्मा यांचे कार्य पंजाबात महत्त्वाचे होय. या महिलांनी 'बहिष्कार व स्वदेशी' चा पुरस्कार सुतकताई, चरखा महत्त्व पटविण्यासाठी अनेक ठिकाणी सभा घेतल्या. पुरणदेवी यांचा पंजाबातील क्रांतीकारकांशी संबंध होता. संदेश वहन, जेवण डबे पोहच करणे, शस्त्रे पोहचविणे इ. कामे त्यांची केल्याची नोंद आढळते.

हरिदेवी यांनी 'भारतभगिनी' हे हिंदी वर्तमानपत्र सुरु केले. 'बहिष्कार व स्वदेशी'चा पुरस्कार, तुरुंगातील हिंदी कैदी यांची वाईट अवस्था यावर विपुल प्रमाणावर लेखन केले. तुरुंगातील हिंदी कैदी यांच्यासाठी पैसा उभा केला तर अग्यावती देवी शर्मा यांनी पंजाब प्रांतात अनेक सभा घेतल्या त्या सभांमधून त्यांनी भारताचा प्राचीन वैभवशाली इतिहास, देशभक्ती व समाजसेवा या बाबत मोठी जागृती केली. स्त्रियांना प्रेरणा व स्फूर्ती दिली.

महाराष्ट्रात गांधीपूर्व काळात बाबाराव सावरकरांची पत्नी येसूबाई सावरकर यांनी 'आत्मनिष्ठ युवती संघ' ही तरुण मुलींची संघटना स्थापन केली. या संघटनेने 'बहिष्कार व स्वदेशी'चा पुरस्कार, हळदी-कुंकू सण व उत्सव, जयंती व पुण्यतिथी या सारखे उपक्रम राबविले आणि स्त्रीवर्गात जागृती निर्माण केली. सामुहिक वृत्तपत्र वाचन, पैसा फंड उभा करणे, बांगडी काच तयार केली. तळेगांव या ठिकाणी बांगडी कारखाना उभा केला. पैसा फंड बांगड्या देशभक्तीचे प्रतिक बनल्या. येसूबाईनी सन १९०९ नाशीक कटातील शस्त्रे नष्ट करून टाकली.

यशोदाबाई भट या संस्कृत, सुशिक्षीत होत्या. त्यांनी स्त्रीवर्गात जागृती निर्माण करण्यासाठी केसरी, मराठा, इंदूप्रकाश व स्वदेशी समाचार इ. वृत्तपत्रातून राष्ट्र उभारणीत स्त्रियांचे महत्त्व विशद करणारे लेख लिहिले. भजन, किर्तन व राष्ट्रीय शिक्षण याचा वापर महिलांनी करावा असा संदेश त्यांनी दिला.

प्रारंभीच्या काळात स्त्रिया जागृत व्हायला सुरुवात झाली होती. अल्प का असेना पण स्त्रिया स्वातंत्र्यचळवळीत योगदान करीत होत्या. पण या चळवळीचे स्वरुप व्यापक नव्हते. ''भारतीय स्त्रियांमध्ये सामाजिक व राजकीय जागृतीची सुरुवात होती.'' पुढील काळात सरोजिनी नायडू, कस्तुरबा गांधी, कमला नेहरू, विजयालक्ष्मी पंडित, पद्मजा नायडू, संचेता कृपदानी, भगिनी निवेदिता, मिरा अफीसा, डॉ. ॲनी बेंझट, मीरावेन, सरलावेन इ. महिला नेतृत्व निर्माण झाले. प्रारंभीच्या काळात ज्यांचे कुटुंबिय, नातेवाईक या चळवळीत होते अशा घराण्यातील स्त्रियांनी यामध्ये सहभाग घेतला. म. गांधींच्या विविध चळवळींमुळे अनामिक, अशिक्षीत, ग्रामीण, शेतकरी महिलांनी पुढे सन १९२० नंतरच्या काळात मोठी कामगिरी केली.

❖ ❖ ❖ ❖





वैचारिक

# दहशतवाद

कु.पूजा दत्तात्रय पाटील, बी.ए.भाग-३

*एकूणच काय तर दुसऱ्यावर अधिकार गाजवणे व स्वत:ची श्रेष्टता सिध्द करण्यासाठी दहशतवादी संघटना कार्य करत आहेत. भारतच नव्हे तर सर्व देश अगदी महासत्ता असणारेही दहशतवादाच्या छायेखाली आले आहेत. असा हा दहशतवाद मर्यादित न राहता अगदी घराघरांत पोहचला आहे.*

दहशतवाद ही आता संपूर्ण जगाला भेडसावणारी समस्या बनली आहे. जगाच्या निरनिराळ्या भागात दहशतवादी संघटनांचा उदय होऊ लागला असून त्यांनी अवघ्या मानवजातीला वेठीस धरण्याचा प्रयत्न चालविला आहे. दहशतवादी संघटनांनी विविध देशांत माजविलेल्या हिंसाचारामुळे सर्वसामान्य लोकांच्या मनात असुरक्षिततेची भावना उत्पन्न होऊ लागली आहे. आज आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षिततेची भावना उत्पन्न होऊ लागली आहे. आज आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता यांस निर्माण झालेला सर्वात गंभीर धोका म्हणून दहशतवादाकडे पाहिले जाते. याच कारणासाठी आंतरराष्ट्रीय समुदायातील बहुतेक सर्व राष्ट्रांनी दहशतवादाचा खंबीरपणे मुकाबला करण्याचा मनोदय व्यक्त केला आहे.

अलिकडील काळात दहशतवादाने आंतरराष्ट्रीय स्वरूप धारण केले असले तरी दहशतवादी सर्वसामान्य व्याख्या देणे तसे कठीणच आहे. याचे कारण असे की, दहशतवाद हा शब्द वेगवेगळ्या अर्थानी वापरला जातो. दहशतवादाकडे पाहण्याची प्रत्येकाची दृष्टी वेगळी असते; त्यामुळे प्रत्येकजण स्वत:च्या दृष्टीकोनातून दहशतवादाचा अर्थ लावत असतो. तथापि, दहशतवाद आणि हिंसाचार यांचा निकटचा संबंध असतो याबाबत सर्वांचे एकमत आहे.

दहशतवाद म्हणजे अशी पध्दती होय की, ज्याद्वारे संघटीत गट किंवा पक्ष नियोजनबध्द हिंसाचाराच्या मार्गाने आपले उद्दिष्ट्य साध्य करण्यावर भर देत असतात. दहशतवाद व हिंसाचार यांचे नाते अतूट असले तरी त्यांमध्ये काही फरकही आहे. समाजात निरनिराळ्या कारणांमुळे लोकांकडून बऱ्याच वेळा हिंसाचाराचा अवलंब



केला जातो. संप, बंद, हरताळ, मोर्चा अशा प्रसंगी जमाव काही वेळा हिंसक बनतो. परंतु दहशतवादी गट किंवा संघटना यांच्याकडून होणारा हिंसाचार नियोजनबध्द असतो. त्यांनी काही विशिष्ट उद्देश मनाशी ठेवून हिंसाचार माजविण्याची योजना आखलेली असते आणि अतिशय शिस्तबध्द पध्दतीने ती योजना तडीस नेलेली असते.

काहीजण दहशतवाद आणि क्रांतिकारक चळवळी यांचीही गल्लत करतात. भारतीय स्वातंत्र्यचळवळीच्या काळात देशातील बंगाल, महाराष्ट्र, पंजाब इ. प्रांतात काही भारतीय स्वातंत्र्य योद्ध्यांनी सशस्त्र क्रांतीच्या मार्गाने इंग्रजी सत्ता उलथवून टाकण्याचे उद्दिष्ट ठेवले होते आणि त्या दृष्टीने प्रयत्नही केले होते. परंतु दहशतवाद आणि क्रांतिकारक चळवळ यांतील महत्त्वाचा फरक असा की, भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील व्यापक लढ्यातील क्रांतीकारकांनी सामान्य जनतेला वेठीस

धरण्याचा प्रयत्न कधीही केला नव्हता. दहशतवादी गट व संघटना यांचा मात्र सर्वसामान्य लोकांच्या मनात भीती किंवा दहशत उत्पन्न करणे हाच प्रमुख उद्देश असतो.

दहशतवादाचे आणखी एक वैशिष्ट्य असे सांगता येईल की, बहुतेक सर्वच दहशतवादी गट व संघटना मानवी मूल्यांची जराही तमा बाळगत नाहीत. रक्तपात घडवून आणणे, निरपराध लोकांचा बळी घेणे, अमानुष कृत्ये करणे यांत त्यांना काहीही वावगे वाटत नाही. दहशतवाद्यांना शांततेच्या मार्गावर मुळीच विश्वास नसतो.

दहशतवादाचा एक प्रकार म्हणजे राज्यपुरस्कृत दहशतवाद. याचा अर्थ सार्वभौम राज्याने किंवा राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्रात दहशतवादाची निर्यात करण्याचा प्रयत्न होय. आपला देश देखील राज्य पुरस्कृत दहशतवादाचा बळी ठरला आहे. भारतात झालेल्या दहशतवादी कारवायांपैकी बहुतेक सर्व कारवायांचा मुख्य स्त्रोत पाकिस्तानातच आहे. भारताला उपद्रव देण्याचा एक मार्ग म्हणून पाकिस्तानी राज्यकर्त्यांनी भारतात दहशतवाद पसरविण्याच्या पर्यायाची निवड केली आहे.

आपला देश राज्यपुरस्कृत दहशतवादाप्रमाणेच सीमापार दहशतवादाचा बळी ठरला आहे. गेल्या काही वर्षापासून जम्मू-काश्मिर राज्यात हरकत-उल-मुजाहिद्दीन, लष्कर-इ-तोयबा, जैशे मोहंमद, हिज्बल मुजाहिद्दीन, हरकत-अल-अन्सार यासारख्या दहशतवादी संघटना हिंसाचाराचे थैमान माजवित असल्याचे दिसते. व त्यामुळे जम्मू-काश्मिर सारखे पृथ्वीवरील स्वर्ग मानले जाणारे एक अनमोल राज्य व त्याची सुंदरता नष्ट होत चालली आहे. भारताच्या सीमेपलीकडून येणाऱ्या प्रशिक्षीत दहशतवाद्यांच्या कारवाया आता जम्मू-काश्मिरसारख्या एखाददुसऱ्या राज्यापुरत्या मर्यादित राहील्या नाहीत. देशाच्या संसदेवर झालेला दहशतवादी हल्ला, मुंबईत लोकल रेल्वेगाडीत झालेले बॉम्बस्फोट या सर्व घटनांच्या मागे सीमेपलीकडून आलेल्या दहशतवाद्यांचाच हात होता. हे आता पुराव्यानिशी सिध्द होत आहे. २६ नोव्हेंबर, २००८ रोजी मुंबईवर झालेला दहशतवादी हल्ला व हल्ल्यात सहभागी असलेले सर्व दहशतवादी पाकिस्तानातून आले होते. या दहशतवादी संघटना पाकिस्तानात आजही सक्रिय आहेत. अगदी ताजे उदाहरण घ्यावयाचे झाल्यास पठाणकोट येथील हवाई दलावरील दहशतवादी हल्ला या अमानुष हल्ल्याने आपले जवान तर त्यांच्या घरच्यांनी आपली जीवलग माणसं गमावली.

काय मिळत असावं या अमानुष कृत्यांतून ? दहशतवादाने इतकं उग्र रूप धारण केलं आहे की, यामुळे आज मुंग्या मराव्या तशी माणसं मारली जात आहेत. इराण-इराक, सिरीया यासारख्या देशात तर शांतता म्हणजे तरी नक्की काय असतं हेच तिथले लोक विसरले आहेत. त्या ठिकाणी जन्मास येणारं प्रत्येक अर्भक हे या दहशतवादाचं बळी ठरत असतं. बाहेरचं काय पण भारतातही तीच परिस्थिती निर्माण होत चालली आहे. व त्यामुळेच देशात प्रजासत्ताक व स्वातंत्र्यदिनी 'अलर्ट' जाहिर करावा लागतो.

एकूणच काय तर दुसऱ्यावर अधिकार गाजवणे व स्वतःची श्रेष्ठता सिध्द करण्यासाठी दहशतवादी संघटना कार्य करत आहेत. भारतच नव्हे तर सर्व देश अगदी महासत्ता असणारेही दहशतवादाच्या छायेखाली आले आहेत. असा हा दहशतवाद मर्यादित न राहता अगदी घराघरांत पोहचला आहे. हे सत्य स्वीकारावेच लागेल. भारताला अशा दहशतवादाचा वाढता आवाका लक्षात घेवून ठोस पावले उचलावी लागणारे अशी चिन्हे दिसू लागली आहेत. आज आंतरराष्ट्रीय स्तरावर ईसीस या दहशतवादी संघटनेमुळे तिसरे महायुद्ध होण्याची शक्यता आहे. आज जगाला म.गांधीच्या सत्य, अहिंसा व शांतता या मार्गानेच जावे लागेल.

❖ ❖ ❖ ❖





विकल्प

# मुक्या प्राण्यावर प्रेम करा

कु.मनीषा काळे, बी.ए.भाग-३

*मानवेतर प्राण्यांच्या गरजा अनुवंशिक तंत्राने भागविल्या जातात. तर मानव समाजाच्या गरजा सामाजिक, सांस्कृतिक तंत्राने भागविल्या जातात. काही जंगली प्राणी हिंस्त्र असतात. परंतु त्यांना माणसाळलेकी ते ही चांगले वागण्याचा प्रयत्न करतात. आपण प्राण्यांची सर्कस पाहतो. त्या हिंस्त्रप्राण्यात चांगले वर्तणुकीसाठी रिंगमास्टरकडे चाबूक असतो.*

ही वास्तव परिस्थिती आहे एका वाळीत टाकलेल्या एका वानराची. श्री व्यंकटेश माडगुळकर यांनी लिहिलेल्या 'सत्तांतर' वानरांची कथा वेगळी आहे. २४ नोव्हेंबर २०१५ रोजी महाराष्ट्राचे शिल्पकार कै. यशवंतरावजी चव्हाण यांच्या पुण्यतिथीचा कार्यक्रम कराडला संगमावर असतो. माननीय मुख्यमंत्री या कार्यक्रमाला उपस्थित असतात. या कार्यक्रमाला एक वानर व्यासपीठावर हजर होते. वानर आल्यामुळे पोलीस दलाची पंचाईत झाली. या वानराला हाकलण्याचा सुरक्षा दलाने कसोशीने प्रयत्न केला. त्या वानराला डिवचले की ते भीती दाखविण्याचा प्रयत्न करते, दात विचकते, अंगावर उडी घेण्याचा प्रयत्न करणे

हेच वानर म्हणजे मारुतीचे रूप आहे. (अवतार) हे वानर उंब्रज या गावी आले. वानराने उंब्रजच्या कुस्तीच्या मैदानात हजेरी लावली. एका पैलवानाच्या हातात हात दिला हे विविध चॅनेलवाल्यांनी महाराष्ट्रभर टी.व्ही.च्या माध्यमातून दाखविले. महात्मा गांधी विद्यालय उंब्रजच्या परिसरामध्ये वास्तव्य करू लागले. सकाळी-दुपारी प्रार्थनेच्या वेळी वानर विद्यार्थ्यांच्या गर्दीमध्ये वावरू लागले. ते वानर माणसाळलेले होते. विद्यार्थी वर्ग त्या वानरांच्या मागे लागत असे. कित्येक विद्यार्थी भीतीने दुसऱ्या विद्यार्थ्यांना ढकलत असत. विद्यार्थी-विद्यार्थीनी जखमी होत. हायस्कूलच्या प्रशासकांनी ते वानर पकडून जंगलात सोडण्यासाठी वनअधिकाऱ्यांना सांगितले. परंतु ते वानर त्यांच्या दृष्टीस पडेना आणि दृष्टीस पडल्यास ते त्यांना हुलकावणी देऊन रोज विद्यालयामध्ये येत आहे. ते वानर कधी कधी वर्गात प्रवेश करत आहे. मानवेतर प्राण्यावर प्रेम केले की ते कुणालाही इजा (जखमी) करत नाही. श्री. जाधव सराच्या मागे वानर येत असते. जाधव सरांनी आता जा असा आदेश दिल्यानंतर ते जात असते.



सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालयाच्या परिसरामध्ये २६ जानेवारी दिवशी ध्वजवंदनासाठी ते वानर आले. प्राध्यापक विद्यार्थ्यांच्या समवेत त्याने ध्वजवंदनासाठी उपस्थिती दाखविली. प्रा. यादव सर व प्रा.डी.जे. पाटील यांनी अर्धी चपाती त्या वानराला हातात दिली. ती चपाती वानराने आनंदाने झेलली व खाल्ली. अर्थात त्याला भूक लागली होती.

महिला महाविद्यालयातील विद्यार्थिनींची परीक्षा चालू असताना ते वानर विद्यार्थीनींच्या बरोबर आले. त्या वानराला चपाती दिली. कु. शेडगे, कु. जाधव, कु. काळे, कु. थोरात या असंख्य विद्यार्थीनींनी त्या वानराला बिस्कीट, चपाती, पाणी दिले. कु. जाधव या विद्यार्थीनीने त्या वानरास पाण्याची बाटली देऊन पाणी पाजले. वनस्पतीचा पाला, फुले, फळे खाऊन ते वानर दाट झाडीमध्ये विश्रांती घेण्यासाठी गेले. तेथील प्राध्यापक वर्गानी विद्यार्थ्यांमध्ये चांगले संस्कार

केले आहेत. वानरावरती दया, प्रेम दाखविल्यानंतर ते वानही कुणालाही भीती दाखवित नाही.

मानवेतर प्राण्यांच्या गरजा अनुवंशिक तंत्राने भागविल्या जातात. तर मानव समाजाच्या गरजा सामाजिक, सांस्कृतिक तंत्राने भागविल्या जातात. काही जंगली प्राणी हिंस्त्र असतात. परंतु त्यांना माणसाळलेकी ते ही चांगले वागण्याचा प्रयत्न करतात. आपण प्राण्यांची सर्कस पाहतो. त्या हिंस्त्रप्राण्यात चांगले वर्तणुकीसाठी रिंगमास्टरकडे चाबूक असतो. चाबकाच्या भीतीने तो हिंस्त्र प्राणी चांगले वर्तन करीत असतो. परंतु प्रकाश आमटे, सौ. मंदाकिनी आमटे यांनी संपूर्ण मानव जातीला दाखवून दिले की मानवेतर हिंस्त्र प्राण्यांवर प्रेम केले की ते ही मानवावर प्रेम करतात. मानव समाजामध्ये जनजागृतीसाठी ॲनिमल प्लँटस, डिस्कवरी, नॅशनल जीओग्राफी हे टी.व्ही. चॅनेल्स जरूर पाहावेत.

❖ ❖ ❖ ❖



## प्रबोधन

खर्चु नका देवासाठी पैसा ।
शिक्षणाला पैस तोच द्या हो ।।

नको मंदिरांची करावया भर ।
छात्र जो हुशार त्यास द्यावा ।।

नको धर्मकृत्ये पैसा खर्चुनिया ।
घेण्यासाठी विद्या तोच खर्चा ।।

शाळेहुन नाही थोर ते मंदिर ।
देणगी उदार शाळेला द्या ।।

भक्तीचा प्रसार नाही श्रेयस्कर ।
शिक्षण प्रसार सर्वश्रेष्ठ ।।

गरिबांनी तरी फेकावा विश्वास ।
देवाजीची आस पूर्ण खोटी ।।

नसलेले देव कोठून येणार ?
कल्याण होणार कधी सांगा ।।

स्वतःचा उद्धार करा प्रयत्नाने ।
शक्तीने, युक्तीने सुखी व्हावे ।।

- संत गाडगेबाबा

**संकलन : कु.स्नेहा उमेश वावर**
बी.ए.भाग-१



## माजी राष्ट्रपती ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचे निवडक विचार

- आपण झोपेत पाहतो ते खरं स्वप्न नसतं, तर आपली झोप उडवतं ते खरं स्वप्न असतं.
- देशात सर्वाधिक बुद्धिमत्ता असलेल्या व्यक्ती शक्यतो वर्गातील शेवटच्या बाकावरचं सापडतात.
- तुमच्या पहिल्या विजयानंतर विश्रांती घेऊ नका. कारण दुसऱ्या प्रयत्नात तुम्ही अयशस्वी झालात तर तुमचा पहिला विजय केवळ नशीबाचा भाग होता, असे म्हणायला अनेकजण सज्ज असतात.
- जेव्हा पाऊस सुरु होतो तेव्हा सर्व पक्षी घरट्यात आसरा घेतात. मात्र, गरुड पावसापासून बचाव करण्यासाठी ढगांवरून उडतो.
- यशाबद्दलची माझी निष्ठा कणखर असेल तर मला अपयशामुळ कधीच नैराश्य येणार नाही.
- यशाचा आनंद अनुभवण्यासाठी व्यक्तीला आयुष्यात अडचणींचा सामना करणे आवश्यक असते.
- स्वप्न खरी होण्यासाठी स्वप्नं पाहणं गरजेचं आहे.
- एखाद्याचा पराभव करणे फार सोपे असते, मात्र एखाद्याला जिंकणे खूपच अवघड असते.
- आपण आपल्या वर्तमानातील गोष्टींचा त्याग करून जेणेकरून आपल्या मुलांचं भविष्य उत्तम होईल.

**संकलन : कु.वर्षा सुरेश सावळे**
बी.ए.भाग-१





मंथन

# शकुन व अपशकुन - एक समाजशास्त्रीय संशोधन

कु.दीपाली घाडगे, बी.ए.भाग-३

मानव समाजामध्ये राहतो. संस्कृतीनुसार मानवाच्या विचार-आचारामध्ये, दृष्टीकोनामध्ये फरक दिसून येतो. मानवाने आपल्या परंपरेनुसार विचारामध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन बाळगलेला नाही. पिढ्यानपिढ्या तेच विचार दुसऱ्या पिढीकडे संक्रमित झालेले असतात. मानव समाजामध्ये मानवेतर प्राण्यांच्या बाबतीत समज-गैरसमज-शकुन-अपशकुन निर्माण झालेले आहेत. मानव समाजात या शकुन-अपशकुन वरती प्रचंड विश्वास असतो. ते शकुन-अपशकुन खरे की खोटे याची सत्यता पाहू शकत नाही. मानव समाजामध्ये अजूनही अज्ञान-निरक्षरता असल्याचे दिसते. हे शकुन-अपशकुन मानव समाजामध्ये पुढीलप्रमाणे दिसतात-

*आपले असणारे समज, गैरसमज, शुभ-अशुभ घटनेविषयी असणारी माहिती आपणाला विविध वर्तमानपेपेर, मासिके, रेडीओ, टी.व्ही. असणारे चॅनेल्स डिस्कवरी, नॅशनल जिओग्राफी, ॲनिमल प्लँटस या माध्यमातून प्रचंड माहिती मिळते व आपले असणारे अज्ञान दूर होते. विज्ञानाच्या कसोटीला मानव उतरू शकतो.*

१) कावळा ओरडला की पाहुणे येणार. मुळात भारतीय संस्कृती सांगते अतिथी देवो भव. येणाऱ्या पाहुण्यांचे आदरातिथ्य/स्वागत करा. भारतीय समाज जगामध्ये सहिष्णु प्रवृत्तीचा आहे.

२) नदीच्या काठाला कुंभार कावळ्याने काव-काव आवाज केला की आजचा दिवस चांगला जाणार.

३) कोकिळा पक्षाचे तोंड पाहिले की आजचा दिवस चांगला जाणार.

४) मुंगुसाचे तोंड पाहिले की आज गोड अन्न पदार्थ मिळणार.

५) चुलीमध्ये लाकडी जळण जाळत असताना जळणातून फुरफूर आवाज निघाला की पाहुणा कोण तरी येणार.

६) उचकी लागली की जवळच्या नातेवाईकाने आठवण काढली असणार.



७) ग्रामीण समाजात अमूक जातीच्या व्यक्तीचे तोंड पाहिले की काम होणार आणि तमूक जातीच्या व्यक्तीचे तोंड पाहिले की दैनंदिन काम होणार नाही.

८) कुत्र्याने रडण्याचा आवाज काढला की कोण तरी आज देवाघरी जाणार. जन्म आणि मृत्यू हे घडत राहणार, ही न टळणारी गोष्ट आहे तरी वाईटच विचार मानवाच्या डोक्यातून येतात.

९) सरपटणाऱ्या प्राण्याबद्दल मानवाच्या मनात भीती असते. मानव सरपटणाऱ्या प्राण्याला भीत असतो तर सरपटणारा प्राणी मानवाला भीत असतो. एक तर हिंस्त्र सरपटणारा प्राणी म्हणजे नाग - नागाला पाच फुटाचे पुढचे दिसत नाही. तसेच नागाला ऐकू येत नाही. मात्र नागाला धरणीकंप समजतो त्यावरून त्याच्या हालचाली दिसून येतात. जेव्हा त्या

प्राण्याला तुमचा स्पर्श होईल तेव्हा तो स्वतःच्या बचावासाठी फणा काढेल. कोणताही सरपटणारा प्राणी डुख धरत नाही. तो प्राणी स्थिर राहत नाही. अन्नसंकलनासाठी तो सतत भटकत असतो.

१०) मांजर रस्त्यावरून आडवे गेले की अशुभ घडणार. मांजर डावीकडून आडवे गेले की उजवीकडून आडवे गेले की त्यावरून शुभ-अशुभ ठरविता येते.

११) पाल चुकचुकली की ते सत्य/खरे आहे.

१२) भारद्वाज पक्षाचे दर्शन झाले की आज शुभ घडणार.

१३) अवकाशामध्ये असंख्य ग्रह-तारे आहेत. अवकाशातून ग्रहतारा निखळला/तुटून पृथ्वीतलावर आला तर देशामध्ये काही तरी अशुभ घडणार.

१४) कुत्रे जर गवताच्या-कडब्याच्या गंजीवर चढले की आणि आवज/ओरडले की भुकंप होणार.

१५) डुकरे-उंदीर समुद्राच्या विरूध्द दिशेने आले की सुनामी येणार किंवा अशुभ घडणार.

१६) दुधाला आपण अमृत म्हणतो. दूध किटलीवाला मानवाला आडवा रस्त्यामध्ये आला तर दिवस चांगला जाणार.

१७) तळहातास खाज आल्यास आपणाला पैसे मिळणार.

१८) डावी पापणी फडफडली की वाईट होणार आणि उजवी पापणी फडफडली की जीवनामध्ये चांगले घडणार.

१९) घुबडाचे तोंड पाहिले की वाईट घडते. मुळातच पक्षांची संख्या कमी झालेली आहे. घुबड दुर्मिळ होत आहे.

२०) टिटवी रात्री-दिवसा ओरडते. कारण त्या टिटवीची अंडी मानव प्राणी किंवा मानवेतर प्राणी नष्ट करेल या भीतीने टिवी ओरडत असते. परंतु टिटवी ओरडण्याचा मानवाने अशुभ अर्थ घेतला आहे.

आपले असणारे समज, गैरसमज, शुभ-अशुभ घटनेविषयी असणारी माहिती आपणाला विविध वर्तमानपेपर, मासिके, रेडीओ, टी.व्ही. असणारे चॅनेल्स डिस्कवरी, नॅशनल जिओग्राफी, ॲनिमल प्लँटस या माध्यमातून प्रचंड माहिती मिळते व आपले असणारे अज्ञान दूर होते. विज्ञानाच्या कसोटीला मानव उतरू शकतो.

❖ ❖ ❖ ❖

## डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे सुविचार



- जो मनुष्य मरायला तयार होतो, तो कधीच मरत नाही आणि जो मरायला भितो तो अगोदरच मेलेला असतो.
- हक्क मागून मिळत नसतात, आपल्याला ते झगडून घ्यावे लागतात.
- माणसाने खावे जगण्यासाठी, पण जगावे समाजासाठी.
- माणसाला आपल्या दारिद्र्याची लाज वाटता कामा नये. लाज वाटायला पाहिजे ती दुर्गुणांची.
- शिका ! संघटीत व्हा ! संघर्ष करा !!
- शील, करुणा, विद्या, मैत्री आणि प्रज्ञा या पंचतत्त्वानुसार प्रत्येक विद्यार्थ्याने आपले चरित्र बनविले पाहिजे.
- दुसऱ्याच्या सुख-दुःखात भागीदार व्हावयास शिकणे हेच खरे शिक्षण आहे.
- जे खरे आहे तेच बोलावे.
- सेवा जवळून, आदर दुरून आणि ज्ञान आतून असावे.
- मोठ्या गोष्टींचे वेत करण्यापेक्षा छोट्या गोष्टीने आरंभ करणे अधिक श्रेयस्कर
- काम लवकर करायचे असेल तर मुहूर्त पाहण्यात वेळ घालवू नका.

संकलन : कु.मेघा रमेश दाभाडे, बी.ए.भाग-१





वैचारिक

# उज्ज्वल भवितव्य घडवायचं असेल तर, विचार बदला..

कु.वर्षा दत्तात्रय वाल्हेकर, बी.ए.भाग-२

आजच्या २१ व्या शतकात प्रत्येकालाच आपल्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगिण विकास व्हावा वाटतं. एखाद्या व्यक्तिला पाहता क्षणी तिच्या व्यक्तिमत्वाच्या प्रेमात पडणाऱ्या अनेक व्यक्ति असतात. उदा.किरण बेदी, ज्योतिप्रिया सिंग, रतन टाटा, धिरुभाई अंबानी, अमिताभ बच्चन, माधुरी दिक्षीत अशी अनेक नावे घेता येतील. विविध क्षेत्रात सर्वोच्च स्थानावर असलेल्या व्यक्तिलाच व्यक्तिमत्व असतं का ? असे नाही व्यक्तिमत्व सर्वांनाच लाभलेल असत. फक्त व्यक्तिमत्व सुंदर बनविण्याचं काम आपण स्वतः करायचं असतं.

व्यक्तिमत्व मानसशास्त्राच अभ्यास करता असे दिसते की, व्यक्तिमत्व म्हणजे केवळ बाह्य सौंदर्य नाही. 'नार्मन मन' या शास्त्रज्ञाने १९७२ मध्ये सांगितले की, "व्यक्तिमत्व म्हणजे शरीररचना, वर्तनविशेष, अभिरुची, अभिवृत्ती, क्षमता, योग्यता यांचे गतिशिल संघटन म्हणजे व्यक्तिमत्व होय.''

डॉ.सिग्मंड फ्रॉईड व्यक्तिमत्व मानसशास्त्राचा जनक आहे. फ्रॉईड हा डॉक्टर असल्यामुळे अनेक व्यक्ति त्यांच्याकडे उपचारासाठी येत असत. फ्रॉईड नेहमी व्यक्तिच्या शारीरिक समस्यांपेक्षा मानसिक समस्या जाणून घेत. व्यक्तिच्या आंतरिक मानसिक संघर्षातून सर्व समस्या निर्माण होतात. हे त्यांना जाणवले आणि याचा अभ्यास करुनच फ्रॉईडनी जगप्रसिध्द अशा मनोविश्लेषणवादी सिध्दांत मांडला.

व्यक्तिच्या व्यक्तिमत्वाचा विकास होण्यासाठी त्याची रचना योग्य झाली पाहिजे. फ्रॉईडच्या मते, व्यक्तिमत्वाची रचना इदम्, अहम् आणि परम्अहम् पासून बनते. व्यक्तिचा अहम् जितका वास्तववादी तत्वानुसार जगतो तितके तिचे व्यक्तिमत्व चांगले



> विचार ही एक विलक्षण शक्ती आहे. कारण सर्व समस्यांचे मूळ तुमच्या विचारात असते, तसेच सर्व आनंदाचा जन्मही विचारातूनच होतो. आजच्या स्पर्धेच्या युगात आनंद शोधायची गरज वाटत आहे. त्यामुळे व्यक्ति आनंदाच्या शोधात मानसिक समाधान गमावत आहे. प्रत्येक परिस्थितीत शांत राहून विचार केला तर व्यक्ति आपल्या व्यक्तिमत्वाच्या अनेक पैलूंचा विकास करते.

बनायला मदत होते. व्यक्तिमत्व हे गतिशील आहे. म्हणजेच त्यात सतत बदल होत असतो. तो बदल योग्य तऱ्हेने घडवून आणला तर व्यक्तिमत्व विकास चांगला होतो. कारण बदल करण्यासाठी मानसिक तयारी महत्वाची असते. ही मानसिक तयारी व्यक्तिच्या विचारांवर अवलंबून असते, म्हणूनच

....'जसा तुम्ही विचार कराल तसा अनुभव घ्याल'

विचार ही एक विलक्षण शक्ती आहे. कारण सर्व समस्यांचे मूळ तुमच्या विचारात असते, तसेच सर्व आनंदाचा जन्मही विचारातूनच होतो. आजच्या स्पर्धेच्या युगात आनंद शोधायची गरज वाटत आहे. त्यामुळे व्यक्ति आनंदाच्या शोधात मानसिक समाधान गमावत आहे. प्रत्येक परिस्थितीत शांत राहून विचार केला तर व्यक्ति आपल्या व्यक्तिमत्वाच्या अनेक पैलूंचा विकास करते.

व्यक्तिमत्वाच्या प्रत्येक अंगाचा विकास होण्यासाठी काही मार्ग स्वीकारा जसे की, जितक्या

व्यक्ति तितक्या प्रवृत्ती पहावयास मिळतात. त्यामुळे प्रत्येक व्यक्तिचे जीवनाचे काही तत्वज्ञान असते. ज्याच्याआधारे तिचं व्यक्तिमत्व ओळखलं जातं. उदा.सिंधुताई सपकाळ ज्यांनी स्वतःचा संसार विस्कटला तरी न डगमगता समाजसेवेचं विश्व निर्माण केले म्हणूनच

'कोणत्याही समायोजनाची गुरुकिल्ली म्हणजे लवचिक व्यक्तिमत्व होय.'

व्यक्तिमत्वाचा विकास करण्यासाठी नेहमी सकारात्मक आणि आशावादी रहा, स्वतःचे गुण-दोष जाणून घ्या, स्वतःवर नियंत्रण ठेवायला शिका, चांगल्या अपेक्षा ठेवा, टीका करु नका, दुसऱ्याच्या विचारांचा आदर करा म्हणूनच म्हणता येईल.

"विचार बदलले की, सवयी बदलतात,
सवयी बदलल्या की, स्वभाव बदलतो,
स्वभाव बदलला की, व्यक्तिमत्व बदलतं,
व्यक्तिमत्व बदललं की, भवितव्य बदलतं."

मग बदला तर तुमचं व्यक्तिमत्व जे बदलण्याचे पूर्ण स्वातंत्र्य तुमच्याच हातात आहे कारण तुम्हीच आहात तुमच्या भवितव्याचे निर्माते.

❖ ❖ ❖ ❖



## लोकमान्य टिळकांचे सुविचार

- जुलुम सहन करणे म्हणजे सोशिकपणा नव्हे तो परमार्थही नव्हे. ती फक्त पशुवृत्ती होय.
- गांधीजी उद्याचे महापुरुष
- परमेश्वर अस्पृश्यता मानीत असेल तर मी परमेश्वरालाच मानणार नाही.
- आयुष्य हा कोरा चेक आहे. त्यावर वाटेल तेवढी सुखाची रक्कम लिहिणे मनुष्याच्या मनावर अवलंबून आहे. मात्र ती आशेच्या शाईने लिहून हास्याच्या टीपकागदाने टिपली पाहिजे.

संकलन :
कु.शैलजा थोरात
बी.ए.भाग-२

## 'वपुर्झा' - व.पु.काळे

- मिठामुळे पदार्थाला चव येत असली तरी मीठ चवदार नसतं. काही माणसे एकटी असतात अन् एकटी असतात तेव्हा बरणीतल्या मिठासारखी खारट असतात. पण ती जेव्हा दुसऱ्यांच्या जीवनात मिसळतात तेंव्हा त्यांच्या जीवनाची गोडी वाढवतात व आपल्या जीवनाला सार्थकता प्राप्त करुन घेतात.

## शायरी

ख्वाब बदलेंगे हकीकत में
तू जरा कोशिश तो कर ॥
आंधियाँ सदा चलती नहीं,
मुश्किले सदा रहती नहीं ।
मिलेगी तुझे मंजिल तेरी,
बस तू जरा कोशिश तो कर ॥
राह संघर्ष की जो चलता है,
वो ही संसार को बदलता है ।
जिसने रातों से जंग जीती है,
सूर्य बनकर वही निकलता है ॥

संकलन : कु.अमृता अशोक पाटील
बी.ए.भाग-१





माहितीपर

# माहिती तंत्रज्ञान

कु.दामिनी सुभाष गावडे, बी.ए.भाग-१

वेळ बदलते आयुष्य पुढे सरकल्यावर आयुष्य बदलते. शिक्षण झाल्यावर पण जग/लोक बदलतात. नवनवीन शोध लागल्यावर....

एकविसावे शतक हे माहितीयुग घेऊन अवतरले आहे. संगणक आणि इंटरनेट या दोन माध्यमांनी मानवी जीवनाशी संबंधित असलेल्या सर्वच क्षेत्राच्या कक्षा विस्तारल्या आहेत. त्यामुळे मानवी जीवन पध्दतीमध्ये आमूलाग्र बदल होत आहेत. अशा युगात स्वतःचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी माहिती, तंत्रज्ञानाचा अभ्यास आवश्यक झाला आहे.

*एकंदरीत जीवनात यशस्वी होण्यासाठी अचूक निर्णयासाठी विविधांगी स्वरुपाची माहिती लागत असते. 'माहिती तंत्रज्ञान' या संकल्पनेत दोन शब्द आहेत. ते म्हणजे : १) माहिती २) तंत्रज्ञान*

एकंदरीत जीवनात यशस्वी होण्यासाठी अचूक निर्णयासाठी विविधांगी स्वरुपाची माहिती लागत असते. 'माहिती तंत्रज्ञान' या संकल्पनेत दोन शब्द आहेत. ते म्हणजे : १) माहिती २) तंत्रज्ञान

**१) माहिती (Information) :-**

माहिती म्हणजे ज्ञानाचे संदेशवहन आणि अभ्यास अनुभव किंवा सुचनेद्वारे मिळालेले ज्ञान होय.

**२) तंत्रज्ञान (Technology) :-**

उपयोजित विज्ञानाचा शास्त्रीय अभ्यास व व्यापार उद्योगाच्या प्रात्यक्षिक कार्यामध्ये केलेले उपयोजन म्हणजे तंत्रज्ञान होय.

शब्दसंख्या चित्र, प्रतिके व इतर स्वरुपातील माहिती साठविणे, माहितीचे विश्लेषण करणे इत्यादीसाठी वापरल्या जाणाऱ्या तंत्रज्ञानाला माहिती तंत्रज्ञान म्हणतात.



माहिती तंत्रज्ञानात संगणक व त्यांचे नेटवर्क याचा समावेश होतो. हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर हे माहितीचा उत्पादक पध्दतीने उपयोग करण्यासाठी पध्दतीत क्षमता निर्माण करतात. माहिती तंत्रज्ञान हे संदेशवहन, साठवण, प्रक्रिया आणि माहितीचा दैनंदिन जीवनात उपयोग यांच्याशी निगडीत असते.

**माहिती तंत्रज्ञानाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे :-**

१) माहिती तंत्रज्ञान ही कच्च्या डेटावर प्रक्रिया करुन डेटाला उपयुक्त माहिती बनवू शकते.

२) माहिती तंत्रज्ञान प्रक्रिया केलेल्या माहितीचे रीसायकलिंग करुन दुसऱ्या प्रक्रियेसाठी योग्य बनवते. बऱ्याचवेळेस एका प्रक्रियेची माहिती ही दुसऱ्या प्रक्रियेची डेटा बनत असते.

३) माहिती तंत्रज्ञान माहिती समजण्यास सोपे, जास्त, आकर्षक आणि जास्त उपयुक्त स्वरुपाचे एखादे नवीन पॅकेज बनवू शकते.

४) माहिती तंत्रज्ञानात जलदगतीने प्रक्रिया करता येते. अधिक अचूकता असते. प्रक्रिया करण्यासाठी खूप कमी वेळ लागतो. महत्त्वाची माहिती सुरक्षित व गोपनीय ठेवतां येते. खर्च अतिशय कमी असतो. माहिती अधिक पारदर्शकरित्या उपलब्ध होते व बहुविध साधनांचा वापर सहज करता येतो.

**माहिती तंत्रज्ञानाचे घटक : (Components)**

माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग आणि अंमलबजावणीसाठी डेटा, हार्डवेअर सॉफ्टवेअर, युजर, संग्रहण, संदेशवहन या घटकांचा समावेश होतो.

**१) डेटा (Data) :**

संगणकाला प्रक्रियेसाठी संग्रहित केलेली कच्च्या स्वरुपातील माहिती म्हणजे डेटा होय. असा डेटा नंतरच्या काळात निर्णय घेण्याच्या कामात मदत करतो.

**२) हार्डवेअर (Hardware) :**

दिसणारे व जाणवणारे संगणकाचे भाग म्हणजे हार्डवेअर होय. यात इनपुट व आऊटपुट डिव्हायसेस, मध्यवर्ती प्रक्रिया केंद्र (CPU) Central Processing Unit इत्यादींचा समावेश होतो. संगणकाला एक संपूर्ण यंत्र बनविण्यासाठी आवश्यक असलेले हे मूलभूत घटक असून त्याद्वारे डेटावर प्रक्रिया करणे आणि इतर कामे करुन घेता येतात.

**३) सॉफ्टवेअर (Software) :**

संगणकाला प्रक्रिया बनविण्यासाठी व त्यांच्याकडून कामे करवून घेण्यासाठी संगणकाला दिलेल्या सूचनांचा संच म्हणजे सॉफ्टवेअर होय. हा डोळ्याने न दिसणारा घटक आहे. परंतु तो डोळ्याने दिसणाऱ्या घटकांना सक्रिय बनवितो.

**४) युजर्स (Users) :**

संगणकाच्या वापरामुळे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे ज्यांचा फायदा होतो त्यांना युजर म्हणतात. हे युजर्स संगणकाच्या अंतिम उत्पादनाचा उपयोग घेणारे असतात. तसेच ते संगणकाला डेटा पुरविणारे आणि सुचना देणारे असतात.

**५) संग्रहण (Storage) :**

संगणकामध्ये डेटा साठवून ठेवण्यासाठी जागा उपलब्ध करुन देण्याचे काम या घटकाचे असते. याचे महत्त्वाचे काम म्हणजे कच्चा डेटा आणि प्रक्रिया केलेला डेटा हा नंतरच्या उपयोगासाठी साठवून ठेवण्याचे असते. या घटकाला स्मृती देखली म्हणतात.

**६) संदेशवहन (Communications) :**

युजर आणि संगणक यांच्यात विविध कामे करवून घेण्यासाठी संदेशवहन घडवून आणण्याचे काम हा घटक करतो. अशा संदेशवहनासाठी विविध संदेशवहन मार्गांचा व प्रोटोकॉल्सचा उपयोग होत असतो.

❖ ❖

## माजी राष्ट्रपती ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचे निवडक विचार

- स्वप्ने पहा, त्या दिशेने विचार करा व ती कृतीने सत्यात उतरवा.
- संकुचित ध्येय वाळगू नका. महान विचारदृष्टी समोर ठेऊन परिश्रम केले तर आपला देश निश्चितपणे एक विकसित राष्ट्र बनेल.
- यशस्वी कथा वाचू नका, त्यांनी केवळ संदेश मिळतो. अपयशाच्या कथा वाचा, त्याने यशस्वी होण्यासाठी कल्पना मिळतात.

**संकलन : कु.वर्षा सुरेश सावळे**
बी.ए.भाग-१

❖ ❖

## डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे सुविचार

- जो प्रतिकूल लोकमताला घाबरून जात नाही, दुसऱ्याचे हातचे बाहुले न होण्याइतकी बुद्धी, स्वाभिमान ज्याला आहे तोच माणूस स्वतंत्र आहे असे मी समजतो.
- शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे.
- माणूस धर्माकरीता नाही, धर्म माणसाकरीता आहे.
- जेथे एकता तेथे सुरक्षितता.
- जो तो परिश्रम व कर्तृत्व यांच्या जोरावर महत्पदाला चढतो.
- व्यक्तीपेक्षा देश मोठा असतो.
- अन्नीमधून गेल्यावाचून माणसाची शुद्धी होत नाही.
- शाळा म्हणजे नागरिक तयार करण्याचे पवित्र क्षेत्र !

**संकलन : कु.वर्षा रमेश दाभाडे**
बी.ए.भाग-१





माहितीपर

# स्वॉट विश्लेषण SWOT Analysis

**कु.दामिनी सुभाष गावडे,** बी.ए.भाग-१

एखादा नवीन उद्योग किंवा व्यवसाय सुरु करण्यासाठी उद्योजकाला विविध अवस्था किंवा टप्प्यामधून जावे लागते.

उदा.प्रकल्पाचा उद्देश निश्चित करणे, कार्याचे नियोजन करणे, स्थान, आराखडा व आकारमान निर्धारित करणे. भांडवल उभे करणे, कुशल कारागीर उपलब्ध करणे, औद्योगिक संशोधन करणे इत्यादी. एखाद्या नवीन उद्योगधंद्याची कल्पना खालील बाबीतून लक्षात येऊ शकते.

१) वापरात न येणारा कच्चा माल.
२) समाजाला किंवा ग्राहकाला न मिळणाऱ्या सेवा किंवा एखादे उत्पन्न
३) स्पर्धकास जास्त मिळणारा नफा
४) एखाद्या उत्पादनातून निर्माण होणारा व वाया जाणारा माल

या चार शब्दाच्या एकत्रितकरणाला SWOT विश्लेषण म्हणतात.

**१) SWOT :**

S - Strength - जमेची बाजू
W - Weaknesses - कमकुवत बाजू
O - Opportunities - व्यावसायिक संधी
T - Thrats - विविध अडथळे

| जमेची बाजू (Strength) / कमकुवत बाजू (Weaknesses) | व्यावसायिक संधी (Opportunities) / विविध अडथळे (Thrats) |
|---|---|
| १) कर्मचारी व्यवस्थापन संबंध | १) बाजारातील मागणी पुरवठा स्थिती |
| २) नवीन व्यवसाय मर्यादित स्पर्धा क्षमता | २) लोकांची उत्पन्न-राहणीमान पातळी |
| ३) संस्थेचा पूर्व इतिहास | ३) सरकारची विविध धोरणे, औद्योगिक परवाना, पतपुरवठा सवलती इ. |
| ४) अधिकारी वर्गाची निर्णयक्षमता व कौशल्य | ४) व्यापार-प्रक्रिय अवस्था, तेजी अथवा मंदीची परिस्थिती |
| ५) कर्मचारी, यंत्रसामग्री यांच्या पूर्ण क्षमतेचा वापर करण्यातील अडचणी | ५) विविध साधनसामग्रीचा सतत पुरवठा होण्यातील अडचणी |

मानवाला नाविन्याची आवड ही जन्मत:च असते व या नाविन्याच्या आवडींमुळे नवीने शोध व संशोधन आले आहे व होत राहणार आहे. मानवाची प्रत्येक आवड ही कोणत्यातरी गरजेशी निगडीत असते व ती गरज भागविण्याचे साधन पुरविणे किंवा उत्पन्न करणे यास व्यवसाय/उद्योग म्हणतात. या उद्योगाची किंवा व्यवसायाची निवड करणे व आजच्या व्यावसायिक स्पर्धेत ती टिकवणे यासाठी उद्योजकास वेगवेगळ्या कसोटीस उतरावे लागते.

या स्पर्धेची पहिली पायरी उद्योगधंद्याची निवड ही आहे. यासाठी उद्योजकाची आर्थिक परिस्थिती, व्यावसायिक ज्ञान, संभाव्य बाजारपेठ व मागणी बाजारपेठेतील स्पर्धा व प्रमाण, स्पर्धक, नफ्याचे प्रमाण, प्रकल्पासाठी लागणारा कच्चा माल, भौतिक सुविधा इत्यादी बाबींचा अभ्यास करुन मगच उद्योगधंद्याची निवड करता येते. उद्योजक हा आपल्या स्वत:चा किंवा त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्या गुंतवणूकदाराच्या पैसा उद्योगामध्ये गुंतवत असून ती आपल्या गुंतवणूकीवर परतफेडीची अपेक्षा करत असतो. हा पैसा तो एखादी वास्तू बनवून विक्रीसाठी वापरेल किंवा तयार वस्तू बनविण्याकडून घेऊन ग्राहकास विक्री करण्यासाठी गुंतवायचा या निर्णय तो स्वत:ची कुवत व इतर घटकांची उपलब्धता यावर ठरवित असतो.

या चार घटकाचे एकत्रित विश्लेषण केले जाते तेव्हा त्याला swot विश्लेषण म्हणतात. या swot विश्लेषणातील पहिले दोन घटक जमेची बाजू व

कमकुवत बाजू हे व्यावसायिक अंतर्गत घटक आहेत तर नंतरचे दोन घटक व्यावसायिक संधी व व्यावसायिक अडथळे हे व्यवसायातील अडथळे आहेत.

**i) S - Strength - जमेची बाजू**

या प्रेरकाचे काम करतात. उद्योजकाचे व्यावसायिक कौशल्य निपुणता आर्थिक पाठबळ यामुळेच व्यवसायाची उभारणी होते. मालक व कामगार यांच्यातील सामंजस्य व्यवसायातील प्रत्येक घटकावर सकारात्मक परिणाम करते.

उच्च तांत्रिक क्षमताधारक केलेला कर्मचारी वर्ग त्याच्यातील सुसंवाद, आधुनिक यंत्र सामग्री, उत्पादन क्षमतेचा परिपूर्ण वापर संशोधन विकास हे सर्व घटक व्यवसायाचे सामर्थ्य वाढवतात.

**ii) W - Weaknesses - कमकुवत बाजू**

व्यवसायातील कमकुवत बाजू हा व्यवसायात अडथळा आणतात. या अडथळ्याचा उद्योजकाने शोध घेतला पाहिजे. संचालक मंडळात अंतर्गत असलेले वाद निर्णयक्षमतेचा अभाव. परस्पर सहकार्याचा अभाव, कामगार वर्गातील असंतोष, अपप्रवृत्ती, स्पर्धा, कामचुकार वृत्ती, निर्णयाचा अभाव हे सर्व घटक उद्योजकाने उद्योगात कमकुवत बाजूकडे लक्ष केंद्रित करून त्या दूर करण्याच्या दृष्टीने योग्य ते प्रयत्न केले पाहिजेत.

उद्योजकाने स्वत:मधील त्रुटी व कमतरतांचे आत्मपरिक्षण करून त्या दूर करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे आवश्यक आहेत.

**iii) O - Opportunities - व्यावसायिक संधी**

व्यावसायिक संधी हा व्यवसायिक बाह्य घटक आहे. उद्योगिक क्षेत्रातील घडामोडी, बाजारपेठेत होणारे नवीन बदल, सरकारी ध्येय धोरणे, नवनवीन संशोधने यातून अनेक व्यावसायिक संधी निर्माण होऊ शकतात. त्या निर्माण होणे म्हणजे व्यवसायासाठी अनुकूल वातावरण तयार होणे होय. उद्योजकाने अशा संधीचा शोध घेऊन त्या विकसित करणे त्याचा पुरेपूर लाभ घेणे यातच उद्योजकाचे खरे कौशल्य आहे. यासाठी उद्योजकाला शोधकवृत्ती काम करावे लागते.

उदा.आबासाहेब त्याच्या काळात भविष्यात प्लास्टिक वस्तूचे वाढते महत्त्व लक्षात घेऊन या क्षेत्रात मोठी संधी निर्माण होऊ शकते असे लक्षात येताच प्लास्टिकच्या वस्तू तयार करणारा कारखाना तयार केला.

परदेशातील एखाद्या कंपनीबरोबर नवीन प्रकल्पाची संधी निर्माण होऊ शकते असे लक्षात येताच उद्योजकाने त्या दृष्टीने पावले उचलली पाहिजेत. शासनाकडून लघू उद्योगाकडून सवलती दिल्या जातात व सहाय्य दिले जाते. यातून एखादी नवीन संधी उपलब्ध होऊ शकते. थोडक्यात संधीचा शोध घेणे त्या आमलात आणणे त्यासाठी उद्योजकाने सभोवतालच्या घडामोडीवर चौफेर लक्ष ठेवले पाहिजे.

**iv) T - Threats - विविध अडथळे**

उत्पादनासाठी आवश्यक असणाऱ्या साधन सामग्रीच्या पुरवठ्यात पुरेशा सुविधा अभावी उद्योगात अनियमितता येणे २) विविध कारणामुळे व्यवसायातील भांडवल गुंतून पडले व त्यामुळे भांडवलाची कमतरता भासणे. ३) औद्योगिक क्षेत्रात अशांततेचे वातावरण निर्माण होणे. ४) शासनाची जाचक धोरणे व निर्बंध. ५) बाजारपेठेतील तेजी मंदीची स्थिती.

वरील अनेक प्रकारच्या अडथळ्यावर नियंत्रण आणण्याच्या दृष्टीने उद्योजकाने प्रयत्नशील असावे यासाठी तज्ञांची मदत विचार विनिमय सल्ला सवलत होता येईल. उद्योगातील अडथळ्यामुळे खचून न जाता धैर्याने तोंड देण्याचे सामर्थ्य उद्योजकाने आत्मसात केले पाहिजे अशाप्रकारे SWOT विश्लेषणाचा ४ ही घटकाचा अभ्यास केल्यास असे दिसून येते की SWOT विश्लेषण म्हणजे उद्योग उभारणीच्या प्रक्रियेतील एक महत्त्वाचा घटक आहे.

**२) समविच्छेदन विंदू :**

स्पर्धात्मक परिस्थितीतून आपला उद्योग टिकून राहावा कमीत कमी खर्चानं नफा प्राप्त व्हावा या उद्देशाने प्रत्येक उत्पादक प्रयत्न करित असतो. यासाठी खर्चावर नियंत्रण ठेवणे, विक्री जास्त राहिल असे प्रयत्न करणे, लाभांश वाढवणे इ. अनेक बाबतीत उत्पादकाला निर्णय घ्यावे लागतात हे निर्णय घेताना समविच्छेदन बिंदू हे तंत्र उपयुक्त ठरते. समविच्छेदन बिंदू हे तंत्र ना नफा ना तोटा या तत्त्वावर आधारित आहे.

❖ ❖ ❖ ❖





वैचारिक

# मतदार राजा जागा हो !

कु.मिथिला राजेंद्र भोसले, बी.ए.भाग-२

''मेरे देश की धरती उगले सोना हिरे मोती
मेरे देश की धरती....''

> मतदान करताना उमेदवार निवडताना जो ओळखीचा असेल त्याला मत देतो परंतु जो कर्तृत्ववान असेल त्याच्याकडे लक्षही देत नाही. आता आपण स्वप्न पाहतो की, हा आपल्या ओळखीचा आहे करेल आपल्याला मदत. योग्य नेता दिलात तर देशाचा विकास पूर्णत्वाकडे जाण्यास मदत होईल. कुठेतरी भ्रष्टाचार व असे कुरघोडी राजकारण नष्ट व्हायला मदत होईल. मतदार राजा जागा हो !

अशा सुजलाम सुफलाम अशी परंपरा असलेल्या भारत देशाचे आपण रहिवासी. या भारत देशाची मी रहिवासी आहे. याचा मला सार्थ अभिमान वाटतो पण....एक मोठे प्रश्नचिन्ह माझ्या मनात उभे राहते ते म्हणजे आज वर्तमानपत्र टी.व्ही.च्या बातम्या असोत सर्वत्रच राजकारणाची ती चर्चा पक्षांनी एकमेकांवर केलेले आरोप त्यावर रंगणारे ते वाद आणि निमूटपणे तोंडाला कुलूप लावून नुसते पाहत राहणारी ती जनता म्हणजे या जनतेतील मतदार.

अहो ''राजकारण'' ही मोठी कीड आपल्या देशाला लागली आहे आणि ही कीड आपल्यासारख्या जनतेला जणू गिळंकृत करू पाहत आहे म्हणून आज प्रत्येकाने म्हणजेच प्रत्येक मतदाराने जागे व्हायची वेळ आली आहे. जागे याचा अर्थ आपली सद्सदविवेक बुध्दी जागी ठेवून आणि प्रामाणिकपणाने मतदान केले पाहिजे. आज मतदार राजा जागा हो अशी सांगण्याची वेळ आली आहे.

भारताच्या संविधानाने लोकशाहीचा स्वीकार केला आहे. ग्रामपंचायतीपासून पंचायत समिती आणि नगरपालिकेपासून महानगरपालिकेपर्यंत तसेच विधानसभेपासून विधानपरिषदेपर्यंत म्हणजेच गल्लीपासून दिल्लीपर्यंत, राजकारण हे चालूच आहे. आजचा हा मतदार पैशाचा लाचार होऊन स्वत:च मौल्यवान मत विकत आहे. पण त्याचे हे मत कितीकाही बदलू शकते हे त्याला माहित नाही. हा मतदार पैसे देणाऱ्याला मते देतो. तो उमेदवार निवडून आल्यावर या मतदारांना विसरतो आणि मग काय एखादे विकासाचे काम करायचे म्हणजे आला भ्रष्टाचार. मग हा भ्रष्टाचार येतो तरी कोठून ? आणि कोणामुळे ? हा मतदार पैसा घेतो आणि चुकीच्या माणसाला मत देतो. म्हणून आता अशी वेळ आली की,



''मतदार राजा तुझ्या मताचा मोल न्यारा,
राजकारणात देऊ नको तू भ्रष्टाचाराला थारा.''

सर्वच मतदार आंधळेपणाने किंवा पैशांना लाचार होऊन मतदान करतात असे नाही; पण आंधळेपणाने मतदान करणाऱ्या मतदारांची संख्या जास्त आहे. त्यामुळे मी हे करीन, मी ते करीन अशी आश्वासने नेता निवडून येईपर्यंतच देतो आणि एकदा निवडून आल्यानंतर पाच वर्ष पुन्हा मतदारांची आठवण न होणारा नेता काय कामाचा ? आम्ही असा विकास करु; तसा विकास करू असे सांगणारा नेता आमच्या मतदाराची बोटे त्याच्याच डोळ्यात

घालत आहे. विकासकामांचा आराखडा कागदावर दाखवण्यापुरताच असतो. प्रत्यक्षात तो कधीच पूर्ण होत नाही. एखादे काम जर प्रत्यक्षात उतरवायचे म्हटले की त्यात भ्रष्टाचार आलाच. कित्येक ठिकाणी भ्रष्ट नेते, भ्रष्ट अधिकारी, भ्रष्ट कर्मचारी असतात. हे कशामुळे तर पैशाला लाचार होऊन आंधळेपणाने केलेल्या मतदानामुळे. योग्य नेता नाही, योग्य काम नाही आणि सर्वत्र फक्त वरवर दाखवलेला गोंडस नजारा ज्यामध्ये सामान्य माणूस भरडला जातोय. यासाठी चार पैशाच्या हव्यासापोटी मतदान न करता आपल्या उज्वल भविष्यासाठी लोकशाहीचा धागा हातात घेऊन मतदार राजाने जागे झाले पाहिजे,

"जो दाखविल विकासाचे दर्पण
कर मत त्यालाच अर्पण
आज पैशासाठी पुढे हाथ
उद्या विकासाला बसेल लाथ
मतदान तुझा अधिकार
असा कर तू निर्धार
मतदार राजा जागा हो
लोकशाहीचा धागा हो"

आजचा नेता मतदान करताना उमेदवार निवडताना जो ओळखीचा असेल त्याला मत देतो परंतु जो कर्तृत्ववान असेल त्याच्याकडे लक्षही देत नाही. हे चुकीचे आहे. आता आपण स्वप्न पाहतो की, हा आपल्या ओळखीचा आहे करेल आपल्याला मदत. परंतु एकदा तो नेता निवडून आल्यावर मतदाराला विसरतो म्हणून आता असे सांगण्याची वेळ आली आहे की,

आयुष्याची स्वप्ने पाहताना
वास्तवाला कधी विसरायचं नसतं
गुलाबाला स्पर्श करताना
काट्याचं भान मात्र विसरायचं नसतं
मतदाराची भूमिका बजावताना
ओळख नाही तर कर्तृत्व पहायचं असतं.

योग्य नेता दिलात तर देशाचा विकास पूर्णत्वाकडे जाण्यास मदत होईल. कुठेतरी भ्रष्टाचार व असे कुरघोडी राजकारण नष्ट व्हायला मदत होईल.

मतदार राजा जागा हो !

❖ ❖ ❖ ❖



## लोकमान्य टिळकांचे सुविचार

- स्वातंत्र्य म्हणजे विष, स्वराज्य म्हणजे दूध.
- तुम्ही आपल्या कर्माचा पडदा काचेसारखा स्वच्छ कराल, तर त्यातून तुम्हाला परमेश्वर दिसेल. गोणपाटासारखा कराल, तर त्यातून परमेश्वर दिसणार कसा ?
- एक वेळ राज्य कमावणे सोपे असते, पण राज्य राखणे कठीण आहे.
- पुढे जाणाऱ्याला मागे खेचू नका.
- समोर अंधार असला तरी त्यापलीकडे उजेड आहे हे लक्षात ठेवा.
- स्वाश्रय आणि संयम ही चारित्र्याची दोन फुप्पुसे आहेत.
- स्वर्गापेक्षा चांगल्या पुस्तकांचे मी अधिक स्वागत करीन. कारण पुस्तके जेथे असतील तेथे स्वर्ग निर्माण होतो.
- जेथे बुद्धीचे क्षेत्र संपते तेथे श्रद्धेचे क्षेत्र सुरु होते.
- माणसाने माणसाला भ्यावे ही शरमेची गोष्ट आहे.
- मनुष्य स्वभावत: कितीही चांगला असला तरी शिक्षणाने त्याच्या बुद्धीचा विकास झाल्याशिवाय देशाची उन्नत होत नाही.

संकलन : कु.शैलजा थोरात
बी.ए.भाग-२



# अहवाल विभाग

"संपत्ती गेली तरी फारसे नुकसान होत नाही,
आरोग्य गमावले तर थोडेफार नुकसान होते,
पण जर चारित्र्य गमावले तर सर्वस्व गमावले जाते.
यश प्राप्त करण्यासाठी ध्येय निश्चित करणे आवश्यक आहे;
आणि तेही जेवढे लवकर करता येईल तेवढे बरे,
गंतव्यस्थान ठरविल्याशिवाय प्रवास सुरू करणारच कसा ?
स्थान ठरविल्याविना एक पाऊलही तुम्ही पुढे टाकू शकत नाही,
जीवनामध्ये काय प्राप्त करून घ्यायचे आहे हे नि:संदिग्धपणे
निश्चित केले पाहिजे. ध्येय निश्चित केल्यानंतर ते प्राप्त
करण्यासाठी प्राण ओतुन प्रयत्न केला पाहिजे.
आत्मविश्वास पूर्वक ध्येयप्राप्तीच्या दिशेने अग्रेसर व्हायला
पाहिजे तरच यश मिळू शकते."

**स्वामी श्रीकांतानंद**
अध्यक्ष, रामकृष्ण मठ, पुणे
युगांतर....... नव्या युगाचा प्रवासी
(नवराष्ट्र युवा चेतना,समाजिक विकास संस्था, कराड)
कै.यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दी निमित्त
स्मरणिकेतून सौजन्यपूर्वक :
पूर्वल रवींद्र पाटील, सचिव, नवराष्ट्र युवा चेतना, कराड




▪ विभागीय संपादक:
**प्रा.बद्रीनाथ ढाकणे**

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| वैयक्तिक अहवाल २०१५-२०१६ | ८५ |
| विभागीय समिती अहवाल सन २०१५-२०१६ | ९१ |
| बिल्डींग कमिटी | ९१ |
| ॲकॅडेमिक कॅलेंडर व टाईम टेबल, रोल कॉल कमिटी | ९१ |
| U.G.C. Committee | ९१ |
| IQAC Committee | ९२ |
| Placement Cell Committee | ९२ |
| RQMS Committee | ९२ |
| स्पर्धा परीक्षा व करिअर मार्गदर्शन | ९२ |
| स्टाफ ॲकेडमी कमिटी | ९३ |
| अग्रणी कमिटी | ९३ |
| सांस्कृतिक विभाग | ९४ |
| शॉर्ट टर्म कोर्सेस समिती | ९४ |
| परीक्षा विभाग समिती | ९५ |
| स्टाफ वेलफेअर समिती | ९५ |
| नियतकालिक समिती | ९५ |
| वाड्मय मंडळ | ९६ |
| राष्ट्रीय सेवा योजना | ९६ |
| रॅगिंग प्रतिबंध समिती | ९७ |
| शिस्त समिती | ९७ |
| जिमखाना विभाग | ९७ |
| रिसर्च पब्लिकेशन कमिटी | ९८ |
| स्टुडंट वेलफेअर - हेल्थ सेंटर कमिटी | ९८ |
| ग्रंथालय विभाग | ९८ |
| कमवा आणि शिका योजना | ९९ |
| सहल विभाग | ९९ |
| फौंडेशन कोर्स इन ह्युमन राईट एज्युकेशन | ९९ |
| आम्ही सहकारी.... | १०० |




# वैयक्तिक अहवाल २०१५-२०१६

**प्रा. सुहास निर्मळे, मराठी विभाग प्रमुख-सहयोगी प्राध्यापक**



१) आंतरराष्ट्रीय परिषद : रा.छ.शाहू कॉलेज, कोल्हापूर.

२) राष्ट्रीय चर्चासत्र : रा.छ. शाहू कॉलेज, कोल्हापूर

३) राष्ट्रीय चर्चासत्र : छ. शिवाजी कॉलेज, सातारा

४) मराठी व हिंदी भाषा : राष्ट्रीय परिषद-कला व वाणिज्य महाविद्यालय, सातारा.
शोधनिबंध वाचन व प्रकाशन-विषय-उच्चभ्रुंची दलित आत्मकथने
ISBN शोधप्रबंधिकेमधून शोध निबंध प्रकाशित.

५) आंतरराष्ट्रीय (सामाजिक शास्त्र, भाषा, वाणिज्य) आंतरविद्याशाखीय परिषद-श्रीमती चंद्राबाई शांताप्पा शेंडुरे महाविद्यालय, हुपरी.

६) राष्ट्रीय चर्चासत्र व शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ आयोजित अधिवेशन
   १. शोधनिबंध वाचन - विषय - दलित साहित्य - नववाड्मयीन साहित्य प्रवाहाची प्रेरणा व प्रवृत्ती
   २. कविसंमेलनामध्ये कविता वाचन.

७) प्राध्यापक प्रबोधिनी-व्याख्यान - विषय - सरस्वतीच्या देव्हाऱ्यातील समई : शांता शेळके.

८) विभागीय संपादक त्रिवेणी - मराठी विभाग

**प्रा.डॉ. मच्छिंद्र सकटे, समाजशास्त्र विभाप्रमुख सहयोगी प्राध्यापक**



१) थम्मासात्त विद्यापीठ, बँकॉक (थायलंड) येथे झालेल्या IUAES यांच्या वतीने घेण्यात आलेल्या 'आंतरराष्ट्रीय परिषदेत' 'Contribution of Marathi Scholars in Global Anthropology' या शोधनिबंधाचे वाचन दि. १५-१७ जुलै २०१५.

२) कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, नवी मुंबई आणि UGC नवी दिल्ली पुरस्कृत 'मानवी हक्क' विषयावरील National Conferece मध्ये 'Child Labour and Human Rights' या शोधनिबंधाचे वाचन. दि. ५ व ६ डिसेंबर २०१६

३) कलिंगा इन्स्टीट्यूट ऑफ सोशल सायन्सेस, KIIT University, Bhubaneshwar, Odissa आणि Indian Sociological Society यांनी आयोजित केलेल्या 41st All India Sociological Conference मध्ये "A Socio-Anthropological Study of Pardhi Tribe in Karad Taluka, Maharashtra." शोधनिबंधाचे वाचन, दि. २७-२९ डिसेंबर, २०१५.

४) कलिंगा इन्स्ट्युट ऑफ सोशल सायन्सेस, भुवनेश्वर, ओरिसा येथे झालेल्या समाजशास्त्र विषयाच्या राष्ट्रीय परिषदेत 'Accidents in Industrial Sector : A Case Study of Karad MIDC, Maharashtra' शोधनिबंधाचे वाचन. दि. २७-२९ डिसेंबर २०१५.

५) दि न्यू कॉलेज, कोल्हापूर येथे झालेल्या ICSSR पुरस्कृत राष्ट्रीय परिसंवादामध्ये "Critical Analysis on Policies for Marginal Communities" या सत्राचे अध्यक्ष म्हणून सहभाग, दि. २१-२२ जानेवारी, २०१६.

६) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आणि UGC-SAP पुरस्कृत दोन दिवसीय राष्ट्रीय परिसंवादामध्ये "A Sustanable Agriculture in Hivtad Village in Sangli District" शोधनिबंध वाचन दि. २९-३० जानेवारी २०१६.

७) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आणि UGC-SAP पुरस्कृत राष्ट्रीय परिसंवादामध्ये "Environmental and Socio-Economical impact of sand extraction in Satara District." या शोधनिबंधाचे वाचन, दि. २९-३० जानेवारी २०१६.

8) "Socio-Environmental Threats to Northern-Western Ghats : A Case Study of Ratnagiri and Sindhudurga District," Article published in 'Golden Research Thoughts,' International Recognition Multidiciplinary Research Journal ISSN : 2231-5063, Volume 5, Issue-7, Jan. 2016.

९) मराठी समाजशास्त्र परिषद, महाराष्ट्र आणि महीला महाविद्यालय विलेपार्ले, मुंबई येथे झालेल्या राष्ट्रीय अधिवेशनामध्ये "Contribution of Dr. Babasaheb Ambedkar in Education" या शोधनिबंधाचे वाचन, दि. २५-२६ मार्च २०१६.



**प्रा.डॉ. अभय पाटील,** इतिहास विभागप्रमुख-सहयोगी प्राध्यापक

१) पी.डी. पाटील साहेब जयंती - प्रमुख वक्ते वेणूताई कॉलेज, कराड. जून २०१५.
२) दूरशिक्षण विभाग : शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर - स्वयंअध्ययन सत्र कामकाज. जुलै २०१५.
३) एम.पी.एस.सी. कार्यशाळा : डी.जी.कॉलेज, सातारा. जुलै २०१५.
४) नवीन अभ्यासक्रम : बी.ए. भाग ३ कार्यशाळा : आर्टस अँन्ड कॉमर्स कॉलेज, नागठाणे. जुलै २०१५.
५) नवीन अभ्यासक्रम : बी.ए. भाग ३ : 'स्वातंत्र्यानंतरचा भारत' प्रकरण ४, सहलेखन कामकाज. १९ ऑगस्ट २०१५.
६) बी.ए. भाग २ व ३ पेपर सेटिंग (आय.डी.एस. व इतिहास लेखन परिचय) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. २० ऑगस्ट २०१५.
७) नवीन अभ्यासक्रम बी.ए. भाग ३ कार्यशाळा /तज्ञमार्गदर्शक : शाहू कॉलेज, कोल्हापूर. २८ ऑगस्ट २०१५.
८) नवीन अभ्यासक्रम बी.ए. भाग ३ कार्यशाळा / तज्ञमार्गदर्शक : (इतिहास लेखन परिचय) शहाजी कॉलेज, कोल्हापूर. ९ सप्टेंबर २०१५.
९) नवीन अभ्यासक्रम बी.ए.भाग ३ (स्वातंत्र्यानंतरचा भारत) कार्यशाळा / तज्ञ मार्गदर्शक, शाहू कॉलेज, कोल्हापूर. १२ ऑक्टोबर २०१५.
१०) आंतरराष्ट्रीय परिषद : चंद्राबाई शेंडूरे कॉलेज, हुपरी. पेपर वाचन.
११) आंतरराष्ट्रीय परिषद : चंद्राबाई शांताप्पा शेंडूरे कॉलेज,हुपरी. पेपर वाचन सत्राध्यक्ष-सामाजिकशास्त्रे विभाग. दि.४ व ५ डिसें. २०१५.
१२) बी.ए.भाग २ व ३ पेपर सेटिंग (आय.डी.एस.व इतिहास लेखन परिचय) चेअरमन. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. २८ व २९ जानेवारी २०१६.
१३) दूरशिक्षण विभाग-शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर : बी.ए.भाग ३ (इतिहास लेखन परिचय) संपादन कामकाज. ३० जानेवारी २०१६.
१४) दूरशिक्षण विभाग-शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर : बी.ए.भाग ३ (स्वातंत्र्यानंतरचा भारत) सहलेखन व संपादन कामकाज. फेब्रुवारी २०१६
१५) राष्ट्रीय परिषद : डी.पी. भोसले कॉलेज, कोरेगांव-पेपर वाचन. 'स्वातंत्र्य चळवळ स्त्री योगदान'
१६) राष्ट्रीय परिषद : डी.पी. भोसले कॉलेज, कोरेगांव-३रे सत्र / तज्ञ मार्गदर्शक. १२ फेब्रुवारी २०१६.
१७) शिवाजी विद्यापीठ प्राध्यापक परिषद : आर.आर. पाटील कॉलेज, सावळज / पेपर वाचन वाचन सत्राध्यक्ष-मध्ययुग कालखंड. दि. १३ व १४ फेब्रुवारी २०१६.
१८) एमपीएससी. - विभाग-संचालक म्हणून कामकाज सन २०१५-२०१६
१९) प्राध्यापक प्रबोधिनी व्याख्यान - 'आंतरराष्ट्रीय दहशतवाद', फेब्रुवारी २०१६



**प्रा. रामचंद्र यादव,** समाजशास्त्र विभाग सहाय्यक प्राध्यापक

१) सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय, उंब्रजच्या मुलींच्या वसतीगृहासाठी ४८,०००/-रु.ची लायन्स क्लब, लायनेस क्लब, कराड व आय हॉस्पिटल यांच्यावतीने संडास-बाथरूमची फरशी देणगी रूपाने प्रा.यादव आर.एस. यांनी अॅड. सतीश पाटील यांच्याकडून मिळविली.
२) सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय उंब्रज स्थानिक व्यवस्थापन समितीचा शिक्षकांचा प्रतिनिधी म्हणून नियुक्ती.





३) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर बी.ए. भाग एक ते बी.ए.भाग तीन समाजशास्त्र पेपर तपासणी व मॉडरेशन म्हणून शिवाजी विद्यापीठ परीक्षा विभागाकडून नियुक्ती.
४) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर बी.ए. भाग तीन समाजशास्त्र पे.नं. ११ व १६ आदिवासी समाजशास्त्र अभ्यासक्रम कसा असावा व त्या विषयाचे दूरशिक्षण विद्यार्थ्यासाठी व शिवाजी विद्यापीठ बी.ए. भाग तीनच्या विद्यार्थ्यांना दूरशिक्षणच्या पुस्तकाचे लिखाण.
५) सौ.मंगलताई रामचंद्र जगताप महिला महा., उंब्रज सेमिस्टर परीक्षेसाठी अंतर्गत सिनिअर सुपरवायझर म्हणून शिवाजी विद्यापीठातून नियुक्ती.
६) सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय, उंब्रज मुलींच्या वसतीगृहासाठी, महाविद्यालयाच्या मदतीसाठी आघाडीवर.
७) सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय, उंब्रजच्या विविध कमिटीचा चेअरमन-सदस्य.
८) छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा व शिवाजी विद्यापीठ समाजशास्त्र विभाग, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने ६ फेब्रुवारी रोजी 'समाजशास्त्र मराठी परिषदेचे आठवे अधिवेशनात' सक्रिय सहभाग.
९) शिवाजी विद्यापीठ समाजशास्त्र मराठी परिषदेच्या कार्यकारिणीमध्ये २०१६ ते २०१८ सालासाठी निवड.
१०) विद्यार्थ्यांच्या अडीअडचणी सोडविण्यास नेहमीच पुढाकार घेतलेला असतो.
११) बी.ए. भाग तीन समाजशास्त्र व बी.ए. भाग दोन अर्थशास्त्र विषयाच्या विद्यार्थिनींना 'जयवंत शुगर्स वर्क्स'ला भेट बी.ए. भाग तीन औद्योगिक समाजशास्त्र विषयाचा प्रकल्प तयार करण्यासाठी ''सह्याद्री सहकारी साखर कारखान्यास'' भेट देऊन कारखाना उत्पादन पध्दतीची पाहणी केली.



**प्रा.डॉ. तानाजी ज्ञा. पाटील,** मराठी विभाग सहयोगी प्राध्यापक

१) 'विठ्ठलभक्त जनाबाई' आधार प्रकाशन, अमरावती. इंटरनॅशनल रिसर्च जर्नलमध्ये प्रसिध्द. दिनांक ५.११.२०१५.
२) 'धनगर स्त्रीगीतांतील अलंकारिकता' आधार प्रकाशन, अमरावती. इंटरनॅशनल रिसर्च जर्नलमध्ये प्रसिध्द. दिनांक २०.७.२०१५.
३) 'दलित कवितातील जीवन चित्रण' देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक आर्टस् अॅन्ड सायन्स कॉलेज, चिखली व विश्वविद्यालय अनुदान आयोग, नवी दिल्ली आयोजित दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चा सत्रामध्ये पेपर वाचन. दि. १८, १९.१२.२०१५.
४) कला, वाणिज्य महाविद्यालय, सातारा येथे राष्ट्रीय चर्चासत्रात 'दलित कवितातील स्त्री' या विषयावर पेपर वाचन. दिनांक १०.८.२०१५.
५) देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक आर्टस् अॅन्ड सायन्स कॉलेज, यशवंतनगर, चिखली येथे दिनांक २९.८.२०१५ रोजी एक दिवशीय शिक्षक प्रशिक्षण शिबीरामध्ये उपस्थित.
६) छ.शिवाजी कॉलेज, सातारा एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रात 'प्रसार माध्यमांचे बदलते स्वरुप' या विषयावर शोधनिबंध सादर दि.१३/२/२०१६
